अंकुश शिंगाडे



# कामगार

# कामगार

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कामगार

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# कामगार

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे १२२ बी गजानन नगर भरतवाडा कळमना मार्केट रोड नागपूर

ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन: २६ जुलै २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची- परवानगी घेणे आवश्यकआहे .



## *अंकुश रा.शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

*प्रकाशित साहित्य:

*कवितासंग्रह*

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

*कादंबरी*

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

*कथासंग्रह*

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

*लेखसंग्रह*

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

*चारोळीसंग्रह*

१)आक्रमण

*प्रवासवर्णन*


१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*

# अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध पुस्तके

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/att_deep_bhav_ankush_shingade.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/astittva_ankush_shingade.pdf






ही पृथ्वी शेषनागाच्या डोईवर नसून कामगारांच्या कष्टांवर उभी आहे.

--- शा. अणाभाऊ साठे

# कामगार कादंबरी भाग १

नुकताच सूर्योदय झाला होता. आज साविनंदला अस्वस्थ वाटत होतं. कारण त्याच्या मनात चित्रविचित्र विचार चालले होते. काहीसा तो चिंताग्रस्त तर काही भाव कळत नकळत बदलत होते. चेहरा अगदी निस्तेज पडला होता.

आज कामगार दिवस होता. साविनंद अस्वस्थ अवस्थेत घरी बसला असतांना त्याचा मित्र रघुनाथ तिथं आला. रघुनाथ साविनंदचा लहानपणीचा मित्र होता. त्याचेसोबत राहू राहू जीवनाचे प्रत्येक क्षण त्यानं अनुभवले होते. रघुनाथची भाषा तशी गावंढळ होती.. पण साविनंदसोबत राहू राहू त्याची भाषा सुधारली होती.

रघुनाथ साविनंदचा बालपणीचा मित्र. मानवाईकही. तो कारखान्यात काम करायचा. ज्या कारखान्यात त्याचा फार मोठा मान होता. ती कामगार मंडळी त्याची आज्ञाही पाळत असत. तसा तो पन्नाशीवर टेकला होता.

तसं रघुनाथनं पाहिलं. साविनंद उदास बसला आहे. तसा तो म्हणाला,

“यार, उदास का एवढा?”

“नाही रे, आज कामगार दिवस ना.”

“होय, कामगारच दिवस म्हण की. पण आज तर तू खुश राहायला पाहिजे होते ना.”

“पण कसा राहू?”

“का बरं? काय झालं?”

“अरे माझे मन मला खुश राहू देत नाही.”

“कशाचे विचारचक्र सुरु आहे तुझ्या मनात? तुझ्या मुलीचं लग्न गी आहे का? कदाचित त्याची चिंता.”

“नाही रे, त्याची चिंता नाही.”

“मग आणखी कसली चिंता आहे?”

“म्हातारपणाची आहे का?”

“नाही, तिही नाही.”

“मग आणखी कसली आहे?”

“अरे आज कामगार दिवस आहे.”

“अरे, आज तू ती पुस्तक कामगाराचे जीवन लिहिण्यास प्रारंभ केला होता, आठवते का तुला. अन् माहित आहे. त्या तुझ्या पुस्तकाने खुप क्रांती केली होती.”

“सारंच आठवतं. पण त्या पुस्तकानं क्रांती!"

“होय, त्याच पुस्तकानं क्रांती केली.”

“हो का.”

“हो, आज सर्व कामगार तेच पुस्तक वाचून भडकले आणि उपोषणावर बसले.”

“म्हणजे क्रांती केली म्हणावी पुस्तकानं.”

“हो, क्रांतीच केली.”

“बघ अजून मी एक विसरलोच.”

“काय विसरला.”

“तुला चहा. तू मगापासून आला आणि मी गोष्टीच सांगतोय.”

“अरे कशाला चहा?”

“का? तू असा नेहमी येतोस का या रिटायर्ड माणसाकडे.”

“अरे, चहा घेतला मी.”

“एवढ्या लवकर घेतला चहा.”

“एवढ्या लवकर. घड्याळ बघ किती वाजलेत. आठ वाजले आठ.”

“आठ वाजो की दहा. आपल्या मागं तर आटच आहे भाऊ. पहिलं घराचा आट होता, तो संपला आतं लग्नाचा आट. म्हातारपणाचा आट अन् नेहमीचा पेन्शनचा आट.”

“तुच तर डोक्याला लावून घेतलंस. अरे ते कामगार भोगू दे आपल्या कर्माची फळ. तू कशाला मधात पडतोस?”

“असाच विचार जर सगळ्यांनी केला, तर मला नाही वाटत की इथं कामगारांचं राज्य येईल. अरे सर्व सत्ता कामगारांच्या हाती असायला हवी. ह्या उच्चभ्रू लोकांच्या हाती सत्ता. अन्

ज्यांच्या भरवशावर माल म्हणजे असली माल तयार होतो, ते आपल्यासारखे शेवटपर्यंत उपेक्षितच."

"अरे पण तुला त्यांच्याबद्दल काय करायचंय. हेच तुझ्या चिंतेचं कारण. निदान म्हातारपणी तरी हे उद्योग सोड. खरं सांगू, तुझ्याच्यानं कामगार सुधारणार म्हणतोस? त्यांचं सोड, ते जिकडं मिळेल, तिकडं धावतील. थोड्याशा चतकोर तुकड्यासाठी ही स्वतःला विकणारी माणसं. हे पुर्वीपासून चालत आलेलं आहे. आताचं आहे का?"

"बरं थोडा बैस. मी चहा घेवून येतो."

"अरे, नाही मी चहा घेतला."

"बरं, काफी घेवू."

"नाही नाही, राहू दे. उगाच खर्च कशाला?"

"हा खर्च आहे का?"

"खर्च नाही तर काय?"

"अरे, , आपण कामगारांनी चहाच घ्यायला हवा. काफी अन् दूध घ्यायची आपली अवकात नाही. ते पेय मालकांनीच

घ्यावं. हे माजलेत साले, आपल्याच पैशावर आपल्यालाच घुत्कारतात."

"अरे, पण हे कामगार तरी चांगले आहेत का? हे ही तर...."

"म्हणजे?"

"हे ही तर दल बदलतात."

"म्हणजे?"

"हे पाय, नवेनवे आजकालचे पोट्टे, काम नाही करत न जास्त पैसा पाहिजे म्हणतात."

"म्हणजे?"

"अरे, मालकाला जेव्हा पैसा मिळल, तेव्हाच ते आपल्याला पगार देतील न. त्या दिवशी कैलास सेठ भेटला होता."

"का म्हणत होता तो?"

"म्हणत होता की कामगार आम्हाला पैसे काढून देतील, , तेव्हाच पगार वाढवून देवू ना. त्याचंही ते बरोबरच का नाही."

“कदाचित हे मालक वरुन दिसायला चांगले दिसतात. पण आतून मोठे स्वार्थी व दृष्ट असतात. हे बघ, त्यांना पैसे बरोबर मिळतात. ते तसं काढतात. मालात भेसळ करुन.”

“म्हणजे?”

“आपण घरी आपल्याा कारखान्यातलंच तेल वापरतो ना. मग ते तर शुद्ध राहायला हवं. पण आपलं पोट बिघडतं त्यानं. कारण तेलात भेसळ असते सारी. आपण स्वस्त मिळते म्हणून खातो.”

“अरे आपण तर गरीब माणसं. आज ना उद्या मरायचंच आहे बंधो, एवढे दिवस तर त्या तेलावर काढले. आता मेलो तरी काय होईल.”

“पण आपली पिढी.... आपल्या पिढीचं काय?”

“म्हणजे?”

“त्या तेलाचा आपल्या पोरांवर काही असर नाही का होणार?”

“हो सालं, तुझं बरोबर आहे. माझ्या तर हे लक्षातच आलं नाही. हे बडे चतूर आहेत तर.”

“मी तर तेच म्हणत आहो.”

साविनंद चहा सांगायला आतमध्ये गेला.

रघुनाथ विचार करीत बाहेर बसला होता. साविनंद कामगारासाठी किती तळपतो आहे याचा अंदाज घेत होता. कामगाराविषयीची तळमळ साविनंदला स्वस्थ बसू देत नव्हती. काय मिळणार आहे. असा विचार करीत असतांनाच साविनंद घरातून चहा घेवून बाहेर आला. तसा रघुनाथ म्हणाला,

“यार, मला एक गोष्ट कळलीच नाही.”

“कोणती?”

“तू हे सगळं करतो ते बरोबर आहे. पण तुला यातून काय मिळतं?”

साविनंद थोडा हसला. म्हणाला,

“तू राहिला निव्वळ कामगार. तुला फक्त राबणंच तेवढं माहित. मला काही मिळत नाही. मिळणारही नाही. पण मी

माझ्या मुलाबाळांना कामगार बनविणार नाही आणि मुलीलाही कामगाराच्या घरी देणार नाही. कामगाराचं दुःख आपल्यालाच माहित. पण एक गोष्ट अशी की यातून समाधान किती मिळतं आपल्याला.''

''अरे तुझी आता खड्ड्यात जायची वेळ. मेल्यावर कोणतं समाधान मिळणार आहे तुला? म्हातारपणी आराम करायला हवं. पण तू राबतोस त्या कामगारांसाठी. जे कामगार तुला न्याय देवू शकणार नाहीत. शिवाय ते सुधरतील असं वाटतं का तुला?''

''तुझं बरोबर आहे. पण एका गव्हाच्या दाण्यापासून शंभर आणि कोटी दाणे तयार होतात. माझ्याही एका एका शब्दातून शेकडो क्रांतीकारी कामगार तयार होतील. जे संपुर्ण मालक-शाही मुर्दाबाद करुन टाकतील.''

''बघ आतं जास्त विचार करु नकोस.''

''विचार करायला हवा रघुनाथा विचार करायला हवा.''

''साखर किती टाकू भावजी?'' साविनंदची पत्नी मधू म्हणाली.

"नकोच मला साखर."

"किती फिके खाता. वाचवता वाटते."

"नाही जी वहिणी, पण साखर कमीच खावी."

"का बरं?"

"साखर आजारावर आमंत्रण."

मधू साविनंदची पत्नी. ती स्वभावानं प्रेमळ होती. तिच्या प्रेमळ स्वभावानं सर्वजण तिचा मान करायचे. साविनंदचे कोणीही मित्र आलेच, तर ती त्यांचा सन्मान करीत असे. ती रघुनाथला चहा देत होती. तोच तिथं रमेश आला. तसं त्यानं त्यांना चहा पिणं पाहिलं व तो म्हणाला,

"घ्या.... प्या प्या. एकटे एकटेच चहा प्या."

"आला रमेश ये. कसं काय येणं केलं?" रघुनाथ म्हणाला.

"अन् हो, जरा वेळानं आला."

"का बरं?"

"अरे, चहासाठी तुझ्या वहिणीला त्रास."

“नको नको. चहा नको मला.”

“मग बोल. कशासाठी आलास?”

“रमेशराव, कामास दोनचार दिवस सुट्ट्या मिळेल काय?”रघुनाथ म्हणाला.

“मिळेल. पण जरा इंन्ट्री करावी लागेल.”

त्या तिघांमध्ये बराच संवाद रंगला. काही वेळानंतर रमेश व रघुनाथ चहा पिवून निघाले. घरी जाण्यासाठी. कारण कारखान्यात कामाला जाण्याचा वेळ होत आला होता.

घरापासून कारखाना जवळच होता. पण कारखान्यात वेळेवर पोहोचावं लागत होतं. थोडा जरी वेळ झाला तरी परत पाठविण्यात येत असे. तब्बल बारा तासाची नोकरी होती. सकाळी पावणेअकरा ते रात्री पावणेअकरा पर्यंत. पण वेतन अत्यल्प म्हणजे बाराशे ते पंधराशे रुपये तेवढे मिळत. नवीन लागलेल्या तरुणांना फक्त सहाशे रुपये. वयस्क मंडळींना

पंधराशे रुपये वेतन मिळायचं. या कामगार विश्वातील जीवन हलाखीचे होते.

सावितंदनं चहा घेतला. तसा तो आपल्या पत्नीस म्हणाला,

"मधुवंते, आज मला बरंच अस्वस्थ वाटतेय."

"काय झालं तुम्हास्नी?"

"काही नाही गं. पण आज कारखान्यात जायचा त्रास आलाय. जावंसं वाटत नाही."

"अहो विनाकारण सुट्ट्या घेवू नोका. अहो आजचा पगार नाय का कटणार."

"कटू दे. हरामखोर आहेत. कारखानेवाले. जसे जनावरं समजतात. जनावरांनाही थोडावेळ विश्रांती मिळते. पण आम्हाला जनावरापेक्षाही बेहत्तर वागवितात. खायला पण बरोबर सुटी देत नाहीत ते."

"जशी तुमची इच्छा. तुम्हाले वाटन तं घरी राहा. नायतं जा. मी कोण तुम्हाले सांगणेवाली. पण घरखर्च मलेच तं पाहा लागते. तवा माही त्रेधातिरपीट उडते."

“बरं बरं. जातो कारखान्यात. पाणी गरम कर लवकर. अंघोळ करतो. दोन निवाले पोटात टाकतो अन् जातो कामाला.”

“तपूनशान वाया चाललंय.”

“टाक मग लवकर अंघोळीला अन् जेवणाचा ताट बनव. पावणेअकरा वाजायला वेळ लागत नाही. दोन मिनिट जरी वेळ झाला तरी आम्हाला कारखान्यात घेतल्या जात नाही.”

'ह्या कारखान्यावाल्यांना धडा शिकविलाच पाहिजे. ' तो स्वगत म्हणाला. तसा त्याच्या मनात विचार आला त्याच्या बालपणीचा. '

बालपणीचा काळ सुखाचा वाटत होता. एरवी लहान राहिलो असतो तर बरं झालं असतं असं त्याला वाटत होतं. तो बराच शिकला होता. पण मोठ्या डीग्रीचा त्याला उपयोग नव्हता. पण तो चिंताग्रस्त वाटत नव्हता. एवढ्यात त्याला आवाज आला.

“जेवन वाढलंय.”

'हट सालं, आपलं जीवनच बेकार. पोट भरण्यासाठी दिवसभर राबराब राबायचं आणि काही मिळायचं नाही. कारखान्यात बडेबडे मालक न शिकलेले. तरीपण आपल्यावर रोब टाकतात. आपल्या शिक्षणाची काही किंमतच नाही. दुसरीकडं चांगली नोकरीही नाही मिळाली. का हे शिक्षण. निव्वळ पेन्शनसाठी नोकरी करायचीय. आता तर पोरंबारं. त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी. नको रे बाबा. हे परमेश्वरा. तू माझा जन्म कामगारात का टाकला. मलाही तू करोडपती बापाचा करोडपती मुलगा बनवायला पाहिजे होतं. मी काही पाप तर नाही ना केलं. अन् पापही केलं असेल तरी देवा तू मला माफ करायला हवं. ' तसा घरुन पुन्हा आवाज आला.

“अहो, जेवन थंड होत चाललंय.”

तशी त्यानं लवकर अंघोळ आटोपवली. तसा परत तो विचार करु लागला.

'हे किटाणू, साबन लावून आपण आपल्या शरीरावरुन झटकून टाकतो. त्याप्रमाणे हे मालक..... या मालकांनाही

शरीरावरच्या किटाणूंसारखं आपल्या अंगावरुन नव्हे तर आयुष्यातून झटकून टाकावं. '

त्यानं खरबरीत टावेलनं अंग पुसलं. कपडे चढवले व तो बाहेर आला. तसा म्हणाला,

"किती वाजले गं?"

"नव वाजले जी."

"जेवन थंड होत आहे जी."

"अगं पण जरा पुजा तर करु दे."

"बरं करा पुजा लवकर. पण काहो, तुम्ही दररोज पुजा करता. मंग देव पावते तरी का? तुमचा देव फायदा बी करत नाय."

"अगं होईल एखाद्या दिवशी फायदा. फक्त विश्वास ठेव देवावर म्हणजे झालं."

त्यानं माचीस उजळली. तसा त्याच्या मनात विचार आला. 'साला या माचीसनंच कारखाना जाळून टाकावा. कोणाला कळू न देता. अन् कळलं तर कदाचित..... तर आपल्यालाच तुरुंगवास होणार. आपला परीवार उघड्यावर पडणार. त्या

कारखान्याचं काय होणार. त्या कारखान्याचा विमा असणार. ज्या विम्यानं झालेलं नुकसान भरुन निघणार. ' त्यानं अगरबत्ती लावली व आपल्या मनातील इच्छा पुर्ण करण्यासाठी देवाला विनंती करुन अगरबत्ती लावली. नैवेद्य चढवला आणि जेवायला बसला. पण तो देवालयात बसलेला दगडाचा देव काहीही हालचाल करीत नव्हता.

तो जेवायला बसला खरा. पण त्याला जेवन धकत नव्हतं. त्याला त्या पुस्तकाविषयीची गोष्ट आठवत होती.

त्याचा एक मुलगा दहावीमध्ये दूर शहरात शिकत होता. साविनंदने कामगारांचे जीवन पुस्तक लिहायचा आरंभ केला होता. आज कामगाराचे जीवन ही पुस्तक अर्धी लिहून झाली होती. त्यातील काही पानाच्या सांत्क्षांकित प्रति काढून त्या कारखान्यातील बेरोजगारांना वाटल्या होत्या. त्या पुस्तकाचा मुळ उद्देश होता. कामगारांची दैन्यावस्था दूर करणे. आता कामगारांमध्ये नक्कीच क्रांती होईल असे वाटत होते.

एवढ्याशा पानानेच क्रांती होणार होती. तर अख्ख्या पुस्तकानं काय होईल असं त्याला वाटत होतं. तसा तो स्वगत हसला. ते पाहताच पत्नी म्हणाली,

"काय झालं हो, तुम्हाले हासाले?"

"काही नाही गं. सहज हसत आहे."

"नाही पण काहीतरी नक्कीच मनात चाललं आहे."

"मला कामगार विश्वातील आठवण झाली."

"कोणती आठवण आली?"

"मगाशी रघुनाथ सांगत होता की तुमच्या पुस्तकानं क्रांती केली. बस तीच आठवण आली. अगं आज एवढीच पुस्तक लिहिली तर एवढी क्रांती. उद्या पुर्ण झाल्यावर. हेच आठवलं मला आणि हसू आलं. मी माझं हसणं मनात ठेवू शकलो नाही."

"अस्सं होय. त्यात का आहे हसण्यासारखं."

"तुला त्याच्यातलं नाय कळायचंय."

“भराभरा जेवन करा अन् निघा कामाले. रिकामपणाच्च्या जास्त गोष्टी येतेत तुम्हाले.”

“तुला रिकामपणाच सुचतोय.”

“नायतं कारखान्यात असं कोणतं काम करीत असान. निव्वळ गोष्टीत वेळ जात असन. घरीच तं नुसता गोष्टीत वेळ घालवता. मंग तिथं गोष्टी नसन करत हे कशावरुन? सांगा मले, माह्य काही चुकलं का?”

“तुला छान घरी राहायला मिळते म्हणून गोष्टी येतात असं वाटतं.”

“रागवलात तुम्ही. मी तं गंमत करत होती. तुमची तळमळ मले कळते. कामगारांसाठी तुम्ही तुमचं आयुष्य खर्ची घातलं. पण या कामगारांना स्वातंत्र्य मिळाल्यावर ते तुमचं नाव तरी घेतीन का?”

“न घेवोत.”

“म्हणून मी म्हणते, आपण आपल्यासाठी जगावं. हे काय कामगार, दिडदिवस चांगले बोलतीन. पुन्हा काही मिळालं तं तुमच्या विरोधातच जातीन म्हणते.”

“वेडी तू. अगं मानवाचा जन्म एकदाच मिळतो. त्या जन्माचा आपण काहीतरी उपयोग करुन घ्यायला हवा. जर आपण आपल्याच गोष्टीवर भर दिला तर ते आपल्याच सामान्य माणसासारखं जगणं झालं. ते तसं जगणं तर एखादा किडाही जगतो. तो किडाही कचऱ्यावर आपली उपजीवीका करतो. पण आपण माणसं. मी माझं जीवन मुळातच समाजसेवेला वाहिलेला. माझ्या समाजसेवेच्या आड कोणी आलंच तर मी त्याला देखील मोजणार नाही. तो माझा छंद आहे. जसा कोणाला लेखनाचा छंद असतो. कोणाला दारु पिण्याचा. कोणाला सिगारेट ओढण्याचा. या सगळ्यांपेक्षा माझा छंद चांगला आहे की नाही. कोणी आपल्या छंदासाठी पत्नी घरदार विकून टाकतात. मी तर तसं काही केलं नाही.”

“बरं बरं! तुमचा छंद तुम्हाले लखलाभ.” ती म्हणाली.

“मधुवंते, माझा डबा तयार कर.” तो म्हणाला. तसा तिनं त्याच्या जेवणाचा डबा तयार केला. त्यानं तयारी केली व लाल पागोटा खांद्यावर घेत तो निघाला.

तो रस्त्याने जायला निघाला. तसा तो प्रथम रघुनाथच्या घरी गेला. त्याला आवाज दिला.

“रघुनाथ, ए रघुनाथ.”

“होय, आलो.”

“चाला ना चालत नाही का?”

“पोटासाठी तरी जावंच लागन न बाबा.”

“अरे चालनं लवकर राजा, तिकडं गेट बंद झालं तं वापस या लागेल.”

“वेळ आहे रे, भोंगा ऐकू येईल, तेव्हा जावू.”

“अरे पण इथंच साडे दहा वाजले.”

“अरे, अजून अर्धा तास आहे. ये, बस असा. तुले काही एकट्यालेच जावं लागतं का? तुलेच बायकापोरं आहेत का? तुह्यात अन् माह्यात फक्त शिक्षणाचा फरक. अन् तुझा मुलगा बारावीले अन् माझा नाही तेवढा.”

त्यानं पानाची चंची काढली. विचारलं,

“पान खातेस?”

“नाही, सुपारी तेवढी.”

“खाणं पान. विटमीन भेटते म्हणतेत नं.”

“विटमन नाही रे व्हिटॅमीन म्हण. जीवनसत्व.”

“बाबा, मी तेवढा शिकलो नाही नं. तुही बराबरी नाही करता येणार मले.”

त्यानं पानाला चुना लावला. तसा तो म्हणाला,

“अरे रघुनाथा, असा कधी गावराणी तर कधी शुद्ध भाषा का वापरतोस. एकच भाषा ठेवावी.”

“अरे बाबा, वहिणी समोर शुद्ध बोलाच लागते. मायके तुहीच बायको म्हणन का तुमचे मित्र बी गावराणीच. तुहीच इज्जत वाढवतो राजा.”

त्यानं पानाला चुना लावला. कात, सुपारीचा तुकडा टाकला व पानाची घडी मारुन पान तोंडात कोंबत तो म्हणाला,

“चल बाबा लवकर. पावणेअकरा वाजलेत.”

शुभद्रेनं बांधलेला डबा हातात देत शुभद्रा म्हणाली,

“जावा जी लवकर. नायतं उशीर होईन.”

“या कारखान्याचा काही नेमच नाही. केव्हाबी भोंगा वाजते.”

“काय म्हणालास?”

“काय नाय रे. भोंगा लवकर वाजला म्हंतो.”

“हो, अन् सुटी द्यायच्या वेळी मात्र लवकर वाजतच नाही भोंगा.”

"हो ना. माणूस बंधनात आहे म्हणून. नाहीतर मी केव्हाच सोडून गेलो असतो हा कारखाना. तो अडाणी सुपरवायजर सुद्धा आम्हा शिकलेल्यांवर रोब झाडतो.”

“नातेवाईक होये न बाबा तो सायेबाचा.”

“अरे नातेवाईक राहो का अजून कोणी. पण मी एम ए आहे अन् तो अडाणी. निदान याची तरी तमा बाळगून वागावं त्यानं. पण ढोरासारखाच वागते तो सुपरवायजर सुद्धा.”

“म्हूनच पोरी पायतांनी शिकलेलीच पायत असतीन लग्नासाठी. तिले व्यवहार कळले पाह्यजे म्हणून.”

“हं बरोबर. बाबा रघुनाथ, शिक्षणवाल्यांची किंमत शिक्षणवाल्यांनाच माहित. अडाणी माणसांना नाही.”

“मंग आतं नाराज कावून होतेस. तुले तं एवढं सगळं मालूम हाय. का शिक्षणवाल्याची इज्जत शिक्षणवालेच करतेत म्हणून.”

“नाही रघुनाथा, हे माणसाच्या स्वभावावर आहे अवलंबून. अरे तू तर अडाणीच आहेस. मग तू कसा बोलतोस.”

“तसं नाही रे, तू माझा मित्र आहेस ना. म्हणून. तो सुपरवायजर काही तुह्या मित्र नाय.”

तो रस्ता विराण होता. आजुबाजुला गर्द झाडांची दाटी. त्यातच आजुबाजुला घरंही होती. रखरखीत उन्हाळ्याचे दिवस होते. पावणेअकरा. ऊन अंगाला चटके देत होती. जणू बारा वाजले असावेत असे जाणवत होते. रस्त्यावर चारदोन दुचाकी धावत होत्या. तशी ट्रकाचीही गर्दी होती.

ते दोघंही आजुबाजुला पाहात चालले होते. आजुबाजुला असलेल्या इमारतींच्या निरीक्षणाने त्यांच्या मनात द्वेषाची भावना निर्माण होवू लागली होती.

माणसेच तिही.... पण ती साधी माणसं नव्हती. ती भ्रष्टाचार करुन पैसे कमविणारी माणसे या मोठमोठ्या इमारतीत स्थिरावली होती.

तो कारखाना तेल काढण्याचा होता. तिथे तांदळाच्या कुकसापासून तेल काढत असत. या कुकसात कोणतंतरी पांढरे पावडर मिसळविले जाई. त्यानंतर ते मशिनमध्ये भरुन त्यापासून तेल निघत असे.

ते आजुबाजुला पाहात पाहात चालले होते. तसा त्यांना एक दवाखाना दिसला. त्या दवाखान्यात फार गर्दी होती. तसा साविनंद म्हणाला,

“रघुनाथा हा पाहा भेसळीचा परीणाम. आपण कारखान्यातून भेसळयुक्त तेल काढतो ना. त्याचाच परीणाम पाहा डॉक्टर चा दवाखाना किती गरजवंत झाला आहे.”

ते परत समोर गेले. समोर पाहतो काय बंगल्यांची रांग. एक मोठा बंगला त्यांना दिसला. हाच तो मंत्र्यांच्या पोराचा बंगला. मायबापाशी पटलं नसल्यानं त्यानं इथं अलगसलग बंगला बांधला होता. त्यानेही भ्रष्टाचार करुन बंगला बांधला होता. त्याच्याच बाजुला दुसरा बंगला. हा बंगला तहसीलदाराचा. त्यानंही भ्रष्टाचार करुनच बंगला बांधला होता.

आज कामगार दिवस होता. तरीही सुटी न मिळाल्यानं त्यांना कामावर जावं लागत होतं. पण या तहसीलवाल्यांना सुट्टी होती. तसा साविनंदला फार वाईट वाटत होते. तसे ते पुढे गेले. पुढे काय तर एक चौक होता. त्या चौकात एक शिपाई वाहतूक सांभाळत होता. पण तोही थकला असल्यानं सावलीच्या कडेला बसला होता. तर सिग्नल बंद असतांनाही लोकं

नियमांचे उल्लंघन करीत चालले होते. शिपाई मात्र खुर्ची लावून बसला होता. बहुतेक ती खुर्ची बाजुच्या दुकानदाराचीच असेल असे वाटत होते. तो पोलिस कर्तव्यावर असूनही झोपला असल्याचा भास होत होता.

"अरे साविनंदा, हा तर झोपलेला दिसतोय."

"ते तसंच असते. इथं जो इमानदारीनं काम करतो, तो मागेच असतो. न काम करणारेच पुढे जात असतात. हाच जगाचा नियम आहे."

पोलिसही झोपलेला होता. त्याच्याजवळ बाईक असावी असं वाटत होतं. रघुनाथ व साविनंद निरीक्षण करीत होते. एवढ्यात एक मागून ट्रक आला व त्यानं इकडेतिकडे न पाहात सिग्नल तोडला आणि पुढे सायकलस्वारास चिरडले.

ट्रकने सायकलस्वारास चिरडले खरे. आरडाओरड सुरु झाली. कोणी पाणी आणा, पाणी पाजा म्हणू लागले. तोच साविनंद पुढे धावला. कारण कोणी पुढे होवून धावायला तयार दिसले नाहीत. त्या माणसाचा चेंदामेंदा झालेला असून चेहरा अक्षरशः गहाळ झाला होता. साविनंदला फार वाईट वाटलं व

मनात जळफळाटही झाला. वाटलं, जर हा पोलिसवाला जागा असता आणि आपले कर्तव्य चांगले बजावत असता तर.... आज हा माणूस मरण पावला नसता. एवढ्यात एक मुलगा पोलिसाला बोलवायला गेला.

"अंकल."

"क्या है?"

"अंकल, वहॉ एक्सेडंट हो गया।"

"होने दो।मुझे क्या करना है। साले चलते नही बराबर, इसलिए मर गया।"

तो मुलगा परत आला. तो पोलिसवाला काही करीत नाही हे पाहून काहींनी जवळच्या पोलिसांना फोन केला. इतक्यात पोलिसाच्या कारचा आवाज आला. तसा झोपलेला पोलिसवाला खडबडून जागा झाला. तसं अधिकाऱ्यानं विचारलं,

"क्या हुआ?"

“कुछ नही साहाब, यह तो होता ही रहता है। यह सायकलवाला बीच में आ गया, मर गया।"

इतनी बड़ी घटना और पांडे आप कह रहे हो की कुछ नही हुआ।"

तसा आव आणत तो पोलिसवाला सर्वांना बाजूला करीत म्हणाला,

“चलो बाजू हटो, साहाब को शिनाश्त करने दो।"

साविनंद व रघुनाथला कामाला जायला वेळ होत होता. लोकं खुप चिडले होते. ट्रक चालक फरार झाला होता. काही लोक पोलिसांना शिव्या हासडत होते. काही जण हळहळत होते.

'साले पोलिस झोपा घेतात. चौरस्त्यावर उभे न राहता रहदारी सांभाळत नाहीत. ' असं स्पष्टपणे ऐकू येत होतं.

आतापर्यंत झोपलेल्या पोलिसांना आता जाग आली होती. कारण ते विचारतच तसे होते.

“हं सांगा अपघाताच्या वेळी इथं कोण कोण होतं?”

सर्वजण चूप होते. मात्र साविनंद म्हणाला,

“मी..... मी होतो.” त्याचबरोबर रघुनाथ ही म्हणाला,

“मी पण होतो जी.”

“तुम्हाला बयानासाठी पोलिस स्टेशनला चालावं लागेल.”

रघुनाथ व साविनंदला कामाला उशीर होत होता. पण त्यांनी वेळेकडे न पाहता एक समाजकार्य केले होते. जवळपास सव्वा अकरा वाजले होते. फक्त पंधरा मिनिट तेवढे बाकी राहिले होते. साविनंद रघुनाथला म्हणाला,

“रघुनाथ, तुझा काय विचार आहे?”

“साविनंदा, असल्या खटल्यात पडू नोको. आपल्याले उशीर होतोय. आपला एक दिसाचा पगार जाईन. हे पोलिसं का देणार आहेत का पगार?”

“अरे पण माणुसकी.”

“धोड्यात गेली माणुसकी. माणुसकीनं पोट तरी भरते का साविनंदा.”

“तू जा रे बाबा, मी नाय येत तिकडं. उगीच आपल्या मांगं काय तरी लावून घेणं.”

“मग तू जा कामाला. मी जातो पोलिसस्टेशनला. जावू दे एक दिवस गेला तर.”

“तुम्ही पोलिसांना मदत करीत नाही. म्हणूनच तर असले गुन्हेगार सुटतात.”तो अधिकारी म्हणाला.

“सायेब, यात चूक कोणाची असल असं तुम्हाले वाटते.”रघुनाथ म्हणाला.

“म्हणजे?”

“म्हणजे सायकलवाल्याची का ट्रकवाल्याची का पोलिसवाल्याची.”

“सायकलवाल्याची असेल.” अधिकारी म्हणाला.

“नाय साहेब, यात पोलिसवाल्याची चूक आहे. तो झोपला होता तुमचा शिपाई.”

“हे बघा, सर्वजण पोलिसवाल्यांनाच शिव्या देत असतात. ही मानसिकताच बनली आहे लोकांची.”

“साहेब ही मानसिकता नाय. हे सत्य आहे.”

“मला तुमचा बयाण नको. तुम्ही तर आम्हालाच फसवणारे दिसता.”

“अहो, अधिकारी झालात म्हणून काय झाले. खऱ्या गुन्हेगाराले सोडून द्याचं का? ते दान देतेत नं तुमच्या पोलिसाले. तुम्ही मंग त्याईले कसे पकडान. अन् जाणुनबुजून गरीबांयवरंच गुन्ह्याची नोंद करता.”

“हे सगळं तुमचं चूक आहे.”

“खरं कधीबी चूकच असते.”

“तुम्ही तं चक्क पोलिसांवरच आरोप लावत आहात.”

“अन् यात गुन्हेगार बी पोलिसच आहेत नं जी.”

“कसे काय?”

“तुमचा शिपाई झोपला होता खुरचीत. आम्ही आमच्या डोळ्यानं पाह्यलाय.”

“यावरुन पोलिस बदमाश असतात असं कशावरुन?”

“अहो, आमच्या घराकड दारुची मोठी भट्टी आहे. ते दारु माणसाचा जनावर करते. मांगं तं त्या भट्टीवाल्यानं दारुमंधी का टाकलं तं मालूम नाय. चार पाच जण मेले तरी बी त्याईले पोलिसाईनं पकडला नोयता.”

“केव्हाची गोष्ट आहे?”

“झालं वरीष दोन वरीष. पण माह्यं बरोबर का नाय.”

“नाही नाही.”

“अवो, साहेब, त्या भट्टीवाल्यानं पै पै पैसा चारला अधिकाऱ्याले. म्हणून तो सुटला कोरा. तुम्हीच तं त्याले पकडलं होतं.”

“मी नसेल. मोहिते असेल मोहिते. मोहिते अन् मरई मोठे बदमाश होते. त्याईनं खाल्ला असन पैसा. म्हणून त्याईले निलंबीत केला. त्याईच्या जागी मी आलो.”

“साहेब, सर्वचजण तसे बोलतेत. चार दोन दिवस. ते एकदाचे निघून गेले तर सगळे थंड होतेत. मी सामान्य माणूस आहे साहेब. मी जर श्रीमंतांचे खिसे कापले तर काय दोष? तो

लुटते गरीबाले तं. पण तुम्ही त्याले नाय पकडत. मले पकडता. याले न्याय नाय म्हणत साहेब."

"का बरं पकडतो त्यांना. कारण त्याचा ठोस पुरावा असतो राव."

"नाय, याचंही मीच उत्तर सांगतो."

"सांगा."

"अहो साहेब, हे बघा, आम्ही खिसे कापले, तं आम्ही कामापुरतं पैसे घेतो. बाकीचे दान करतो. पण तेच श्रीमंत चाय, पाणी, नाश्ता अन् पैसेबी देतेत. होय का नाही."

"रघुनाथा एक सांग या ठिकाणी पोलिस तर रक्षण करीत होते नं." साविनंद म्हणाला.

"तू चूप बस रे बाबा थोडावेळ."

"यात पोलिसांची चूक कशी काय?"

"मीनं मनाशीच सांगतलं नं, का तो झोपला होता."

"पण त्या सायकलवाल्याला सांगितलं की नियम तोड म्हणून. का ट्रकवाल्याला सांगितलं."

“साहेब, , मी सांगितलं तर तुम्ही माझ्यावरच ओरडाल.”

“नाही ओरडत. सांग.”

“लाल लाईट सुरु होता. तेव्हा आम्ही इथं थांबलो होतो. माझं लक्ष तुमच्या पोलिसवाल्याकडं गेलं. तो छान झोपला होता. लोकं बरोबर लाल, हिरवा, पिवळा लाईट पाहून चालत होते. इतक्यात हा ट्रकवाला भरधाव आला, अन् यानं मारली ठोस.”

“म्हणजे मी आलो तरी माझी यंत्रणा झोपा काढते वाटते.”

“साहेब मग काय तर..... साहेब, , सगळे नियम हे सामान्य लोकांसाठीच असतात. आम्हीच फक्त नियम पाळायचा. तुम्ही तोडला नियम तर तुम्हाला काहीच होणार नाही, आम्ही तोडला तर जबर शिक्षा. असेच आहेत आमच्या देशातील कायदे.”

“अहो राव, आम्ही पकडतो त्यांना. पण न्यायालयात ते जमानतीवर सुटून येतात. त्यासाठी वकील ऊभा करतात. भरपूर पैसा भरतात. त्याला आम्ही काय करणार. यात आमचा दोष आहे का?”

“साहेब, , ते सांगाच लागते. जिसकी टोपी उसके सर. तुम्ही तर दोष देणारच. आपल्या अंगावर काही पण येवू देणार नाही. न्यायाधीश महोदय ही निकाल लावायला बराच वेळ लावतात. माझ्या गावचीच गोष्ट आहे. दोन भावाची जमीन त्यांनी आपला निवाडा करण्यासाठी खटला न्यायालयात नेला. पण आज पंधरा वर्ष झाले. अजून निकाल लागायचाच आहे. पण तीच जर धनवान असती तर....”

“नाही हो राव. काही गोष्टी या विचार करुनच केल्या जातात.”

“मग सांगा. हा तुमचा पोलिसवाला. तो बिचारा सायकलवाला. त्या बिचा-याचा तं जीव गेला. मग या पोलिसाला कोणती शिक्षा कराल?”

“कायदा करेल ते.”

“कायदा करेल का साहेब. कायदा देईल ट्रक वाल्यांना शिक्षा.”

“त्यानं या सायकलवाल्याला पाहिले नाही म्हणून अपघात झाला ना.”

“चूक. यात ट्रकवाल्याचीही चूक नाही होवू शकत. कारण तो माणूस माल पोहोचवण्यासाठी रातभर डोळे फोडत आपला ट्रक चालवतो. तरीही त्याला मालकांच्या शिव्या खाव्या लागतात. वेळ का झाला म्हणून.”

“म्हणजे त्यालाही मालक बोलतात असं म्हणायचं तुम्हाला.”

“होय. म्हणून तो कधी जेवन न करताही सारखा ट्रक चालवत असतो. कधीकधी त्याचा तोल सुटतो. त्यालाही विश्रांती हवी असते कुठंही त्याला ट्रक ऊभा करता येत नाही. त्यानं एखाद्या ठिकाणी ट्रक ऊभा केलाच तर नो इंन्ट्री लावूनही तुम्हीच पैसे घेता. कधीकधी हाच ट्रकवाला झोप येवू नये म्हणून नशा करुन ट्रक चालवतो. तेव्हाही तुम्ही पकडता. बरोबर का नाही.”

“म्हणजे तुम्ही चित भी मेरी व पट भी मेरी म्हणत आहा तर....”

“साहेब, एकदा मी न्यायालयात गेलो होतो एका खटल्याच्या संदर्भात. त्यावेळी एका टिनटप्परवाल्यानं मला

सांगितलेली कहाणी. तो म्हणत होता. 'ह्या पोलिसवाल्यानं मला पकडलं. मी एका शेतकऱ्याजवळचा जुना पाईप विकत घेतला. अन् बाजारात विकायला जात होतो. तेव्हा पोलिसानं पकडलं. म्हटलं कोठून चोरुन आणला. त्यावर त्यानं उत्तर दिलं की मी हा शेतकऱ्याजवळून घेतला. तरीही पोलिस ऐकायला तयार नव्हते. मग त्यानं त्या शेतकऱ्याजवळ नेलं. शेतकऱ्यानं खरं सांगितलं. परंतू तोही खोटं बोलत आहे. म्हणून दोघांवरही खटला सुरु होता."

"अं राहातो एक एक पोलिसस्टेशन. आपण कितीही गव्हातील सोंडे निवडले तरी एखादा उरतोच उरतो."

"एका ठिकाणी एक रिक्षेवाला कडेला दारु पिवून झोपला होता. तेव्हा या पोलिसानं दारु पिवून का आहे म्हणून पकडलं त्याला. त्याच्यावरही गुन्हा नोंदवला. असं आहे पोलिसखातं. या सत्य घटना आहेत. मी स्वतः डोळ्यानं पाहिलेल्या."

"तुम्ही दोघंही फार हुशार दिसता."

"हुशार नाय जी साहेब, अनुभवाचे बोल बोलतो आम्ही. एकदा मी स्वतःच सायकल घेवून जात होतो. रस्त्यात चौरस्ता

होता. सिग्नल चालू होता. मी सायकल काढली. पण पोलिसानं मलाच पकडलं व म्हटलं'तुम्ही पाहून सायकल काढली नाही. कारण माझं सायकल काढायची व सिग्नल बंद व्हायची वेळ एकच असेल कदाचित. ती गोष्ट कावळा फांदीवर बसावा व फांदी तुटावी किंवा एखाद्यानं पाऊस येईल म्हणावं व पाऊस यावा अशी झाली. मी भरपूर समजावून सांगितले त्यांना. पण ते ऐकले नाही. त्यांनी माझ्याकडून जुर्माना वसूल केलाच केला. चिठ्ठी न देता.... वरुन धमकी देखील. जर तुम्ही चिठ्ठी मागितली तर तुमची सायकल जप्त होईल. तेव्हा मी ही त्या धमकीला घाबरुन गेले होतो. त्यावेळी मला पोलिसांबद्दल बराच आदर वाटत होता. पण आता वाटत नाही."

"अहो पोलिसांवर विश्वास ठेवा. पोलिस तुमचेच रक्षक आहेत. त्यांच्याशी मिळून मिसळून वागा. पोलिसाविणा देश चालू शकत नाही. अन् देश जर चालवायचा असेल तर पोलिसांवर विश्वास ठेवायलाच हवा."

"पण असे पोलिस असले तरी...."

"नाही नाही हे तुमच्या लोकांच्या अविश्वासानं होते."

“अहो साहेब, या अशा पोलिसांमुळं जमलेलं लग्न तुटते. एखाद्या घरच्या लग्न सोहळयात अचानक पोलिस आले तर नवरदेवाकडील मंडळी शहानिशा न करता वरात घेवून जातात. मग सांगा हे पोलिस आमचं रक्षण करतात की आम्हाला समाप्त करतात.”

बरं राव ते जावू द्या. तुम्ही पोलिसस्टेशनला बयानासाठी चालणार का?”

“नाही नाही.”

“का बरं!"

“अहो, आम्हाला वेळ होतो कामाला जायला. अन् तुमच्या म्हणण्यानुसार तो ट्रकवाला नाहीतर सायकलवाला दोषी आहे.”

“हो. तेच दोषी. दुसरे कोण? कोण तुमच्या म्हणण्यानुसार.”

“आमच्या म्हणण्यानुसार तुमचं पोलिस खातं दोषी आहे.”

“कुठं काम करता तुम्ही?”

“कारखान्यात करतो जी.”

“कोणता कारखाना?”

“बस येथून सरळ जायचं. डाव्या बाजूला वळायचं. मग उजवीकडं पलटायचं. मग पानठेल्याची रांग दिसते. तिथंच आहे कारखाना.”

“पण तुम्हाला भेटायचं कसं?”

“त्या पानठेलेवाल्यालेबी ईचारलं तं ते बी सांगन साहेब आमची नावं.” रघुनाथ मधातच बोलला.

“काय नावं आहेत?”

“याचं साविनंद बारस्कर अन् माह्य रघुनाथ बेलकर.”

“साविनंदजी, तुम्हाला काय वाटते अपघाताबाबत?”

“बस गुन्हेगाराला शिक्षा व्हावी.”

“मग शेवट विचारतो, कोणाला ठरवावं गुन्हेगार?”

“साहेब ट्रापीक पोलिस.” रघुनाथ परत बोलला.

“रघुनाथ, चूप बस. सिग्नलचे लाईटं रस्ता दाखवत होते नं. मग तो पोलिसवाला झोपो का काही करो. आपण थांबलो ना.

मग या दोघांनीही थांबायला हवं नव्हतं का? ह्यांनी सिग्नल तोडला, म्हणून अपघात झाला."

"हं तुह्यं बी बरोबर आहे राजा." रघुनाथ म्हणाला व चूप बसला. त्याच्या मनात एकच प्रश्न होता. दोषी कोण? सायकलवाला, पोलिस की ट्रकवाला. कारण प्रश्न संभ्रम निर्माण करणारा होता.

"बरं साहेब, आता आम्ही निघतो."

"बरं असंच सहकार्य करत चला. तुमच्यासारख्यांच्याच सहकार्याची आम्हाला गरज असते."

ते तिथून पुढं निघाले. समोर एका पटवारी महोदयाचं घर दिसलं. त्याला लागूनच एक मुख्याध्यापक राहात असलेला दिसला. आज ते घराचं निरीक्षण करीत करीत निघाले होते.

त्या दोघांच्याही इमारती चांगल्या प्रशस्तच होत्या. तसंही पटवारी महोदयाचं घर असू शकते असं वाटत नव्हतं. पण ते पटवारी महोदयाचंच घर होतं. ते घर बांधण्यापुर्वी पटवारी महोदयानं भरपूर पैसे खाल्ले असावे असे वाटत होते. त्यामानाने मुख्याध्यापकाचे घर छोटे होते. तसा रघुनाथ म्हणाला,

“यार, मास्तराले पैसे खाता नाय येत का?”

“खाता येते नं. पण या पटवाऱ्याएवढे नाही. ते शेतकऱ्याजवळून भरपूर पैसा खातो. कधी सातबाऱ्यासाठी. कधी मोजणीसाठी. कधी फेरफारसाठी तं कधी कागदपत्र पुरवण्यासाठी.”

“अन् मुख्याध्यापक कोणत्या माध्यमातून खातो?”

“तो मास्तरांच्या पैशावर डल्ला मारतो. पोरांच्या पैशावर डल्ला मारतो.”

“मले नाय समजलं साविनंदा.”

“अरे शिक्षकांचा जेवढा पगार येतो ना. हा मुख्याध्यापक त्यांना वेठीस धरुन त्यामधून पै पै पैसा खातो. देन म्हणून अन् मुलांचे पैसे पेपरच्या नावानं गोळा करतो. तीन रुपयाचे पेपर होत असतील तर दहा रुपये घेतो. शिवाय शाळा सोडल्याच्या दाखल्याचे पैसे घेतो. शाळा सुधारच्या नावाने पैसे घेतो. अन् ते सर्व पैसे दाबून बसतो”

“शाळा सुधारचं ठीक आहे पण मला सांग मास्तरलोकं कसे पैसे देत असतीन?”

“त्याईले धमकी देते नं हा मुख्याध्यापक. म्हणते पगार बंद करीन. अन् करते सुद्धा. म्हणून सगळे घाबरुन आपल्या पगारातले पैसे देतात त्यांना.”

“तुले कसं मालूम?”

“माह्या घरापाशीच एक मास्तर राहात होता. त्याचा पगार नेहमी बंद राहायचा. तोच सांगत होता. बघ आज लोकशाही जरी असली तरी हुकूमशाहीसारखाच व्यवहार करते. हुकूमशाही लोकशाहीचा बुरखा पांघरून आहे.”

“बरोबर. शंभर टक्के.”

“हे बघ, लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत एकाच माळेचे मणी आहेत सगळे. इथं जे बेईमानी करतो, तोच टिकवून ठेवतो स्वतःचं अस्तीत्व. अरे आता तर असं आहे. माणसाच्या जन्मापासून तर मरेपर्यंत पैसा लागतो.”

“कसा काय?”

“बघ, जन्म होतांना तो दवाखान्यातच होतो. दिलेवरीसाठी पैसा. अन् मेल्यावर घाटावर जाळण्यासाठी पैसा. मधात शिक्षणाला पैसा. मुलांचं बारसं. त्याला कपडेलत्ते, त्याला

अन्न, शाळेत गेल्यावर वह्या पुस्तकाला पैसा. यासाठी बाळाचे हट्ट पुरवणे. ह्या सर्व गोष्टी करतांना नाकीनव येतं. म्हणून आपण मागं राहतो. कारण आपल्या जवळ तेवढा पैसा नसतोच ना."

"हं समजलं."

"त्यानंतर नोकरी नाही लागली तर आपल्यालाच त्या पोरांना पैसा लावून दुकान लावून द्यावे लागते. मग लग्न ही आपल्यालाच करुन द्यावा लागतो. लग्नाचं आपल्या काळात बरं होतं का बेसन भातावर लग्न व्हायचं. पण आता तसं नाही. धुमधडाक्याने केल्याशिवाय जमत नाही. कोर्टातून केलं तर लोकं नावबोटं ठेवतात. मग यात श्रीमंतांचे ठीक आहे. पण गरीब माणूस लग्नासाठी पैसा कर्ज म्हणून काढतो. जर सामान्य माणसाला मुलीच असल्या तर मोठा पेचप्रसंग निर्माण होतो. कारण हुंडाही जबरदस्त आहे आपल्या समाजात. वधूपित्यांना मोठी खटाटोप करावी लागते.

मग चार दिवस मुलीचे लग्न केल्यावर चांगले जातात. मग पुन्हा लेकीच्या जीवास सासरचा त्रास होतो. तिच्या मायबापाला सारख्या शिव्या, तिच्या माषबापाचा घडोघडी अपमान, तिचे नातेवाईक तोडणे, आत्महत्या करायला भाग

पाडणे, गळा दाबून खुन करणे, मग न्यायालयात खटले साऱ्याच बाबी.

वकीलही भारदस्त. आता मुलीचे मायबाप गरीब असले तर न्याय मिळविणे मुश्किल. खटलेच्च्या खटले खारीज होतात. आरोपी मोकळे सुटतात. पुन्हा दुसरं लग्न. तिचेही तेच हाल. पण तीच जर मुलगी श्रीमंताची असली तर असे लोक दबून राहतात.

न्यायालयात कोणकोणते खटले बरेच दिवस चालतात. पण न्याय मिळत नसतोच. येणं जाणं यात पैसा खर्च होतो. वेळही जातो.

सालं हुंडा हुंडा म्हणून मुली छळल्या जातात. मारुन टाकल्या जातात. जाळताततही. पण कुठेच सिद्ध होत नाही. ना हुंडा मागणाऱ्याला फाशी.... सगळेच सुटतात अन् सोडचिठ्ठी ही थाटात होत असते. हं सोडचिठ्ठी. पण पैसा अमाप असल्यावर हे सगळं साध्य होते. सगळया ठिकाणी पैसाच. हा पैशाचाच खेळ आहे. माणूस मेला तरीही मयतीचं सामान. शिवाय वाजा गाजा..... मांगानं मयतीसाठी जेवढा पैसा म्हटला तेवढा द्यावाच लागतो. रक्षा विसर्जण आणि तेरव्या चौदाव्या....

अर्थात जन्मापासून तर मरेपर्यंत पैसाच पैसा लागतो. अशावेळी नको हा जन्म असं सारखं वाटायला लागतं." साविनंदनं आपली खंत व्यक्त केली.

ते गोष्टी करीत करीत निघाले होते. एवढ्यात कारखाना आला. प्रवेशद्वार बंद झालं होतं. तसा रघुनाथ म्हणाला,

"भाऊ, आज बी परत जावा लागन. दरवाजा बंद झाला."

"विचारुन पाहू."

त्यांनी गेटजवळ असलेल्या माणसाला विचारलं. त्यानं उत्तर दिलं की तो गेट उघडू शकत नाही. कारण साहेबाचा तसा हुकूम आहे.

रघुनाथ व साविनंदला पश्चात्ताप होत होता. आपण फालतूच त्या अपघाताच्या मागं लागलो. मिळालं काही नाही, उलट आपली पन्नास रुपये रोजी गेली. शिवाय येण्याजाण्याचा त्रासही झाला. आपलंच चुकलं. असं त्यांना वाटत होतं.

साविनंदला सामाजिक कार्य आपल्या हातून घडलं असं वाटत होतं. पण रघुनाथचं काय? रघुनाथला माहित होतं की शुभद्रा आपल्यावर खेकसणार. ते दोघंही एकमेकांना दोष देत होते. पण नंतर त्यांनी सामोपचारानं परत जाण्याचा निर्णय घेतला.

"फक्त पाचच मिनिट. फक्त पाचच मिनिट वेळ झाला होता. घेतलं असतं कामावर तं का झालं असतं." रघुनाथ म्हणाला.

"पण रघुनाथा त्यानं नियम बिघडते ना. अशानं कोणी केव्हाही येईल. आज आपण आलो. उद्या दुसरे आपलं उदाहरण देवून आत जातील."

"तू तं हुशारच आहेस. का गरज होती तेथं वेळ घालवण्यात. का भेटलं."

"अं ते जावू दे आता. आता परत जावू."

ते माघारी फिरले होते. मात्र बराच वेळ असल्यानं ते दुसऱ्या रस्त्याने निघाले होते. हा रस्ता तेवढा रहदारीचा नव्हता. त्यामुळं लवकरच घर आलं.

रघुनाथला पाहताच शुभद्रा विचारपूस करु लागली. पण रघुनाथ तिच्यावर खेकसावून धावत बोलू लागला. त्यातच

तिला साविनंदनं समजावलं. आता साविनंदनं रघुनाथचा निरोप घेत म्हटलं.

“रघुनाथा, चलतो आता.”

“हो, उद्या लवकर येशीन.”

त्यांच्या त्या बोलण्यानं शुभद्रा काय समजायचं ते समजली. ती काहीच बोलली नाही.

साविनंद रस्त्यानं चालत होता. त्याच्या मनात रघुनाथा विषयी विचार आला. रघुनाथ आपला सगा का सोयरा, आपल्याविषयी किती प्रेम बाळगतो तो. किती आदर आहे आपल्याबाबत. आपल्याकडून त्याला काहीच मदत मिळत नसतानाही. तो आपल्यासाठी सर्व करतो अन् आपल्या घरी त्याच्या तोंडाला साधं चहाचं पाणीही लागत नाही. अन् तो तर आपली जेवणाखावण्यापासून काळजी घेतो. मागं त्याच्या पोरीच्या लग्नात सख्ख्या भावासारखा मान दिला त्यानं. तो माणूस मोठा चांगला आहे. फक्त पैशाने गेला. तो शिकला

असता तर पुष्कळ समोर गेला असता. आपल्या सारखा मागं राहिला नसता. आपण शिकलो. पण मेंढकासारखे त्याच पाण्यात गटांगळया खात आहोत. तो अडाणी असूनही बरंच काही करण्याची जिद्द त्याच्यात आहे. कामगारांना जागविण्यासाठी बरंच काही करावंसं वाटतं त्याला. पण कामगार काही जागत नाहीत. शेवटी मलाच करावं लागेल, त्यांना जागविण्यासाठी. कारण तो अडाणी आहे. त्याचं कोणी ऐकणार नाहीत ना.

आपण अनुभवानं हुशार आहोत. शिक्षणानंही.... आपलं ऐकतील कामगार. शिक्षणाने इज्जत आहे आपली. नाहीतर मालकानं केव्हाच मारलं असतं आपल्याला अन् काढूनही टाकलं असतं आतापर्यंत कारखान्यातून.

रघुनाथला जावई चांगला भेटला. देवासमान..... अडाण्याच्या घरात सोनं. रघुनाथचा अनुभव आणि आपलं शिक्षण कामगार क्रांतीस योग्य ठरेल असं वाटतं. मी कामगार क्रांती करील. त्याशिवाय मला राहवणार नाही. कामगार क्रांती झाली नाही तर माझ्या जन्माचा मला कोणता उपयोग? त्यापेक्षा मी मेलेलं बरं. असल्या सामान्य जीवनाचा मला काय उपयोग.

तो विचार करीत करीत चालला होता. एवढ्यात त्याच्या कानावर शब्द पडले,

"साविनंदा, कामाला नाही का गेला."

त्यानं इकडं तिकडं पाहिलं तोच त्याला रमेश दिसला.

"तुम्ही असं बोलू नोका. देव तुम्हाले शिक्षा देईन."

"नाही देणार. कारण त्याला जीव नाही आहे. तो आपणच बनवला आहे."

"अहो, मनाची नाही तर जनाची लाज बाळगा. तुम्ही पुजा नाय करत तं नोको करा. पण..... माझ्यासाठी तरी असं बोलू नोका."

"ठीक आहे. पण मी काही वेगळं बोलत नाही. जे गागडेबाबानं म्हटलं, तेच बोलतो. आजकाल तुझा देवही पैशासाठी रुसतो. जो त्याला जेवढे पेढे देईल अर्थात नैवेद्य चढवेल. तेवढा तो प्रसन्न होतो. अलिकडं तुझ्या देवाची किंमतही खुप वाढली आहे. हजार रुपयांना लहानशी मुर्ती. मला तसा देव नाही. असली देव पाहायचा आहे. सांग, कुठे मिळेल पाहायला?"

“दिसनच तुम्हाले. कधीतरी, कधी ना कधी दिसनच.”

“मला आता पाहायचा आहे.”त्यानं तिचा हात हातात घेत म्हटलं.

ती गप्प होती. तसा तोही गप्प झाला. विचार करु लागला. मग झोपायला गेला. बाहेर चक्क लखलखतं उन्हं. अंगाची लाहीलाही होत होती. त्या लखलखत्या उन्हात घरामध्ये अंग टाकताना झोप केव्हा लागली ते कळलंच नाही.

सायंकाळ होत आली होती. तशी बाहेर कुजबुज ऐकायला आली. क्षणात तो जागा झाला, पण कुजबुज अदृश्य होताच परत झोपी गेला.

झोपमोड झाली होती. इकडून तिकडे सारखी कुस तो बदलवीत होता. पण त्याला झोप येत नव्हती. एवढ्यात एक अलार्म झाला. त्यानं घड्याळाकडे पाहिलं. सायंकाळची वेळ झाली होती. पाच वाजले होते. तसा तो उठला. आळस काढला व हातपाय धुवायला निघून गेला. त्यानं हातपाय धुतले व फिरायला निघून गेला. सोबत पत्नीलाही नेलं होतं.

ते विस्तीर्ण मैदान होतं. त्या मैदानात काहीजण बसले होते त्या गवताळ जागेवर. जी जागा हिरव्यागार मखमली गवतानं आच्छादली होती. त्या लववर डोळे फिरवताच रोमांचकारी आनंद डोळे दिपवत होता. आजुबाजुला प्रेमीयुगल बसले होते. त्यांच्या रोमांचकारी गोष्टी ऐकायला येत होत्या. त्या गोष्टी ऐकून त्या दोघांना त्यांचं तरुणपण आठवत होतं. एवढ्यात त्याला हसू आलं. तशी ती म्हणाली,

“का झालं हसता आहात?”

“अगं मला जुनी आठवण झाली. त्या तरुणपणी दिलेली वचनं आठवतात. मधुवंते, मला माफ कर. मी एकही वचन तुला दिलेलं पुर्ण करु शकलो नाही. ना घर बांधलं. ना दार बांधलं. बस पोट भरत राहिलो अन् या इवल्या पोटासाठी काबाडकष्ट करीत राहिलो. काहीतरी नवीन करायचं ठरवलं होतं. पण काय करु, सारंच जागेवर राहिलं माझं. आज मी काहीतरी करु शकलो नाही. याची मला खंत वाटते. कारण तो कारखाना आणि माझं प्रारब्ध. माझ्याकडे स्वप्न होतं. मोठं स्वप्न. पण या तुटपुंज्या पैशात ते स्वप्न पुर्ण झालं नाही. मुलं झाली. त्यांना

मोठं करण्यात आणि शिकविण्यात अख्ख आयुष्य खर्ची घातलं. एकही रुपया जुळला नाही.’’

‘‘तुमच्याचप्रमाणे मलेही तं ते दिन आठवतेत. याच मैदानात तारुण्य काढलं. हिच झाडं. हेच पक्षी. हिच बाग. फरक आपल्यातच. आपणच बदललो. तरुणांचे म्हातारे झालो. पण आपली बाग आजही तशीच आहे. तारुण्यात आधार देत होती. आजही आधार देते. मन कंटाळलं की या बागेत यायचो. आतं बरेच दिवस झाले, आपण या बागेकडं फिरकलो नाही. या बागेचा आतापर्यंत कसा विसर पडला ते समजलंच नाही. काळाच्या गर्तेत आणि दुःखाच्या डोंगरात आपण या बागेला विसरुन दुःख करीत बसलो. जर या बागेच्या सहवासात राहिलो असतो तर आपला आनंद आजही टिकून राहिला असता. पण आज आपल्या चेहऱ्यावर आनंद नाही. आजही आशेचे किरणं नाहीत. या समद्या गोष्टींले तुमचा कारखाना जबाबदार आहे. आता आपला मुलगाच आपले स्वप्न पुर्ण करुन दाखवू शकतो.’’

‘‘हो, अगदी तसंच म्हणावं. आपल्या मुलाला नोकरी लागली उद्या तर आपण बसून खायचं. आपला मुलगा

आपल्याला पोषेल व सुन आपली सेवा करील याच आशेवर जगायचं.''

''चुकलं तुमचं. अहो या काळात कोठची सुन अन् कोठचा पोरगा. कोणी पोरगा अन् कोणती सुन सासू सासऱ्याची सेवा करत नाय. ते आस सोडा. उलट तिलेच विचारा लागते का बेटा कशी आहेस, दुखत आहे का काही. वैगेरे वैगेरे. ते सेवा करत नाय. आपल्यालेच करा लागन तिची सेवा. तसं जर केलं नाय तं आपला पोरगा आपल्याले दुसऱ्याच दिवशी सोडून जाते घरातून.''

''तुझं म्हणणं बरोबर आहे. पण मी आताच काही थकलो नाही. मी स्वतंत्र राहिल. पोरामध्ये जाणार नाही. तुला जायचं असेल तर जाशील.''

''नाही, मी काही तुम्हाले सोडून जाईन का? पती परमेश्वरच. जिथं तुम्ही तेथं मी.''

''जशी तुझी इच्छा. तू म्हणशील तसं.''

''चला आता. आपण घरी जावू. बराच वेळ झाला.''

''तू म्हणशील तसं.'' तो हसत म्हणाला.

ते निघाले होते. एवढ्यात त्यांची नजर त्या झाडावर पडली. ज्या झाडावर तरुणपणात त्यांनी नाव कोरलं होतं. स्वतःच्या प्रेमाची आठवण म्हणून. ते त्या झाडाचं निरीक्षण करु लागले. तोच त्यांना ती नावं दिसली. काहीशी ती पुसट झाली होती. तशी ती म्हणाली,

“हेच ते झाड. ज्या झाडावर आपलं नाव कोरलं होतं. बघा कसं नाव आजही आहे. पण थोडं पुसट झालं आहे.”

“हो, नावं पुसटशी दिसतात. या वृक्षांनी जणू अंतर्गर्भात आपली नावं अजूनही जीवंत ठेवली आहेत. आपण मात्र यांना विसरुन गेलो होतो. कदाचित या झाडालाही आपल्या प्रेमाचा आनंद झाला होता त्यावेळी असं वाटतं.”

“यानं आपली आठवण ठेवली. याला काहीतरी बक्षीस द्यायला हवं. पण काय बक्षीस देता येईल?”

“खत.... पाणी.... हो तेच देता येईल. कारण झाडं तर काहीच मागत नाहीत.”

“लोक आपल्याला वेड्यात काढतील. काही खुळ तर लागलं नाही ना म्हणतील.”

"म्हणू द्या. लोकांना काय? लोकांचं ऐकायचं नाय. लोकं काहीबाही बोलतात. लोकं सीतेला वनवासात पाठवायला सांगतात. रामाचा संसार तोडतात. झाडं आपल्याला सर्वकाही देतात. त्यांना पुरेसं खत न पाणी दिलं तर काय होईल. पण आपला स्वार्थ आपण त्यांच्याकडून सगळी अपेक्षा करतो आणि जेव्हा द्यायची वेळ येते, तेव्हा त्याला कापून टाकतो. हा कुठला शहाणपणा. हा तर फसवणुकीचा प्रकार. साधे त्यांना बदल्यात सहानुभूतीचे बोल देत नाही आपण. सगळे शैतान तुमच्या कारखान्यातल्या मालकांसारखे."

ते विचार करीत होते. झाडांना काय बक्षीस द्यावं. याचा विचार त्यांच्या मनात होता.

"हं समजलं, आपण याला बागवानाकरवी खत टाकायला लावू. त्याला पैसे देवू."

"कुठले पैसे देणार!घरी उपाशी राहून. अन् त्या बागवानानं त्याले खतच टाकलं नाय तर...."

" हो तेही आहे तर...."

“अहो, झाडांना खत मिळतं, पाणी ही मिळतं जमिनीतून. तुम्ही टाकायची गरज नाय. काहीतरी उगाच सोंग करु नोका.”

“आपण आपल्या डोळ्यासमोर टाकायला लावू.”

“तुमच्या डोळ्यासमोर टाकायला तो का तुमचा नोकर आहे का?”

“थोडीशी तर माणुसकी असेलच त्याच्यात.”

“तुमच्यात आहे म्हणून काय सर्वानाच माणुसकी आहे का? अहो शेकडो रुपयाचं खत सरकार कडून येते. हे लोक तेच खत टाकत नाय. मंग तुमचं खत कसं टाकणार. मले तं वाटते का हे भ्रष्टाचार करणेवालेच खरं तं सुखी आहेत. अन् आपण इमानदार सदाचे भिकारी.”

“पण ते समाधानी तरी आहेत का

“ते जावू द्या. इथं समाधान कोणं पाहिलं.”

“खरं तर तु फार हुशार आहेस.”

“हो, पण तुमच्या पेक्षा अधिक नाही. कारण तुम्ही माझे पती आहात. अन् तुमच्या सहवासात माह्यासारखीची बोलभाषा बी सुधरत आहे.”

“हो. पण पुर्ण बोलायचा प्रयत्न करत जा.”

"पण मधेमधे बोलतानी नाय आठवत, त्याचं काय?”

“तू माझ्या पुढे जावं असं वाटतं कधीकधी.”

“पण कशी जाणार. मले सात जन्मांचं पाप नाय का लागन.”

“का बरं?”

“मी पत्नी आहे तुमची. तुम्ही माझे पती आहात. पती परमेश्वर असतो. परमेश्वराच्या का पुढं भक्तानं जावं.”

“वेडी गं वेडी.”

“धत! चला आता. रात्र झाली आहे. पोरं वाट पाहात असतीन.” ती ओशाळली व हसत हसत म्हणाली. घरी चालण्याची विनंती करु लागली.

रात्रीचे नऊ वाजले होते. जेवन आटोपलं होतं. बाहेर चांदण्यांचा लख्ख प्रकाश पडला होता. आकाश पृथ्वीला चुंबत आहे की काय असे वाटत होते. पण साविनंदला झोप सुखावत होती. तो दुपारी झोपला होता तरीही. कारण त्याच्या मनात उद्याची चिंता होती.

बाहेर शितल चंद्राचा प्रकाश. साविनंदा अंगणात झोपला होता. कारण उन्हाळ्याचे दिवस होते. कुंत्री मात्र भुंकत होती आणि हिच कुत्री साविनंदाच्या झोपेला आड येत होती.

अंगणात झोपले असतांनाही उकाडा जाणवतच होता. अशातच दिर्घ प्रतिक्षेनंतर थोडीशी झुळूक आली हवेची. मनाला बरं वाटलं. तसाच एक विचार, जो स्वस्थ बसू देत नव्हता. मी कामगार राज्य स्थापन करणार. एरवी त्यानंतर कोणताच भांडवलदार कोणत्याच कामगारांचा अपमान तर करणार नाही. पण क्षणात झोप लागली.

झोपेत त्याला स्वप्न दिसलं. त्या विस्तीर्ण पहाडाचं. ज्या पहाडावर रस्ताही संपत नव्हता आणि त्याचं चालणंही. भर

दुपारची वेळ. तो सारखा चालत होता. हातात एक पावडे. बहुतेक काम करायला आपण कुठेतरी जात आहोत असं त्याला वाटत होतं. तसा कारखाना आला.

"आजही वेळ." सुपरवायजर म्हणाला.

"होय, का बरं?"

"जा घरी जा."

"नाही जात."

"ही काही तुह्या बापाची जहांगीर नाही उशीर करायला."

"तुम्ही येता तं दररोज उशीरा."

"आम्ही मालक आहोत."

"असाल मालक आम्हाला काय करायचं. पहिलं स्वतः येत चला. मग आम्हाला सांगा."

"ए सावद्या, जास्त बोलू नको. नायतं...."

"नायतं, नायतं का कराल...."

"झापड मारीन एक."

“मारा बरं.”

सुपरवायजरनं एक थापट साविनंदला मारली. तोच रागाने लाल होत साविनंदा म्हणाला,

“मालक मलाही मारता येते. पण.... पण तुम्ही मालक आहात. म्हणून विचार करतोय.” तशी पुन्हा एक थापड साविनंदला दिली. तसा साविनंद पुन्हा म्हणाला,

“मालक खबरदार, , आतं माराल तर..... चांगला चोपूनच काढील.” त्याचा आवाज चढला होता. अशातच त्याला मधूनं आवाज दिला व क्षणार्धात तो जागा झाला.

“का झालं?”

“काही नाही. स्वप्न होतं.”

“कोणतं?”

“मी कुदळ घेवून डोंगर चढत होतो. रस्ता संपत नव्हता.”

“स्वप्न तर चांगलं आहे.”

“म्हणजे?”

“अहो, तुम्हीच म्हणताय ना का मी कामगार क्रांती करीन. तेच दाखवलं स्वप्नात.”

“म्हणजे?”

“अहो हे कामगाराची दैन्यावस्था पुर्ण कराले तुम्ही डोंगर चढत आहा. पण लक्ष अजून दूर आहे हे दाखवलं स्वप्नानं तुम्हाले.”

“असं होय.”

“बघा, , लवकर उठा अन् लवकर तयारी करा अन् लागा रस्त्यानं लवकर. नायतर आजबी उशीर होईन.”

“हो हो, तुझं म्हणणं बरोबर आहे. मी लवकर तयारी करुन निघतो.”

“तशीही पहाटेची स्वप्न खरी होतात.”

“हं तुझ्या खुळचट समजूती. एखाद्यानं म्हणावं पाऊस पडणाार अन् पाऊस येणार अशा. खरंच त्याच्या बोलण्यातून पाऊस येतो का? पण त्याला वाटते आपलं सत्य झालंय. तसंच

तुम्ही चंद्र सुर्याले देव मानता. पण चंद्र सुर्य काही देव नाहीत. चंद्र दगड आहे. सुर्य आगीचा गोळा. शास्त्रज्ञाचे बोल.”

“तसं नाय. अहो, चंद्र सुर्य हे आळशी होते. पण त्याईले शराप देला. ऋषीनं का तुम्हाले वर्षानुवर्ष दगडधोंडे बनून राहा लागन. माही आजी सांगायची कथा लहानपणी.”

“बरं बा, तू मोठी.. मी लहान. अगं त्या हिमालयात जे साधू दहा दहा महिने अंघोळ करीत नव्हते. ते ऋषी..... त्यांचा शाप तरी कसा लागन?”

“म्हणजे?”

“म्हणजे हिमालयात टेकडीवर साधू तप करायचे. पाणी मिळायचं नाही टेकडीवर. मग कशाची आली अंघोळ? अन् त्यांच्यात जर शाप देण्याची शक्ती असती तर त्यांनी आपल्या मंत्रानंच सर्व काही उत्पन्न केलं असतं. आपल्या दारी फिरले नसते.”

“तुम्ही का ते अंघोळ करतेत का नाय ते पाहाले गेले का कधी?”

“अन् तू देखील ते अंघोळ करताना पाहिलं का डोळ्यानं.”

“हो, टीव्हीवर बघते.”

“अगं प्रत्यक्षात सांग.”

“नाय, प्रत्यक्ष नाय पाह्यलं.”

“ऐकतर, एक शंकराचं मंदिर होतं. तिथं एक साधू नेहमी बसायचा. दररोज येणारी जाणारी मंडळी पैसा देत. मिही त्याला पैसे दिले. पण मी ज्या मित्राच्या घरी मुक्कामाला होतो, तिथं रात्री पार्टी झाली. त्यात हा देखील साधू आला होता. चांगली दारुची जंगी पार्टी रंगली होती. अगं डोंगराळ भागात उपजीविकेचं साधन नसल्यानं साधू असा वेश करतात. केवळ वस्त्र परीधान केल्यानं साधू बनत नाही. ठीक आहे मित्रानं सांगितलं म्हणून मला त्या साधूरुपी माणसाचा साधूपणा कळला. नाहीतर मिही त्याला साधूच समजलो असतो तुझ्यासारखा. तसंच त्यानेही कबूल केलं की तो जटाशंकरला बसतो.. इथं ओसाड जागा. हाताला काम नाही. म्हणून हा धंदा. परंतू हा धंदा करायला मनाई नाही, पण असला धंदा करुन त्यातून दारुसारखे पेय घेणं मला आवडलं नाही.”

“बरं ते जावू द्या. नाहीतर गोष्टीगोष्टीत अजून वेळ होईल.”

"बरं!" असं म्हणत तो उठला व कामावर जाण्याची तयारी करु लागला.

तो कामाची तयारी करु लागला. तोच त्याला विचार आला. देव..... आमच्या देशात दरवर्षी दुष्काळ पडतो. कधी साथी येतात रोगाच्या. कधी प्लेगची साथ. कधी कोणत्या रोगाचा प्रादुर्भाव. मग कर्ज घ्यावं लागतं, कधी लाखोचा माल. कधी या साथीत वेळेवर माल नाही मिळाला तर माणसे उपासमारीनं मरतात. मग देव का वाचवत नाही त्यांना आहे तर. देव वेळेवर पाऊस का पाडत नाही. आम्ही देव मानतो खऱ्या साधूला नाही तर ढोंगीपणा करणाऱ्या साधूंना. त्यांच्या शिव्यात आम्हाला देवपण दिसतं.. त्यांचं उष्ट आम्हाला प्रसाद वाटतो. एखाद्या वेळी त्याची थापट मारणं आम्हाला आशिर्वाद वाटतो. चंद्रग्रहण सूर्य ग्रहण कसं होते ते सिद्ध होवूनही आम्हास ते कळलं नाही. आम्ही चंद्रग्रहण सुर्यग्रहण जेव्हा असते, तेव्हा उदास होतो. ही अंधश्रद्धा. जबरदस्त अंधश्रद्धा. लोकं आजही डॉक्टरकडे जात नाहीत. मांत्रीकाकडे जातात. रोगं सुधारायला. काही काही रोगं प्रतिकारशक्तीनं सुधारतात. नाव मांत्रीकाचं होतं. ज्याला रोगाबद्दल काहीच कळत नाही. तरीही आम्हाला

समजत नसल्यानं आम्ही त्यांचा स्विकार करतो. बकरा देवीला भाव म्हणून देतांना त्याच्यावर पाणी टाकतो. त्यानं अंग झटकलं की भाव घेतला असं मानतो. थंडीमुळे बकरा अंग झटकणारच. माणसाला थंडी लागते अन् बकऱ्याला न लागेल कशावरुन? देवीला हे घाणेरडे कृत्य चालत नाही. पण आम्हाला चालते. देवी कोण्या बकऱ्याचा भोग घेत नाही. आम्ही घेतो. आम्हालाच खायचा असतो त्याला. उगाच देवाला बदनाम करतो. ही आमची परंपरा. शिवाय बकरा फडफडलाच तर मांत्रीक सांगतात. देव तुमच्यावर प्रसन्न आहे. खरंच देव प्रसन्न होण्याशी व बकरा फडफडण्याशी कोणता संबंध आहे. तरीही आम्ही तो संबंध जोडतो. मग काय बकऱ्याचा नवश दिल्यानं आमचा जीव सुरक्षीत राहतो का? आम्ही अमर आहो का? असा भाव दिल्यानं जर आम्हाला अमरत्व मिळत असेल तर ठीक आहे. बकरा अवश्य कापावा नवश म्हणून. पण जिथं अमरत्व नाही तिथं भाव देणे ही प्रथा कशाला? मरण अटळ आहे. जन्मास आलेला प्रत्येक जीव कधी ना कधी जाणारच. मग असं असतांना माणसानं फक्त नी फक्त आनंद देवून जावं. पण हा आनंद देण्याऐवजी आम्ही आमच्याच माणसांना, जे

गरीब आहेत, त्यांना त्रास देतो. झोपडपट्टीत राहतात म्हणून क्षीण समजतो.

झोपडपट्टीत राहणारी ती माणसे. नशा करतात. आम्ही त्यांना वाईट म्हणतो. पण ती नशा दुःखापायी करतात. कसलंतरी दुःख असतं त्यांच्याही आयुष्यात. ते दुःख विसरण्यासाठी सहारा घेतात ते नशेचा. यातच आयुष्याचा वेळ आणि पैसा हातातून निघून जातो. चांगले दिवस कधीच उजळत नाही त्यांच्या आयुष्यात. त्यांना कोणी काही म्हटल्यास आवडत नाही. पण पर्याय नसतो. जेव्हा या झोपडपट्टीतून सभ्य माणूस जातो, तेही नाकाला पदर लावून. त्या सभ्य माणसाला किळस येते या वस्तीची. पण ते हे विसरतात की आपलाही जन्म याच किचळातून झाला. आईच्या गर्भात किती किचड होता. खरं तर या वासातही सुगंध असतो. याच चिखलातून एखादा गुणवंत पुढे येतो एखाद्या चिखलात उमललेल्या कमळासारखा. पण त्याचं उचंबळणारं मन समाज बांधून टाकतं. त्याला वर येवू देत नाही. ज्याप्रमाणे हात बांधावे तसे. त्याचं मन न तुटणाऱ्या धाग्यांनी बांधून टाकलं जातं.

किती जीवाच्या वेगवेगळया छटा. एकीकडे एसीच्या हवेत जगणारी माणसं दिसतात. तर दुसरीकडं हो दिर्घोद्योगी मंडळी. ऊन, वारा, पाऊस झेलीत काट्याकुट्याच्या झोपडीत राहतात. काय विषमता आहे ही?

वेश्याव्यवसायासारख्या समस्याही याच झोपडपट्टीत. पैसा नसतो. कोणी हाताला कामंही देत नाही. मग काय करायचं तर वेश्याव्यवसाय. जीवंत राहायला पुरेसा पैसा लागतो. म्हणून याच झोपडपट्टीत त्या सुंदर तरुणी आपलं इमान तर विकतात. शिलंही विकतात. त्यांना माहित असते की आपल्याला आपले शिल विकण्याशिवाय पर्याय नाही. त्यालाच आम्ही नवीन नाव देतो वेश्यावस्ती.

खरंच तिला वेश्यावस्ती म्हणावं का? एखादा मुलगा त्या ठिकाणी खुप शिकला, तरी त्याच्या गुणांची कदर होत नाही. पुढलं शिक्षण शिकायला खुप पैसे लागतात. हा पैसा जवळ नसल्यानं ते शिकत नाहीत. शिवाय नोकरी मिळवासाठी भरपूर डोनेशन. सरकारनं या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं. जे दोन वेळच्या जेवनाला महाग असतात. ते पैसे कुठून देणार? कुठून नोकरीसाठी एवढे डोनेशन भरणार. ह्याच गोष्टी पुढे कोणी

शिकवीत असेल आपल्या बापाला तर त्याला ऐकवतात. यामुळेच की काय त्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या आशा संपुष्टात येतात. नव्हे तर शिक्षणाच्या वाटा खुंटतात. त्यातच एखाद्याला नोकरी लागलीच तर तो या झोपडपट्टीत राहात नाही. तो सोडतो या झोपडपट्टीला. पुन्हा कधी येवूनही पाहात नाही या झोपडपट्टीत आणि ज्या झोपडपट्टीतून आपण वर आलोत ही भावना ठेवून या झोपडपट्टीसाठी काही करण्याची भावनाही कोणी ठेवीत नाही.

एकीकडे अमाप पैसा पगारातून मिळतो की त्या पगारातून त्याला ऐषआराम करता येतो. ते करतातही ऐषआराम. तर दुसरीकडं एका चतकोरासाठी संघर्ष करावा लागतो. जो देव मुका आहे, त्याच्या मंदिरात करोडो रुपये दान केले जातात. अन् जिथे जीवंत देवाचा वास आहे. त्याला अपशब्द. ह्याच माणसांनी जर गरीबांसाठी अन्नछत्र चालवली तर देशात गरीबीचा नायनाट होईल. गरीबी राहणार नाही.. झोपडपट्ट्याही दिसणार नाहीत. पण आम्हाला हे करावंसं वाटत नाही. कारण आम्हाला आमची पोळी शेकता येत नाही. आम्हाला फक्त

आमचं घर पाहता येतं. आमचं सरकार आंधळं असल्यानं आम्हाला आमच्या सरकारचा लाभ उठवता येतं.

आमचं सरकार आंधळंच आहे. कारण काही काही कुटूंबात चार चार नोकरीला असतात. तर काही काही कुटूंबात एकही नसतो.

शासनातही काही मुर्ख लोकं आहेत. त्यांच्याकडे पाहून असं वाटते की त्यांनी कधीही गरीबी अनुभवली नसावी. कारण त्यांना कधीच गरीबांविषयी कळवळा जाणवत नाही. ते पार्ट्या सभा संमेलने यात व्यस्त असतात. या पार्ट्यात जेवढा पैसा उधळला जातो. तेवढा पैसा गरीबांना मिळाला तर त्यांचे पोट जगेल. पण ते तसे करीत नाही.

श्रीमंतांचे तर विचारुच नये. ते तर एवढा पैसा जमा करतात की त्या पैशाला उधळी लागते. साठ साठ हजार एकीकडे वेतन असतं. तर गरीबांना महिन्याला पंधराशे रुपये मिळतात. कसा चरीतार्थ चालवावा हे गरीबांना कळत नाही.

नेतेही आमचे तसेच. निवडणूक आलीच तर ते आमच्याच झोपडपट्टीत येतात. चिखलावर बसतात. दारु वाटतात. पैसा

वाटतात.. ते यावेळी ज्यांचं वेतन वाढवलं त्यांच्याकडे जात नाही. ते आम्हाला ध्येयधोरण सांगतात. आधीच नशेतल्या माणसाला पुन्हा नशा देण्यासाठी ते दारुचं आमीष दाखवतात. ज्या दारुनं आमची जीवनी खराब होते. तिच दारु निवडणूकीत आम्हाला मतदान करण्यास भाग पाडते.

महागाई कमी करु हे फक्त सांगितलं जातं. महाागाई कमी होत नाही. एखाद्यानं यावर बोलण्याचा प्रयत्न केलाच तर ती झोपडपट्टीच हटवली जाते. मग ज्यांना पगार मिळतो. शासन देतं. मतदानाची सक्ती केली जात नाही. अशांकडे निवडणुकीच्या वेळी नेते जात नाहीत, आमच्याच झोपडपट्टीकडं का येतात बरं? ज्यांचं वेतन वाढवलं त्यांच्याकडे जावं.

महागाईच्या या गर्तेत व्यापारी सुद्धा मजूरांना लुटतात. शिवाय अशा लोकांना निवडून आणण्यासाठी हेच भांडवलदार, व्यापारी पैसा पुरवतात. एकदा का ते निवडून आलेच तर व्यापारी व भांडवलदारांना पाहिजे तेवढ्या सवलती दिल्या जातात. मग हेही व्यापारी आपल्या सचौटीचा वापर

करुन वस्तूंची एवढी किंमत वाढवतात की ती किंमत गरीबांना मोजणे असह्य होते.

नेते मात्र झोपडपट्टील्या गरीबांच्या भरवशावर निवडून येतात आणि नाव भांडवलदारांचं होते. त्यांना वाटते की आम्ही पैसाच जर लावला नसता तर हे निवडून आलेच नसते. पण आमच्या झोपडपट्टीतल्या बांधवांची पुढची निवडणूक येईपर्यंत कधीच आठवण येत नाही. निवडून आल्यानंतर शासनापाशी पैसा नाही. संपुर्ण पैसाा फस्त झाला अशी दर्पोक्ती जोडली जाते. पण या निवडणुकीच्या पैशाचा हिशोब दिसत नाही शिवाय शासनाजवळ पैसा नसतो तर मग नेत्यांच्या सत्कार समारंभाला पैसा कुठून येतो. पण अशावेळीही नेत्यांजवळ उत्तर असते. आम्ही आमचा पैसा देत नाही. लोकंच आमचा सत्कार समारंभ घेतात. पण त्यांच्यापासून काही मिळत नसेल तर कोणी कोणाचा सत्कार समारंभ कसा घेतील?

यामुळेच देशात बेकारी व इतरही अनेक समस्या निर्माण झाल्या. जवळ पैसा नसल्यानं झोपडपट्टीतील लोकं चोऱ्या करतात. कोणी सुपारी घेवून खुनंही करतात.

ते सुखवस्तू कुटूंब होतं. साविनंद मधुवंतीचं ऐकत होता. कामगार दिवस नुकताच संपला होता. पण एक नवीन आशा देवून. या आज उगवलेल्या सूर्याला मिठीत घेवू पाहात होता. उद्याचा नवीन सुर्य हा त्या काहीतरी नवीन घेवून येणार होता.

कामावर जायला उशीर होत होता. तशी त्यानं तयारी केली. त्यासाठी तो अंघोळीला गेला. त्यानं अंघोळ आटोपवली. तसंच टावेलनं अंग पुसलं कपडे घातले. तसं जेवन तयारच होतं. त्यानं जेवन केलं. डबा बांधायला लावला व डबा सायकलवर लटकवून तो कामावर जायला निघाला.

कामावर जाता जाता त्याच्या मनात विचार आला, खरंच आपण स्वतंत्र आहोत का? आज आपण स्वतंत्र असूनही स्वातंत्र्याची वाट पाहात आहोत. खऱ्या अर्थानं आपण स्वतंत्र झालो नाहीत. मग असले स्वातंत्र्य कोणत्या कामाचे? तसं पाहिल्यास आपला देश सर्वसंपन्न आहे. पण तरीही आज खरी स्वतंत्र्यता नाही. खरं पाहता सर्वच घटकांना पोटाला अन्न

मिळत नाही. ज्यांना मिळतं त्यांना मस्ती आल्यागत ते वागतात. ते मात्र सुखी असतात. पण आपल्यालाच सर्वात जास्त दुःख आहे असं दाखवतात. त्यांच्या डोळयात अश्रू नसतात मुळी. पण डोळयातही अश्रू आहेत असंच दाखवतात. जे काबाडकष्ट करतात. ते सुखी नसतात. पण खरं पाहता तेच सर्वात सुखी वाटतात.

फिरुन फिरुन माझ्या मनामध्ये एकच विचार येतो. तो म्हणजे कामगारांचे काय होईल? कामगार आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करतात. पण खरंच कामगार सुखी आहेत का?

खरंच कामगार सुखी आहे काय? खरंच कामगार स्वतंत्र्य तरी आहे काय? त्यांना न्यायालयानुसार अभय दिलेले आहे काय? खरंच न्यायालयातून कामगारांना न्याय तरी मिळतो काय? या सर्व प्रश्नांचं उत्तर नाही असेच येईल.

आज देशात कामगार दिसतात. उन्हातान्हात राबत असलेले कामगार. सकाळपासून तर दिवसभर गरम भट्टीसमोर ही राबत असलेले कामगार दिसतात. तसेच त्यांचे श्रम विकून त्यांच्याच भरवशावर काम न करता तसेच जास्त श्रम न करता गर्भश्रीमंत बनलेलेही भांडवलदार आपल्याला दिसतात. यांना

उन्हातान्हात काम करुन काही मिळत नाही. भट्टीत राबूनही काही मिळत नाही आणि त्यांना एसीच्या आलीशान कमऱ्यात बसून सारंकाही मिळते. पण तरीही ते, ते कामगार खुश तर आम्हीही खुश. असे कधीच मानत नाही. हीच कामगारांची वास्तविकता आहे. कामगारांच्या बाबतीत सांगायचं झाल्यास पृथ्वी कामगारांच्या तळहातावर उभी असल्याचं मत विचारवंत मांडतात. ते खरं आहे. पण बदल्यात कामगारांना काही मिळत नाही. उलट कॅंन्सर, श्वसनाचे आजार. सततच्या दिवट्यांची पाळी बदलल्याने पोटाचे विकार होतात नव्हे तर निरनिराळ्या आजारांनी हे कामगार त्रस्त असतात.

जागतिक कामगार दिन. देशात नाही तर जगात मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. नव्हे तर कामगार दिनाला नवं नाव देवून नवीन राजकारण निर्माण करण्यात आलं.

१मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. का साजरा करण्यात येतो. त्याही पाठीमागे कारणं आहे. जागतिक दर्जाचे इग्लंड, डच, पोर्तुगीज या देशांनी उद्योगाचे महत्व लक्षात घेवून आपआपल्या देशात उद्योग उभारणी केली. याचं मुळ कारण तेथील ज्ञानाचा प्रसार व

संशोधन. अठराव्या शतकात या युरोपीयन लोकांनी नवनवे शोध लावले. त्या शोधाच्या आधारानं वस्तूंचं उत्पादन जास्त झालं. शिवाय जागतिक बाजारपेठेत ह्या वस्तू विक्रमी स्वरुपात झाल्यानं तो पैसा गुंतविण्यासाठी त्यांना वेगळया बाजारपेठा शोधणे भाग होते. त्यातच या देशांनी आपला पैसा उद्योगाच्या रुपात दुसऱ्या देशात गुंतवला. जे अविकसित देश होते. यात कारण होतं, पैसा जास्तीत जास्त कमावणे व उद्योगाचा प्रसार करणे. तसेच आपल्या देशाचा औद्योगिक विकास करणे. असले उद्योग धंदे अविकसित भागात उभारले जात होते. कच्चा माल ते कमी दामात घेवून जात आणि पक्का माल या देशात आणून विकत.

महत्वाचे म्हणजे या भांडवलदारांना उद्योगात जास्त फायदा झाला कारण मजूरांचे कामाचे तास. मजूरांच्या कामाचे तास ठरलेले नव्हते. ते बारा बारा तास काम करीत. बदल्यात सुट्ट्याही मिळत नव्हत्या. तसेच वेतनही अत्यल्प होते. त्यामुळे साहजीकच कामगार संतापले आणि त्यांनी क्रांती केली. तीच औद्योगिक क्रांती होय. या क्रांतीनुसार कामगारांच्याही स्वप्नाचा एक दिवस असावा. तो दिवस कामगार दिवस . या

पहिल्या कामगार दिनाचे आयोजन सिंगरवेल्लू चेत्तीअर याने मद्रास इथे केले. लालबावटा ही निशाणी होती. तसेच हा कार्यक्रम मद्रास उच्च न्यायालयासमोर साजरा झाला होता. तसेच हा कार्यक्रम लेबर किसान पार्टी हिंदुस्तान संघटनेने साजरा केला.

कामगार दिनाच्या निमित्याने या दिवशी संपुर्ण कामगारांना सुटी असते. ते या दिवशी कार्यक्रमाचं आयोजन करतात.

विशेषतः ज्यावेळी म्हणजे १८९१ ला कामगार दिनाची स्थापना झाली. त्यावेळी या कामगार दिनाच्या दिवशी खालील गोष्टीची शपथही घेण्यात आली. चौदा वर्षे वयाखालील मुलांना कामाला ठेवू नये. कामगारांच्या कामाचे तास बारा वरुन आठ तास करावे. महिलांना कामगार म्हणून विशेष सुट असावी. रात्रपाळीतील कामगारांसाठी वेगळे नियम असावे. कामाच्या बाबतीत सांगायचं झाल्यास समान काम व वेतन असावे. नव्हे तर त्याबाबतीत कायदाही करण्यात आला. त्यानुसार कर्मचारी(कामगार)वागायला लागले. कामगार युनियन तयार झाली.

आज जगात कामगार युनियन आहे. पण सक्षम असल्यासारखी वाटत नाही. कामगार दिनी ठरविण्यात आलेले सर्व नियम आज भांडवलदारांनी धाब्यावर बसवले आहेत अर्थात पाळले जात नाही. चौदा वर्षे वयाखालील बालके आजही काम करतांना दिसतात आणि दिसणार का नाही? कधीकधी त्यांची काम करण्यामागे मजबूरीही असते. जर लहाणपणी मायबाप अपघातात मरण पावलीत तर ते आपले पोट कसे भरतील? त्यामुळे साहजीकच या कामगार नियमाला मर्यादा पडतात. तसेच काही लोकं मजबुरीनं लहान मुलांना राबवितात आहेत.

आम्ही लहान मुले जेव्हा राबतांना पाहतो. तेव्हा आमच्यात दया करुणा निर्माण होते. पण त्यांच्यासाठी आम्ही का करु शकतो? एका जिल्ह्यात एका गावी एका शेतकऱ्याला पीक न झाल्याने त्याने आत्महत्या केली. घरी त्याच मानसिक धक्क्याने आई आजारी पडली. घरी एक लहान बहिण तिही दूध पिती होती. त्यामुळे परीवार सांभाळण्यासाठी त्या लहान मुलाला काम करावे लागेल की नाही. तो घरी स्वयंपाक बनवायचा आणि आपल्या लहान बहिणीलाही चारायचा. तसेच घरी

असलेल्या बकरीचे दूध काढून ते दूध ते विकून आलेल्या पैशातून तो घर चालवायचा. आईला त्रास द्यायचा नाही. दुपारी बक-यांना रानात चारायला न्यायचा आणि सोबत बहिणीला घेवून जायचा. कारण आई बेडपेशंट झाली होती. हे दृश्य जेव्हा मी पाहिले. तेव्हा माझं हृदय तसं म्हणणार नाही की बालकांनाही काम करायचा अधिकार नसावा. पण ते काम करतांना त्याची कोणती मजबूरी आहे हेही पाहणे तेवढेच गरजेचे आहे. कारण कोणी अशांना दत्तक घेत नाहीत. त्याचबरोबर त्या परीवारालाही. मनात निश्चयही करीत नाही की आता आपण या लेकरांसाठी जगायचंय. जगात अशी मुलं भरपूर आहेत. पण कोणीच या मुलांची, या मुलांची धात्री बनत नाही. नव्हे तर कोणीही त्या मुलांचे पालकत्व घेवून जगत नाही. त्यांनाही जगवते त्यांचं काम. कारण त्यांच्या ओळखीचे नसतात. आम्ही मात्र त्याचा विचार न करता केवळ लहान बालकाच्या कामावर बोट ठेवतो. त्यांच्यासाठी काही करीत नाही. आपल्याला कळवळा आहे त्या बालकांबद्दल. मनात दयाही येते. पण आपल्याला त्या सेवेत मर्यादा येतात. प्रथम आम्ही आमचा परीवार पाहतो. माझी पत्नी माझी मुले काय म्हणतील हा पहिला प्रश्न. जिथे आम्ही आमच्या म्हाताऱ्या

आईवडीलांचं करु शकत नाही. त्यांना वृद्धाश्रमाची वाट दाखवतो. त्यात या अशा बालकांचं काय? आम्ही एका पोराची जबाबदारी स्विकारु शकत नाही. तिथे ही तर एवढी मुलं. आम्हाला कौतूक आहे कामगारदिनाचं. पण कामगारदिन साजरा करतांना या मुलांचा विचार कोणी करीत नाही. कारण आम्हाला ते बालकामगार वाटतात.

कामगार दिवसाच्या निमित्याने महिलांसाठीही कायदे बनवले. पण खरंच आज महिला कामगार तरी सुखी आहेत काय? आज महिला कामगारांना भांडवलदाराच्या इशाऱ्यावर नाचावं लागतं. भांडवलदारांनी जे म्हटलं ते त्यांना करावं लागतं. भांडवलदारही या महिलांवर लैंगीक अत्याचार करतात. बिचाऱ्या महिला त्या अत्याचाराला सहन करीत आपलं काम करीत असतात. नव्हे तर कधीकधी त्यांना स्वतःची इज्जतही वेशीवर टांगावी लागते. काही काही ठिकाणी तर कामाचे आठ तास ठरवून दिलेले असतांनाही महिला कामगारांकडूनही बारा ते पंधरा तास काम घेतलं जातं. महिला कामगारांनाही मजबुरीनं ते काम करावंच लागतं.

आज देशातील परीस्थिती समान काम आणि समान वेतनाची दिसत नाही. एकाच कामासाठी वेगवेगळा पगार कामगारांना आहे. त्यांच्यावर अनन्वीत अत्याचार रोजच होत असतात. न्यायालयात कामगार कायद्याअंतर्गत कामगारांनी आंदोलन केल्यास वा न्यायालयात दाद मागितल्यास त्या कामगारांना कामावरुन काढून टाकले जाते. साक्षीदारासह न्यायाधीश, वकील यांना विकत घेवून न्यायदान पलटवलं जातं.

१८९१ मध्ये जाहीर केलेल्या नियमानुसार ८० देशांनी कामगार दिनाची सुटी कामगारांचा गौरव म्हणून जाहिर केली नव्हे तर या दिवशी उत्कृष्ट कार्य करणा-यांचा गौरव केला गेला. पण आज याच कामगार दिनी आम्ही कामगारांना सुटी न घेता कामावर जातांना पाहतो आहे. देशातील वाढत्या महागाईने आपल्या परीवाराची उपासमार होवू नये म्हणून राबतांना पाहतो आहे. तेव्हा असे वाटायला लागते की कामगार दिन या कामगारांसाठी आहे की या देशात राज करणाऱ्या भांडवलदारांसाठी. साधा सुज्ञ सुशिक्षित वर्ग जिथे या कामगार दिनी सुटी उपभोगत नाही. तिथे सामान्यांचे काय? असेही प्रश्न

मनात घिरट्या घालतांना मन कसं विचलीत होतं. हे न सांगीतलेलं बरं. तरीही आम्ही कामगार दिवस साजरा करतो. कळत न कळत कामगारांचा दिवस समजून..... हा आमच्यासाठी भाग्योदय असला तरी इतर देशासाठी नाही. इतर देशासाठी हा कामगार दिन, आजही कामगार दिनाचं राजकारणच आहे हे न सांगीतलेलं बरं.

देशातलं सरकार मात्र कामगारांच्या सुखासाठी सर्व कार्य करीत असल्याचा कांगावा निर्माण करते. त्यांच्या मनात एक आणि कर्तृत्वात एक असे कधीकधी जाणवते. हे सरकारही कामगारांचं एकतर्फी शोषण करतांना दिसते. नव्हे तर देशातही महागाई भुमितीय पद्धतीने वाढत असली तरी वेतन मात्र भुमितीय पद्धतीने वाढत नाही. ते बीजगणितीय पद् धतीने वाढते. ऐन निवडणुकीच्या काळात वेतनआयोग मंजूर होतात. निवडणूक संपली की बस कामगारांना कोणीही ओळखत नाहीत. स्वतःचे वेतन मात्र हे आमदार खासदार दुपटी तिपटीने वाढवून घेतात. हिच कामगारांच्या बाबतीतली खरी शोकांतिका आहे.

जग तीन गोष्टीवर आधारले आहे. किसान, कामगार आणि सैनिक. त्यापैकी राबणारे हात(कामगार)जर आपल्याजवळ नसेल तर आपल्या देशाचा विकास होवू शकणार नाही. हे लक्षात घ्यायला हवं. जर का हे हात आपल्याजवळ नसतील तर हा देश केव्हाचाच संपेल.

आज जगात कामगार आहेत. पण उद्योग धंदे तेवढ्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. प्रत्येक हाताला काम नाही. बेरोजगारी वाढत चाललेली आहे. काम नसल्यामुळे व पोट जगवता येत नसल्याने बेरोजगार आत्महत्या करुन मोकळे होत आहेत. राजकारणी मात्र मजेत आहे. हेच का कामगारांसाठी असलेलं मुक्त स्वातंत्र. कामगार स्वतंत्र्य तरी आहे काय? यावर प्रश्नचिन्ह उभं राहात आहे. कारखान्यात कामगारांचा नुसता छळ. कामगारांने जर का मालकांच्या विरोधात काही बोलण्याचा प्रयत्न केलाच तर त्याला कारखान्याच्या भट्टीत टाकलं जातं. नव नव महिने या कामगारांकडून फक्त आश्वासन देवू देवू काम केलं जातं. करुन घेतलं जात. पण बदल्यात काहीच मिळत नाही. हाच का कामगार दिन.

१मे ला कामगार दिन साजरा झाला. कामगारांनी जल्लोशात हा दिवस साजरा केला. पण त्यांच्या स्वातंत्र्याचं काय? त्याच्या श्रमाच्या भरवश्यावर ते कारखानदार अल्पावधीत खुप श्रीमंत बनतात. पण यांना काय मिळतं? मजबुरीनं लहान बालकांचेही श्रम विकत घेतले जातात. बदल्यात काय मिळतं? फक्त पोटभर जेवण. खानावळीत काम करणारे आमचे मजूर बंधू त्या ठिकाणी काम करुन थकतात आणि तेथील जेवण जेवतात. शेवटी महिना भरल्यावर हा मजूर मालकाला पैसे मागायला जेव्हा जातो. तेव्हा त्याला मालक पैसे न देता म्हणतो,

"तुनं जेवणच तर तुला ठरवून दिलेल्या पैशापेक्षा जास्त केलं. तू राहिला. जेवण केलं आणि आता उलट पैसे मागतो काय?" त्याला उलट सुलट बोलणे जाते. त्याचे श्रम मौलवान नसतात. त्यावेळी. प्रसंगी काही बोलल्यास धक्के मारुन त्या कामगारांना हाटेलबाहेर फेकलं जातं. कधी मारलंही जातं. कधी खुनंही.... हीच वास्तविकता आहे कामगारांची. खरंच त्याचवेळी वाटते की कामगार बनू नये. मालक बनावं. पण प्रत्येकच व्यक्ती

मालक कसा बनणार? कोणाला ना कोणाला कामगार बनावंच लागेल ना.

सरकारने कामगारांची गरज लक्षात घ्यायला हवी. त्यांनाही जगण्याचा हक्क आहे हे ही लक्षात घ्यायला हवं. तसेच त्यांची दखल घ्यायला हवी. त्यासाठी जुन्या कायद्यात संशोधन व्हायला हवं. जो कोणी कामगारांवर अत्याचार करीत असेल, त्याला धडा शिकविण्याचे तंत्र कायद्यात असावे. कायद्यानुसार भांडवलदारांना दंडाची शिक्षा नसावी. तर सजेचं प्रावधान असावं कारण भांडवलदारांजवळ पैसा जास्त असतो. कामगारांना राबवून जमा केलेला. ते दंडाची रक्कम सहज न्यायालयात भरु शकतात. पण जर का सजेचं प्रावधान असलं तर थोडे का होईना भांडवलदार सुधारतील व कामगारांनाही न्याय मिळेल.

नेहमी बालमजूरी बंद करु, भिक्षापात्र बंद करु असं सरकार सांगतं. शासन कामगारांसाठी वेगवेगळया योजना आखते. पण या योजना प्रत्यक्ष कामगारापर्यंत पोहोचत नाहीत. मग या स्वातंत्र्यकाळात ज्यांना पोटभर खायला मिळत नाही. ते एकतर आपली पोटची मुलं विकतात. अथवा त्यांना भिक्षा मागायला

लावलं जातं. किंवा बालकामगार म्हणून कारखान्यात कामाला लावलं जातं. कारखान्यात मालकही त्यांना आणायला काही म्हणत नाही. कारण त्यांच्यापासून कमी पैशात जास्त काम काढता येतं. मायबापांनाही उपाय नसतो. कारण या महागाईत त्यांचा पगार त्यांना पुरत नाही. अशावेळी भांडवलदार जेव्हा अत्याचार करतात, या अत्याचाराला लहान लहान मुले कंटाळतात. त्यांच्यात चीड निर्माण होते. यातूनच बालगुुन्हेगारी निर्माण होते. ज्या स्वातंत्र्यासाठी या कामगारांनी तपश्चर्या केली, , स्वातंत्र्याची वाट पाहिली. ज्या स्वातंत्र्यासाठी कामगारांचे नातेवाईक शहिद झाले य. माझ्या भावी पिढीनं माझ्यानंतर सुखी व्हावं. अशी आशा बाळगून आपलं जीवन संपवलं. पण आज ते सुखी नाही. ज्यांचे नातेवाईक कदाचित स्वातंत्र्यासाठी लढले नसतील ते सुखी आहेत. मात्र आजही ते दिमाखानं सांगतात, 'आम्ही लढलो, आमचे पुर्वज लढले ' पण जे कोणी लढले, त्यांना तर सोडा. त्यांच्या भावी पिढीला स्वातंत्र्यानंतर साधं स्वातंत्र्योत्सवाचं निमंत्रण नव्हतं.

एक झोपडपट्टी म्हणून ज्या वस्तीकडं आम्ही पाहतो, ती वस्ती गलिच्छ समजत नाकावर रुमाल बांधतो, आपला स्वार्थही साधतो. पण कधी विचार करतो का की हे लोकं इथं कसे राहात असावेत. फक्त 'हे लोक कधीच सुधारणार नाहीत ' असं म्हणून गप्प होतो. त्यांच्यासाठी करत काहीच नाही. बोलता मात्र नक्की येतं.

साविनंद हळहळत होता. त्याला विचार करता करता दुःख वाटत होतं. खरा देव व देव यामधील फरक ध्यानात येत होता. खरा देव माणसातच असतो. माणसाची सेवा करावी असाही विचार त्याला आला. आम्हाला माणसात देव दिसत नाही. देव आम्हाला जनावरात दिसतो असंही वाटत होतं. एरवी गवतावर जगणाऱ्या गाईची अगरबत्ती, कुंकू लावून पुजा केली जाते. तिला पोळया खावू घातल्या जातात. पण अपंग, अभंग आंधळया माणसाला आपण काहीही देत नाही. ज्यांना जेवन हवं असतं, ते कळकळीचा उपवास काढतात. त्यांना जर पोटभर ओसरीवर बसवून जेवन दिलं तर..... तर त्यांचा आत्मा निश्चीतच शांत होईल. जेवन झाल्यावर काम दिलं तर ते नक्कीच सुख अनुभवतील. पण आम्हाला हे कळत नाही. त्या

भांडवलदारांना तर नाहीच नाही. उलट ते वेतन अत्यल्प अन् बोलणं जास्त देतात. शो पीस म्हणून कुत्रे..... या कुत्र्यालाही पलंगावर जागा असते. ते सोप्यावरही बसतात. उठतात. अन् माणूस..... माणसे पलंगावर बसू शकत नाहीत. त्याला साबन, तेल, पावडर, अत्तर. माणसाच्या वाट्याला ते नसतं. त्यांना प्रमाणापेक्षा जास्त जपलं जातं. माणसाची हेळसांड केली जाते. त्यांना बसायला चारचाकी मिळते. माणसाला दोनचाकीही मिळायला वाट पाहावी लागते. स्वातंत्र्य काही पोटाची खळगी भरुन काढत नाही. पोटाची भूक क्षमवीत नाही.

आपल्याच देशात आपलेच शत्रू आहे. आम्हाला भाकरीसाठी आजही लढावे लागते. भांडण लावणाऱ्या मंथरा दूरच राहतात. मात्र भांडण लागल्यावर आमचेच भाऊ बहिण मरतात. त्या मंथरा आम्ही मेल्यावर घर तोडल्याची मजा पाहतात.

मी.... हा साविनंद, कामगारांसाठी लढणार. त्यांचे दुःख दूर करणार. त्यांची अंतर्गत भांडणं मिळवणार. त्यांचा अन्न, वस्त्र, निवारा भागविणार. त्यांच्या मनात माझ्या विषयी आदर भरणार.

शेतकरी सुखी तर जग सुखी असं पुस्तकातच आहे. प्रत्यक्षात नाही. प्रत्यक्षात आम्ही शेतक-यांना विकायला निघालो असं वाटतं. आवश्यक माहिती छापून मिडीया त्यांना सुखी करण्याचा प्रयत्न करत असते. पण तेही हतबल ठरतं. सरकारची ध्येयधोरणं त्यांना आत्महत्या करायला भाग पाडतं. लोकांच्या चेहऱ्यावर खरं तर आत्मविश्वास दिसत नाही. स्वातंत्र्य तर नाहीच नाही.

झोपडपट्टी पासून तर टोलेजंग इमारतीपर्यंत कधीही स्वतंत्र विचारांची गंगा वाहिली नाही आणि जेव्हापर्यंत या देशात लेखक, कवी, पेपरवाले, कामगार, शेतकरी, झोपडपट्टीवाले, , बालमजूर, गरीब दीन दलित यांचे हक्क जोपासल्या जाणार नाहीत, तेव्हापर्यंत या निर्भेळ स्वातंत्र्याचा काहीच उपयोग होणार नाही.

पुरते पावणेअकरा वाजले होते. आज जरा तो लवकर निघाला होता. आज कारखाना बंद आहे की काय असं वाटत

होतं. कारण अद्याप भोंग्याचा आवाज आला नव्हता. तसं रघुनाथचं घर आलं. त्यानं रघुनाथला आवाज दिला. तसा रघुनाथ बाहेर आला. तो तयारी करुनच होता. पण त्याच्याही मनात विचार होता.

“"रघुनाथ, चालत नाही का?”

“अरे, आज संप आहे म्हणतेत.”

“आज न काल संप! तेही आपल्या कारखान्यात!"

“हो, संप आहे आज.”

“तुला कोण सांगत होतं.”

“कळलं मला कसंतरी. आता त्या संपकऱ्याईले प्रोत्साहन द्याले जावं म्हणतो.”

“जशी तुझी इच्छा. मी तयारच आहे. पण संपक-यांनी असा तडकाफडकी निर्णय कसा घेतला संपाचा.”

“त्याचं असं का आपल्या कारखान्यात गणबानं आत्महत्या केली.”

“गणबा, तो बायलरवर राहात होता तो.”

“हं तोच तो.”

“का बरं केली आत्महत्या?”

“मले तं वाटते ते आत्महत्या नाय. त्याले मालकानंच मारुन टाकलं असन भट्टीत.”

“का बरं?”

“अरे, तो युनियन लीडर बनाले पाहात होता नं. तो संघटन बनवाची आन् कामगाराले एकत्र कराची कोशीश करत होता. तेच कारण असन.”

“हो, मलाही तसंच वाटतं. हा आपल्यासाठी पुढं जड जाईल. असं वाटलं असेल मालकांना. पण तो तर कामगारांना न्याय मागत होता.”

“तेच तर.... तो न्यायच तर नाय पाह्यजे मालकाले. त्याईले तसं वाटत नाय. विनाकारण बंड करतेत हे कामगार असं वाटते मालकाले. बिचारा गेनबा. लहान लहान दोन पोरं आहे म्हणतेत रे. त्याची बायको तं कोवळ्या वयातच विधवा झाली रे. कामगाराले न्याय नाय रे. काहीही अत्याचार होवो. सगळं सहन

करा. अरे त्याच्यासाठी राबतो आपण तोच शेवटी मुस्कटात मारुन जातो रे.''

''रघुनाथ, तसंच आहे. त्या गेनबाचं स्थान आपण घ्यायचं.''

''हं आन् उद्या भट्टीत बिनाबोलानं जळाचं.''

''आपण तर आतं म्हातारे झालो रे. आपल्याला आज ना उद्या मरण येणारच रे.''

''तूच कर हे फालतूचे कामं. मले नाय मरायचं आतंच.''

''तू का अमर होवून आला? कधीच मरणार नाहीस का?''

''तसं नाही रे. पण.....''

सावनंद हा जवळपास पन्नासच्या वर गेला होता. त्याचे काळेभोर केसं आज पांढरे झाले होते. डोळे खोल गेले होते. गालाची हाडं बसली होती. कपाळावर थोडेच केसं शिल्लक होते. म्हातारपण स्पष्ट जाणवत होतं. तरीही तरुणाईची छटा पुसटशी जाणवत होती. शरीरयष्टी थिजली होती. पण तरीही गेनबाची जागा घ्यायचं त्यानं ठरवलं होतं.

गेनबा हा सर्वसामान्य माणूस होता. त्याची पत्नी सुंदर होती. लग्नाला फक्त पाच सहा वर्षच तेवढे झाले होते. त्याला कामगारांची पिळवणूक कधीच खपत नव्हती. एरवी या कामगारांच्या पिळवणुकीला तोच आव्हान देत होता. तो कारखान्यातील मालकाला नेहमीच आव्हान द्यायचा. जणू म्हातारी मंडळी काहीच करु शकत नाही असं त्याला वाटायचं. तो साविनंदचाच शिष्य होता. साविनंदचे विचार त्याला पटत होते. नव्हे तर काही सल्लामसलतीच्या वेळी तो साविनंदला विचारायचा. यातच तरुण मित्र गोळा करुन त्यानं संघटन तयार केलं होतं. दररोज मित्रांना तो कामगारांच्या पिळवणुकीचे धडे द्यायचा. तसा तो मरणाला भीत नव्हता. त्याला माहित होतं की कधी ना कधी मरण तर येणारच आहे. पण निरर्थक मरणाला तो घाबरत होता. कोणतंतरी महान कार्य करतांना आपल्याला मरण यावं असं त्याला वाटायचं.

मृत्यू एक शाश्वत सत्य आहे असं त्याला वाटायचं. सर्व दुःखातून मृत्यूच आपल्याला मुक्त करु शकतो असंही त्याला वाटायचं. याच कारणानं तो कामगारावरील अत्याचार दूर

करण्यासाठी लढा देत होता. कामगाराला चिथविण्यासाठी तो प्रयत्नशील राहात असे.

कुत्र्यासारखं मरण त्याला चुकचुकल्यासारखं वाटत होतं. रणांगणात मरण येणं हे भाग्याचं लक्षण असतं असं त्याला वाटायचं. मेल्यानंतर कोणीच दुःखी होत नसतो असंही त्याला वाटायचं. मेलेल्या माणसांच्या मृत्यूचं जेवन सगळे करतात. फक्त उरतात ते संदर्भ.... जुन्या आठवणींचे. दोन दिवस कोणीही दुखवटा साजरा करतो. मग सगळं व्यवस्थित होतं. कोणाचं कोणावाचून अडत नाही असंही त्याला वाटायचं.

दोनतीन वेळा मालकानं त्याला समजावलं होतं. कारण त्यानं त्या कारखान्यातील लोकांना भडकवितांना त्यांनी पाहिले होते. त्यानं पगार जास्त उचलावा. पण तोंड बंद ठेवावं असंही सांगितलं होतं. पण गेनबाला वाटत होतं. मला पगार कमीही मिळाला तरी चालेल. पण मी चूप राहणार नाही. माझ्या कामगार मंडळींना पगार जास्त भेटावा असं त्याला वाटायचं. माझ्या कामगार मित्रांचा पगार वाढावी हे नित्य वाटायचं. त्यासाठीच तो प्रयत्नशील असायचा.

तो कामगारांचा नेता होता. कदाचित याला ठार केल्याशिवाय पर्याय नाही असं मालकाला वाटत होतं. वेतन जास्त देवूनही तो न स्विकारता फक्त कामगारांना दिवसेंदिवस भडकवतो आहे याकडेही मालकांचं सतत लक्ष असायचं. अशाने तर कारखाना बंद होवू शकते असं त्यांना वाटायचं. म्हणून त्याला संपवलंच पाहिजे असा विचार करुन मालकानं डाव साधला होता. तसाही तो धोक्याच्याच ठिकाणी काम करीत होता.

बॉयलरचा एक भाग धोक्याचा होता. येथुनच सर्व भागात उर्जा पुरवली जात असे. एरवी हा भट्टीचा भाग होता. एखाद्याला इथं मारुन टाकणं सहज शक्य होते. एखाद्यानं काही कमी जास्त केल्यास त्याला भट्टीत टाकल्या जात असे. ज्या भट्टीत क्षणार्धात हाडाचा चुराडा होत असे. त्याचं अस्तीत्वही उरत नसे.

गेनबा बायलरवर काम करायचा. तिथं त्याची मित्र मंडळी भरपूर होती. ती मित्रमंडळी असल्यानं त्याला मारणं शक्य नव्हतं. मालक संधीच शोधत होता. कदाचित त्याला भट्टीत त्यांनी टाकलंही असतं. पण कामगार त्याच्यासाठी जीव की

प्राण होते. ते नोकरी सोडू शकणार होते. पण त्याला सोडणारे नव्हते. त्यामुळंच मालकाला त्याला मारणं शक्य नव्हतं. घराकडे जातांना मारावे तर तिकडेही कामगार राहातच होते. शिवाय हेच त्याचे कामगार मित्र सोबत यायचे, सोबत जायचे.

आज मालकानं निर्धार केला होता. आज कारण शोधायचं पण गेनबाला मारायचं. सुदैवानं साविनंद व रघुनाथलालाही कामावर वेळ झाल्यानं ते कारखान्यात नव्हते. रमेशही सुट्टीवरच होता. काही मित्रही आज कामगार दिवस असल्यानं सुट्टीवर होते. हिच नामी संधी मालकासमोर चालून आली. योजना आखली गेली व योजनेची पुर्ती करण्यासाठी कार्यवाही सुरु केली.

आज तपासणीचा बहाणा करुन मालक बायलर विभागात आला. त्याचेबरोबर त्याचे पिट्टू होतेच. मशिनमध्ये माल भरतांना साविनंद दिसला नाही. तसंच शिलाई करतांना रघुनाथही दिसला नाही. त्यानंतर मालक कारखान्यातील मंदिरात गेला. त्यानं पुजा केली. तसा प्रसाद घेवून तो निघाला. त्याच्या डोक्यावर आज काळच सवार झाला होता.

मालकच तो.... त्या मालकासमोर आज त्याच मंदिरातील देव झुकला होता. सर्वांना जीवनदान देणाऱ्या देवाला आज मालकानं विकत घेतलं होतं. त्या देवाला काही नवश कबूल करुन.

पुजारी त्याचा नोकरच. त्यानंही त्याच्या मनात आशा निर्माण करुन दिली होती.

मालक झपाझप पावले टाकत निघाला. त्याच्या मनात राग होता. डोळे लाल होते

मालक आधी संगणक विभागात गेला. त्यानं तेथील हालहवाला विचारला. त्यानंतर तो तेलघाणीकडं गेला. तिथं रमेश दिसला नाही. मालकाला समाधान वाटलं. तिनही गेनबाची महत्वाची माणसं. आज कारखान्यात आले नव्हते. हिच संधी. आज मालकालमोर चालू आली होती.

रमेशची विचारपूस करुन मालक थेट बायलरकडं वळला. त्यानं खालूनच गेनबावर एक कटाक्ष टाकला. गेनबा काम

करीत असतांना आपल्या मित्रांसोबत मालकासमोर बोलतांना दिसला. कदाचित चोराच्या मनात चांदण्यागत तो त्या मित्रांला आपल्याविरोधात भडकवीत आहे असं मालकाला वाटलं.

गुलामी अशी सहन करा, ज्यात काहीतरी अर्थ आहे असे गेनबा म्हण्यचा. आई वडिलांचं ऐकणे ही देखील एक गुलामीच आहे. पण त्यात काहीतरी अर्थ असतो. त्याशिवाय आपलं भविष्य घडत नाही. पण या कारखान्यात तुटपुंज्या पगारासाठी मालकांना दबेल राहू नये असं गेनबा सांगायचा. असं ढोरासारखं काम. उलट पगार कमी. ह्या गोष्टी मालकाला वारंवार खटकत होत्या. तेच ते गेनबाचे शब्द आठवत होते. आपण फक्त आपला हक्कच मागतो असं म्हणणंही मालकाला आठवत होतं. तसा त्याच्या मनाचा चरफडात होत होता.

मित्रांनो, आपण संघटीत झालो पाहिजे. कारखान्यातल्या पिळवणुकीचे हत्यार आपण झालोच पाहिजे. या मालकांना धडा शिकवलाच पाहिजे. हे सगळं मालक आठवत होता.

"मालक आले मालक" कोणीतरी म्हणालं. सर्वजण चूप झाले. गेनबाही चूपच होता. पण गेनबाची कुजबूज मालकानं ऐकली होती. तसा मालक म्हणाला,

“गेनबा$$"

अतिशय आवेशात मालकाचा शब्द. रागाच्या भुकंपातील तो शब्द. जमीन फाटल्यागत तो शब्द निघाला. सगळेजण घाबरले होते. मालक काय करतो हे स्तब्ध होवून पाहात होते. एवढ्यात गेनबा हळू आवाजात म्हणाला,

“काय झालं मालकसाहेब?”

गेनबा घाबरला नव्हता. तो पुन्हा म्हणाला,

“मालक, काय झालं? तुम्ही का रागवलात? मी तर असं काहीच बोललो नाही.”

“गेनबा, एक शब्दही बोलू नगंस. तू या लोकांना भडकवतोस.”

“कोण म्हणतो मालकसाहेब?”

“मी बरेचदा ऐकलं.”

“मालक, मी फक्त माझा हक्क मागतोय. माझा पगार नका वाढवू. पण माझ्या या मित्रांचा तर वाढवा. या महागाईच्या काळात अल्पवेतनानं आमचं पोट भरत नाही.”

“म्हणजे पगार पाह्यजे, तोही जास्त.”

“हो साहेब, आपण आमचे अन्नदाते आहात. सरड्याची धाव कुपापर्यंत. तशी आमच्या कामगारांची तुमच्यापर्यंत. आम्ही फक्त तुमच्यापर्यंतच येणार. तेव्हा आपण पगारवाढ करावी ही विनंती.”

“पगारवाढ पाहिजे. मिळन. पण त्यासाठी तुले आपला जीव द्यावा लागन.”

“म्हणजे, मी समजलो नाही.”

“तुले मरा लागन.”

“मालक, हे का बोलून राहिले. अहो, मी जरी संपलो तरी कामगार आपला हक्क सोडणार नाही. माझ्या बलिदानातून शेकडो कामगार नेते तयार होतील. ते आपला हक्क मागतील. तुम्हाला त्यांचा हक्क द्यावाच लागेल.”

“म्हणजे तुले मरणाची भीती नाय वाटते.”

“मालक, मृत्यूला सगळेच घाबरतात. सगळ्यांनाच जगणं प्रिय असतं. मला देखील आहे. माझ्या मृत्यूनंतर तर सर्वांनाच

वेतनवाढ मिळत असेल तर, मला मरण प्रिय आहे. पण हे समजू नका की माझ्या मरणानंतर हे कामगार चूप बसतील."

"तर मग तुले तर मारलंच पाह्यजे. पाह्यतो कसे हजारो कामगार पगार वाढवून मांगतेत ते. आमच्या समोर कोण येतेत तेच पाह्यतो मी."

मालकानं बोलल्याचा अवकाश. सोबत आलेल्या चमच्याच्या साहाय्याने मालकानं गेनबाला उचललं आणि त्या बायलरच्या धगधगत्या आगीत टाकून दिलं. क्षणातच गेनबाचं संपुर्ण शरीर त्या बायलरच्या आगीत जळून भस्म झालं. त्याच्या हाडाचाही एक तुकडा उरला नाही. तसा मालक उर्वरीत कामगारांना म्हणाला,

"खबरदार, याद राखा. माझ्या विरोधात गेल्या तर..... असाच या बायलरमंधी एकाएकाले टाकून जाळून टाकीन. पुरावेबी रायणार नाय."

सगळेजण भिरभिर पाहात होते. कोणाची बोलायची ताकद नव्हती. ते सगळे घाबरले होते. गेनबाची चिता त्यांच्या घाबरल्याची पावती देत होती. अगडबंब आग मनात धुमसत

असतांनाही ते चूप होते आणि त्यांना चूप राहाणं भागही होतं. नाहीतर मालक याचक्षण गेनबासारखं आपल्यालाही आगीच्या स्वाधीन करेल याची त्यांना खात्री पटली होतीच.

बायलरवर खुप खुप मित्र होते. गेनबाला त्यांच्याबद्दल खुप साऱ्या अपेक्षा होत्या. पण कोणीही धावलं नव्हतं. कारण त्यांनाही वाटत होतं की आपलीही गत अशीच गेनबासारखी होईल. गेनबा कामगारांसाठी मृत्यू पावला होता. आपलं जीवन संपवलं होतं. त्याला एक आशा होती की आपल्या मृत्यूनंतर आपल्या राखेतून कित्येक गेनबा तयार होतील. ते या मालकाला धडा शिकवतील. त्यानं तर हसतहसत मरण स्विकारलं होतं. उद्याचा कामगार सुखी व्हावा. त्यांनाही पगारवाढ व सुखसोयी मिळाव्यात. हाच उद्देश होता.

एक वेगळीच चूक आपल्या हातून घडत आहे याचा भास कामगारांना जाणवत होता. एरवी भयाण तरीही शांतता होती. मालकाविषयीच्यी पुर्ण श्रद्धा मावळल्या होत्या. प्रत्येकाला आपल्या जगण्याची आशा लागली होती. घरच्या लोकांच्या नव्हे तर परिवाराच्या काळजीने आज त्यांच्यामधील गेनबा

समाप्त करुन टाकले होते. मालक नकोसा वाटत होता. नव्हे तर ही नोकरी याचक्षणी सोडून द्यावी असं वाटत होतं. पण उपाय नव्हता. बाहेर नोकऱ्या मिळत नव्हत्या. कामगारांना कोणी कुत्रंही विचारत नव्हतं. शिवाय बहुतेक सर्वांचेच विवाह झाले होते. त्यामुळं लेकरं कशी पोषता येईल ही चिंता होती.

गेनबाला विनाकारण मारलं आहे. याची प्रत्येकाला जाणीव झाली होती. पण प्रत्येक जण तोंडातून वदायला तयार नव्हता. कामगार राज्यांची स्वप्न सगळे पाहात होते. सगळेजण स्वप्न रंगवीत होते. पण कोणी आता पुढाकार घ्यायला तयार नव्हतं.

गेनबाचं कुटूंब ओस पडलं होतं. मात्र मालकशाहीच्या चेहऱ्यावर आनंदाच्या छटा होत्या. गेनबाच्या मृत्यूनं आपल्याला बरंच काही मिळालं आहे असं मालकाला वाटत होतं. जणू प्रकाशाची एक लहर त्यांच्या हातून चमकून जात होती. सगळीकडं स्तब्ध वातावरण.. ते मौनत्व शेवटी मालकानंच तोडलं.

‘‘गेनबासारखे हाल जर स्वतःचे करुन घ्यायचे असन तं तुम्हीबी गेनबासारखेच वागा. तुम्हाले मनाई नाय. जर माझ्या मनाप्रमाणं वागान तं तुम्हाले सुखच सुख आहे आन् लाभदायक

जीवन जगाचं असन तं तु ुम्हाले माझ्या मनाप्रमाणं वागाच लागन.. जरी तुमचा देश स्वतंत्र झाला असन. तरी इतं तुम्ही स्वछंद नाय. का तं हा कारखाना आमचा आहे. आम्ही याचे मालक आहो. तुम्ही नोकर. हे लक्षात घ्या. खाले प्याले देश देत नाय. आम्ही देतो. बाहेर नोकऱ्या विकत मिळत नाय. आमच्या कारखान्यात तुम्ही जगता. नायतं आतापर्यंत उपासानं मेले असते तुम्ही. आम्ही तुम्हाले जगवलं. जगत राहा. आता जीवनाचा निखळ आनंद घ्या. या कारखान्यात रायण्यात मजा आहे. माझं बनून. तुम्ही माझं अस्तीत्व विसरल्या. तर मिही तुमचं अस्तीत्व विसरलो म्हून समजा. म्हणून मी का सांगतो ते लक्ष देवून आयका. या कारखान्यात आतं का घडलं का नाही हे बाहेर जाले नोको. नायतं गाठ माझ्याशीन आहे. कोणी विचारलंच तर सांगा, गेनबा कामावर आलाच नाय. गेनबाची हजेरीच लावली नाय मी. अन् जर का असं घडलं तं या बायलरवर जे आहेत नं, त्याईले इतंच टाकीन भट्टीत. मी मालक आहे. या कारखान्यात फक्त माझाच हुकूम चालन. तुमचे हुकूम तुम्ही घरी ठेवून येत जा. अन् तुमचे हुकूम चालवाचे असन तं नोकरी सोडून दुसरीकड काम पाहा. कारखान्याची अब्रू राखा. त्यातच तुमचं भलं आहे. कारखान्याची इज्जत तुम्हीच वाढवू

शकता. आता मी जातो. या गोष्टी याद राखा. तुम्ही का या गोष्टी विसरले का मीबी तुम्हाले विसरलो समजा. म्हणा 'गेनबा आज आलाच नाय'

सगळेजण मालकापाठोपाठ म्हणाले, 'गेनबा आज आलाच नाय. '

सगळीजण मेढरं होती. मेंढरासारखी खाली मान घालून ऐकत होती. कोणीही त्या मालकाच्या विरोधात जायला तयार नव्हतं. वा बोलायलाही तयार नव्हतं. कारण त्यांची घाबरगुंडी उडाली होती. पण गेनबा आठवणीतून बाहेर गेला नव्हता एक मन सांगत होतं की मालकाला धडा शिकवायला हवा तर दुसरं मन सांगत होतं. मालकाचंच ऐकावं. काय करावे सुचत नव्हते. विचाराच्या चक्रव्युहात ते अडकून पडले होते.

मालक निघून गेला होता. आता सर्व कामगारांनी दिर्घ श्वास घेतला. फार मोठ्या संकटातून आपली सुटका झाली हे त्यांना

वाटायला लागलं. आता मात्र त्यांना तोंड फुटले होते. जी तोंड मालकासमोर चिडीचूप होती.

"मालक म्हणजे हुकूमशहाच. त्यांनी जे काही केलं, ते बरं नाही केलं. बिचारा गेनबा, फुकटच मारला त्याला. या मालकाला देव माफ करणार नाही. आपल्यासाठी तो झटत होता बिचारा. संघटना बनवायची त्याची इच्छा होती. तो आपल्यासाठी मेला. आपण त्याचं ऋण कधीच चुकवू शकणार नाही. आपल्याला न्याय मिळाला पाहिजे, यासाठीच त्याचं बोलणं होतं. बघा त्यानं मरण कसं आनंदानं स्विकारलं आहे. मरणाला तो समोर गेला. आपल्यासाठी पोराबाराची, मायबापाची, पत्नीची चिंता त्यानं केली नाही. लढत राहिला. आपण खरं तर न्याय मिळवून दिला पाहिजे."

"याचं मरण जवळ आलं वाटते." संपत म्हणाला.

"अबे चूप राहा नं बे.. तुमची कामगारवाणी तुमच्याजवळच ठेवा. ते कामगारवाणी आपल्याले काही पोटभर अन्न देत नाय. या भाकरीनंच तं आपल्याले बंदिस्त केलं. नायतं कोण आयकत होतं मालकाचं. अबे चूप राहा.. मालकाचे इतं चमचे लय आहेत. तो मालक तसाबी सांगून गेला का येतली गोष्ट येतंच

ठेवा. नायतं याच भट्टीत टाकीन गेनबासारखा. जर मराचंच असन तं अशा गोष्टी करा बा.''

''अरे तुझं म्हणणं बरोबर आहे. पण पण करावं. जीव तडपतो आहे.. मानत नाही आहे. वेदना होत आहेत मनात. काय करु तो कामगार बंधू. कामगारांसाठी लढत होता. अरे तो कामगारांसाठी लढला नसता तर, जीवंतच राहिला नसता. माझा पगार कापा, पण कामगारांना पगारवाढ द्या. असं तो म्हणत होता. अन् आपण स्वार्थी, तो मालक मारत असतांनाही धावलो नाही. अरे आपली एकजूटच नाही. एकजूट असती तर त्यानं हिंमत केली असती का मारायची. आपण जनावरापेक्षाही निर्लज्ज आहोत. डुक्कर तरी बरं. ते तर फक्त विष्ठाच खाते. आपण तर त्यापेक्षाही भयंकर खातो. मी काही खोटं बोलत नाही. जे सत्य आहे तेच बोलतो.''

''तुह्या सत्याले कोण मोजते भाऊ. जर धावलो असतो ना मंगाशीन. तं आपल्यापैकी पुन्हा एक भट्टीत गेला असता.''

''अन् तो वाचला असता का? त्याला नसता टाकला का उभा भट्टीत.''

"हो, पण उद्या आपल्याले कामावर तरी येता आलं असतं का? आपण कामावर राह्यलो नसतो. आपल्याले कामावरुन काढून टाकलं असतं."

"काढलं असतं तर काढलं असतं. आपण त्यांच्याच कारखान्यावर अवलंबून राहायचं का? साधा चायपानाचा ठेला जरी लावला तं आपलं पोट भरते. निदान पोटापुरते पैसे तर कमावता येते. असे हाल होणार नाही. बिगर गुन्ह्यानं तर मरावं लागणार नाही."दामोधर बोलत होता.

"दामोधर तुह्यं म्हणणं बराबर आहे बाबा, पण चायपानाचेबी धंदे आजकाल जास्त झालेत. अशा धंद्यापासून आपून मागासले झालोत म्हूनच तं पाय पकडा लागते मालकाचे. कमी पैशात बी जास्त काम करा लागते साहेबाचं. कोणालेबी काम मिळत नाय. शिवाय कुटूंबनियोजनबी याले जबाबदार." भगवानदास बोलत होता. त्यावर संपत म्हणाला.

"याचं म्हणणं बी बराबर. कारण या श्रीमंत लोकाईच्या इतं भरमसाट पैसा रावूनबी याईले पोरं किती तं दोन. अन् आपल्यापाशी पैसा कमी असूनबी पोरं किती तं भरमसाट. मंग

पैसा कसा पुरल आपल्याले. यामुळेच आपून आपल्या पोरांले बी शिकवू शकत नाय.”

“गेनबा कामगार कामगार म्हणत मेला. तू पैसा पैसा करत मर. अन् मालकाले माहित होवू दे. मंग पाय. तुलेबी भट्टीत कसा टाकते तं.”

“मी तं बा नोकरीच सोडतो उद्यापासून. कोण मरण गेनबासारखं. मी होटलात कपबशा धुईन. ते परवडन. पण हे नाय परवडत रे बावा.”

दामोधरचं आज कामात मन लागत नव्हतं. तो दिवसभर उदासच होता. केव्हा केव्हा सुटी होते अन् केव्हा केव्हा घरी जातो असं त्याला वाटत होतं. रात्रीला अकरा वाजता कारखान्यातील मजूरांना सुटी होत होती. सुटी रात्री होवूनही रस्त्यानं जाता जाता गेनबा मार्गदर्शन करीत असे. सारं आठवत होतं आज दामोधरला. आजही तो कमगारासोबत मिळून आला होता. मी कामगारांसाठी मिटलो तरी चालेल. पण

कामगार सुखी व्हायला हवा असं गेनबाला वाटत होतं. तो अकरा वाजण्याची वाट पाहात होता. केव्हा केव्हा सुटी होते अन् केव्हा केव्हा गेनबाच्या मृत्यूची बातमी बाकी कामगार बंधूंना सांगतो असं त्याला होवून गेलं होतं.

एकदाचे अकरा वाजले व भोंगा वाजला. तशी कामगारांना सुटी झाली. त्यांनी कारखान्यातील कपडे उतरवले व घरचे कपडे वापरले. तसे ते कारखान्यातील कपडे कारखान्यात ठेवत. घरी नेत नसत. पण दामोधरनं आपले कपडे आज पिशवीत भरले. जणू काही त्याला आजपासून शेवटचा रामराम ठोकायचा होता. त्याच्या मनात खुप सारे विचार होते. त्याला गेनबाच्या मरणाची चिंता सतावत होती.

दामोधरला कुत्र्यासारखं मरण हवं नव्हतं. त्याला ही वाघासारखं वागण्याची सवय होती. त्या भ्याड शेळ्या मेढ्यांसारखं शंभर दिवस जगण्यापेक्षा एकच दिवस वाघासारखं जगून मरावं असं त्याला वाटत होतं. त्याची शरीरयष्टी चांगली होती. उंच पुरा व धिप्पाड. तरीही दुपारी त्यानही मालकापुढं बुद्धी गहाण ठेवली होती. आता मात्र पश्चाताप येत होता.

कारखान्यातील आपल्या विभागातून निघालेली मंडळी. कारखान्याचं फाटक येताच सावध व्हायचे. कारण तपासणी व्हायची. कोणी काही कारखान्यातील वस्तू चोरुन नेत तर नाही. तसे आजही सगळे रांगेत लागले आपली तपासणी करुन घ्यायला. तपासणी दरम्यान खिसे, पिशव्याचा तपास होवू लागला. दामोधरचाही नंबर आला व त्याच्या पिशवीत कपडे दिसले. विचारणा झाली असता दामोधरनं म्हटलं, 'कपडे खराब झाल्याने धुवायला नेत आहे. ' तसं धुवायला न्यायची परवानगी होतीच.

धिप्पाड देह दामोधरचा. पण त्या देहाचे मालकासमोर तुकडे तुकडे झाले होते. दामोधरचे खिसे तपासताच एक लोखंडी वस्तू हाताला लावली. ती बाहेर काढायला लावली. ती तंबाखूची डबी निघाली.

तंबाखू.... कामगारांना जीवनात साथ देणारी. रात्रीच्या वेळी माल मशीनमध्ये भरतांना साविनंदला जेव्हा झोप येत असे, तेव्हा तो अख्खी रात्र या तंबाखूच्या नशेतच घालवत असे. तसेच ट्रकवालेही रात्र जागतांना या तंबाखूच्या शेवनातूनच रात्र काढतात. कारखान्यातील वायू कधीकधी पोटात जावून पोट

बिघडायचं, तेव्हा हाच तंबाखू ते पोट साफ करायला मदत करायचा. तसं पाहिल्यास या कामगारांच्या जीवनात त्या तंबाखाला अनन्यसाधारण महत्व होतं. जर कधी कामात कंटाळा वाटलाच तर हा तंबाखू कामगारांच्या जीवनात नवीन उत्साह भरायचा.

तंबाखू पाकीटवर लिहिलेले असायचे की तंबाखू खाणे आरोग्याला हानीकारक आहे. तरीही ते तंबाखू खायचे. तंबाखूपासून कर्करोग होतो हे कामगारांना माहित होतं, तरीही ते तंबाखू सेवन करायचे.

"हे काय आहे?"

"माचीस आहे जी."

"कायले आणली?"

"...."

"हे आणा लागते का? मालकाले माहित झालं तं नोकरीवरुन काढन नं गड्या." चौकीदार म्हणाला.

"भाऊ गलती झाली गा. आतं नाय आणणार उद्यापासून."

माचीस आणायला मनाई होती. कारण कारखान्यात आग लागण्याची भीती होती. तरीही काहीजण माचीस आणायचे. जेवन झाल्यावर ते विड्या फुंकण्याचे काम करीत.

चौकीदारानं माचीस जप्त केली. सर्वच कामगार एक एक बाहेर आले. ज्यांच्याजवळ वस्तू सापडल्या त्यांच्या वस्तू जप्त झाल्या. सर्वांनी गेटच्या बाहेर असलेल्या सायकली काढल्या व ते गोष्टी सांगत सांगत चालू लागले त्या कच्च्या रस्त्याने रात्रीच्या अंधारात आपले घर नापत. अशातच दामोधरनं गेनबाच्या मृत्यूची बातमी फोडली. हाहाकार माजला. क्षणातच ती बातमी वाऱ्यासारखी त्या मजूरात पोहोचली व ठरवलं गेलं की उद्या संप करायचा.

दामोधरनं बातमी सांगून आपलं तोंड बंद केलं. तोही रस्त्यानं चालत होता. त्याला उद्याच्या पोटाचा प्रश्न सतावत होता. कारण तो उद्यापासून कामावर येणार नव्हता. त्यामुळं पोराबाराची चिंता त्याच्या मनात घर करीत होती. मात्र त्याचं मन सांगत होतं तू काही बांगड्या घातल्या का? लात मारुन पाणी काढ या कारखान्यात येण्यापेक्षा आणि गेनबाला न्याय मिळवून दे. स्वतः तिखटमीठ खाल्लं तरी चालेल, पण या

मेंढरासारखं जगू नको. त्यांना तर स्वतःची जाणीव नाही. अस्तीत्व नाही. वाघासारखं सिंहासारखं जग. कुत्र्यासारखं जगू नकोस. या भांडवलशाहीला उखडून टाक.

संपत गेनबाचा चांगला मित्र होता. पण स्वतःच्या स्वार्थासाठी त्यानं गेनबाची बातमी लपवली होती. गेनबा दिसत नसल्यानं लोकांना चिंता पडली होती. तसे तं ते चौकशी करु लागले होते. तेव्हा गेनबाचे मित्र असलेल्या संपतला लोकांनी विचारलं की गेनबा कुठाय? पण त्यानं काही उत्तर दिलं नाही. त्याला वाटत होतं की आपली नोकरी जाईल.

दामोधर गेनबाचा मित्र नव्हता. कधी बोलणंही नव्हतं जास्त. पण त्याच्याजवळ माणुसकी होती. त्याचमुळं की काय, गेनबाच्या मृत्यूला न्याय मिळायला हवा म्हणून त्यानं ती बातमी लोकांना सांगितली होती. तेव्हा त्याच्या डोळयांतून अश्रू ढळत होते.

बातमी सांगतांना निघालेले अश्रू. कोणीतरी म्हणालं,

"त्याच्या कुटुंबाची सर्व जबाबदारी आपण उचलून घेवू ते कुटूंब सक्षम होईपर्यंत. उद्याला आपण संप करु. जोपर्यंत

गेनबाच्या मृत्यूचा मालक खुलासा करीत नाही. गेनबाच्या कुटूंबाला मालक आर्थीक मदत देत नाही. वाटल्यास आपली नोकरी गेली तरी चालेल. मंजूर..''

''मंजूर.'' काहींनी माना डोलवल्या. त्या रात्रीच्या गर्भात कारखान्यातल्या मंद प्रकाशात त्यांच्या डोलणाऱ्या मानाही स्पष्ट दिसत होत्या.

''मग आताच ठरवू. गेनबाला न्याय मिळवून द्यायला कोण कोण तयार आहे?''

सर्वांनी हात वर केले व होयचा जयघोष केला.

''हं उद्या बुधवार. सर्वांनी कारखान्याबाहेर गोळा व्हायचं. कोणीही आतमध्ये जाणार नाही. बाकी काय करायचं ते पााहूया. जे आज कामावर नाहीत त्यांनाही फोन करुन सांगा.''माणिक म्हणाला.

''आता जा सगळे घरी. निवांत झोपा. उद्याला ठीक अकराच वाजता भेटू.''

सर्वजण आपआपली सायकल घेवून निघाले. रस्ता काही दूर ओबडधोबड असल्यानं ते पायीच निघाले होते. काही वेळानं मुख्य रस्ता येताच ते रस्त्यावर सायकलवर स्वार होऊन निघाले. ज्या पतिव्रता स्रीया त्यांची वाट पाहात होत्या. त्या स्रीया पुर्वीसारख्या नव्हत्या. पुर्वीच्या स्रीया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढत असत. गार्गी, मैत्रेयीचा इतिहास होता. नव्हे तर सीताही रामासोबत वनवासात गेली होती. कैकेयीनं दशरथाचं सारथीपण निभावलं होतं. अनुसयानंही पतीबरोबर विद्यार्थ्यांना विद्यादान दिलं होतं.

पतीबरोबर पत्नीने खांद्याला खांदा लावून काम केल्यास पतीला या कारखान्यात काम करायची गरज नाही असं त्यांना वाटायचं. असं कामगारांना वाटायचं. बहुतेक कामगारांच्या स्रीया या काम करणाऱ्या नव्हत्या. म्हणूनच मजबूरी सारखं या कामगारांना कारखान्यातील मालक अत्याचार करीत असला तरी ऐकावं लागायचंच.

रात्रीची वेळ. जवळपास घरी पोहोचायला साडे अकरा. साविनंदला किंवा रघुनाथला आता सांगता येत नव्हतं. उद्या

सकाळी काय ते करु असं वाटून संपाचा निर्णय तर कामगारांनी घेतला होता. कारखान्याला ते कुलूपच लावणार होते.

दामोधर घरी गेला खरा. पण तो खिन्न होता. त्याला वाटत होतं की गेनबाच्या मृत्यूला न्याय मिळेल काय? त्याच्या चेहऱ्यावरचे भाव त्याची पत्नी माधवीनं जाणली. तिनं विचारणा केली.

"आज का बरं उदास?" जेवन करता करता माधवीनं विचारलं.

"अगं आज कारखान्यात फार मोठी दुर्दैवी घटना घडली."

"काय झालं?"

"अगं आमच्या कारखान्यातील एका मजूराचा मृत्यू झाला."

"कसा काय?"

"अगं मालकानं टाकलं भट्टीत त्याला."

"तुम्हाला कसं माहित?"

"माझ्या समोरची घटना."

“बापरे! मालक असेही करतात.”

“होय, तसंच झालं.”

“मग आता काय करणार. '

“संप करणार आहेत कामगार.”

“तुम्ही ही.”

“होय, मीही.”

“मग नोकरी जाईल ना. अगं जावू दे. मी आजपासून स्वाभिमानानं जगायचं ठरवलं. पानठेला टाकीन. चहाठेला टाकीन. पण मी आता कारखान्यात जात नाही. कदाचित....”

“कदाचित म्हणजे? तुम्हालाही टाकल भट्टीत मालक?”

“त्यांचा काय भरवसा.”

“बिन गुन्ह्यानंच.”

“अं सांगता येत नाही. त्यापरस आपला धंदा. मी त्या कारखान्यात जीव गहाण टाकत नाही.”

“पण तुमचा धंदा चालल का?”

“चालेल नं. नाही चालल तं पाहू. लोकं तं चालवतातच नं. अगं मी ज्या रस्त्यानं जातो, त्या रस्त्यानं म्हातारी म्हातारी मंडळी धंदा करतात. ज्यांच्याच रग उरली नाही तेही, पोटासाठी बिचारे राबतांना दिसतात. अगंही पोटासाठी वेश्याही आपलं शरीर विकते. इथं तं मी मेहनत करील म्हणतो. त्या कारखान्यातच तं का बसून ठेवतात?”

“तोही धंदा बरा. पण आज तर लोकं मी डुबलो डुबलो म्हणतात.”

“अगं धंदा जर बुडला तर कोणी धंदा करेल काय? ती सांगायची भाषा असते. कोणी कितीही कमवो. सर्वांच्या मागं दुःख असतं. शहरात सर्वांच्या मोठमोठ्या इमारती आहेत. कोणाचा पगार तिनशे आहे तर कोणाचा तीस हजार. पण सगळे रडतच असतात. पैशाच्या बाबतीत. या पृथ्वीतलावर कोणीच सुखी नाही. कोणी कोणी आजारानं दुःखी असतो.”

दामोधरचं जेवन झालं होतं.. त्यानं हात धुतलं. तसा तो उभा राहिला. त्यानं अंथरुणाकडं पाहिलं. पोरं झोपली होती. त्यानं

पोरांच्या कपाळावरुन हात फिरवला. तशी त्याच्या पोराची महिनेगिनती भेट होत नव्हती. तो जेव्हा घरी यायचा. पोरं झोपलेली असायची. अन् जेव्हा उठायचा तेव्हा मुलं शाळेत गेलेली असायची. कोणत्याही स्वरुपात बोलणं बाप व मुलात व्हायचं नाही. रात्री मुलांच्या असाच तो कपाळावरुन हात फिरवायचा व झोपून जायचा. आजही त्यानं तेच केलं होतं. हिच हालत सगळ्या कारखान्यातील मंडळींची होती.

दामोधर झोपी गेला होता. एवढ्यात त्यानं स्वप्न पाहिलं. तो चालला होता. एवढ्यात कारखान्याचं ते फाटक आलं. त्या फाटकासमोर गर्दी होती कामगारांची. कामगारांनी त्या कारखान्याला घेरलं होतं. म्हशाली धगधगत होत्या. कामगार कारखाना जाळणार होते. मात्र मालक हात जोडून विनवणी करीत होता. माफी मागत होता. पण कामगार मात्र ऐकण्याच्या तयारीत नव्हते.

अशातच अचानक डोळा उघडला त्याला आपण स्वप्न पाहात असल्याचा भाष झाला. त्यानं घड्याळाकडं पाहिलं पावणेचार वाजले होते. पहाट झाली होती. अचानक त्याला आठवलं. पहाटेची स्वप्न खरी होतात.

तो उठला. बाहेर आला. बाहेर चंद्राचा लख्ख प्रकाश पडला होता. मात्र तो मावळतीला गेला होता. तो मावळतीला गेला असला तरी स्पष्ट दिसत होता. झाडं स्तब्ध उभी होती. मात्र झाडातून पक्ष्यांचा आवाज येत होता. तसा तो घराच्या आत आला. स्वगत म्हणाला,

'अजब स्वप्न. पण पहाटेची स्वप्न खरी होत असतात असं लोकं म्हणतात. हेही स्वप्न खरी होतील काय? परमेशा, हे स्वप्न खरं करुन दाखवो. कामगारांना न्याय मिळो. माझी नोकरी सुटली तरी चालेल. पण गेनबाच्या मृत्यूला न्याय मिळायला हवा. '

त्यानं मनोमन प्रार्थना केली आणि तो पुन्हा अंथरुणावर झोपायला गेला. पण आता पहाटेला झोप येत नव्हती. जसा इतर दिवशी पहाटेला जाग यायचा. पण झोप यायची. तो सारखी कुस बदलवीत होता तरीही.

कसेतरी सहा वाजले. मुले उठली. पण दामोधर अंथरुणातच होता. एवढ्यात मुलांच्या भेटीची आठवण झाली.

डोळे मिटलेला दामोधर अंथरुणातून उठला. म्हणाला,

“काय झालं रे रडायला?”

“शाळेत नाही जात म्हणते.”

"मग राहू दे. एखाद्या दिवशी नाही गेला तर काय होईल?”

“तुम्ही नाही शिकले तसं ठेवायचं आहे का पोरांना.”शिकू द्या पोरांना. आपल्या सारखं अडाणी बनवू नका.”

“शिकव का नको शिकवू. मी आता बोलतच नाही.”

तो उठला. घाईघाईने हातपाय धुतले व आरशात पाहून भांग करु लागला. तोच माधवी म्हणाली,

“कुठं चाललात एवढ्या घाईनं सकाळी सकाळी?”

“रघुनाकाकाकडे जावून येतो.”

“लवकर येणार की नाही.”

“आज सुट्टी आहे.. संप आहे आज.”

तसा लवकर भांग केला, तशी त्यानं सायकल काढली व सायकलवर स्वार होऊन तो रघुनाकाकाकडे निघाला.

रघुनाथचं घर आलं. तसं त्यानं आवाज दिला. रघुनाथ बाहेर आला. त्यानं दामोधरला पाहिलं. तसा म्हणाला,

“ये ना दामोधर. केव्हा आलास?”

“आत्ताच आलो काका.”

“बरं ये ना. घरात ये.”

दामोधर घरात आला. खाटेवर बसला.. तसा रघुनाथ म्हणाला,

“एवढ्या सकाळी सकाळी. काही काम आहे का?”

“काम नाही काका. आज संप आहे.”

“संप!कशाबद्दल?”

“काल कारखान्यात मालकानं भट्टीत टाकलं गेनबाला.”

“म्हणजे?”

“काका खुन केला मालकानं गेनबाचा.”

“खुन!का बरं?”

“तो संघटना बनवत होता नं आपल्या कामगारांची. त्याचा राग.”

“च्या बईन. त्याचा राग काढला तर. पण जराही विचार नाय केला मालकानं.”

“हो ना काका. जरा बी विचार नाय केला.”

“लय वाईट झालं बा. आतं. त्या मालकाले का झोंबलं होतं, तं त्यानं असं केलं..... आतं का कराचं ठरवलं?”

“संप करु म्हणे रातच्याला माणिक अन् ते बाकीचे.”

“बरं मंग.”

“या तुम्ही लवकर.”

“किती वाजता?”

“आपल्याच वेळेला.”

“बरं येतो येतो. तो दोस्तच होता आपला. त्याच्यासाठी नाय याचं तं कोणासाठी.”

“आम्हाला आता गेनबानंतर तुमचीच तर हिंमत आहे.”

“बरं बरं! येतो. मैयत असन न आज?”

“कशी राहिल काका. राखही शिल्लक ठेवली नाही.”

“हो का?”

“हो, बिचारा गेनबा, मदतीची हाकही मारत नव्हता. कारण आम्ही बांधलो आहोत हे त्याला माहित होतं. पण जर का काल कामगारानं एकी दाखवली असती तर त्या मालकाची दालही गळली नसती. गेनबाही वाचला असता.”

“आजचं प्रयोजन संपच का?”

“आज कारखान्याला कुलूप लावणार आहोत. नाहीतं जाळून टाकू कारखाना. पाहू काय करायचं ते.”

“अस्सं.”

“हो काका, मी मुद्दाम तुम्हाला सांगायला आलो. तुमच्या शिवाय संप पुर्ण होणार नाही. तुम्ही लवकरात लवकर या. गेनबा सुद्धा तुमचं ऐकत होता. आम्हीही ऐकणार.”

“ठीक आहे. मी लवकर येतो.”

“ठीक आहे काका, मी येतो.”

दामोधर उठला. त्यानं सायकल घेतली व तो पुन्हा आलेल्या वाटेने परत जावू लागला. तो सायकल वेगाने चालवत होता.. कारण त्या संपाचा तोही एक घटक होता.

सायकल चालवत असतांना सहजच विचार त्याच्या डोक्यात तरळून गेला. 'आम्हाला साधी सायकल नशीब होत नाही. यांना पेट्रोल डीझलच्या गाड्र्या. आमच्याच भरवशावर कमवून आमच्यावरच रोब दाखविणारी माणसे. यांनी तर नफ्याचे चार भाग करायला हवेत. कच्च्या मालाची रक्कम, कारखान्यातील उच्च व्यक्तीच्या पगाराची रक्कम, स्थावर मालमत्तेची रक्कम आणि चौथा भाग आमची रक्कम. मगच बरोबर पगार भेटू शकतो. पण हे तसे करीत नाही. हे तर निव्वळ त्रास द्यायचं काम करतात. आज असंच कारखान्यात मजूरांचा वापर होत असल्यानं नवयुवक प्रसंगी खाली राहतात. पण कारखान्यात काम करायला तयार होत नाहीत. '

घर आलं होतं. तशी पत्नी दारातच उभी होती. तशी ती म्हणाली,

“अजून लवकर यायला पाहिजे होतं.”

“मी समजलो नाही.”

“का नाही समजले. एकीकडे कामगारांच्या न्यायाच्या गोष्टी करता अन् दुसरीकडं स्वतःच वेळ घालवता. आपलं सोडा आपण चहाची टपरी चालवू. पण त्या गेनबाच्या परीवाराला न्याय मिळाला पाहिजे असं तुम्हीच म्हणताय ना. अहो, असाच उशीर होईल तर संप तरी होईल काय?”

“बर.”

दामोधर म्हणाला. त्यानं अंघोळीला पाणी घेतलं त्यानं झटापट अंघोळ आटोपवली. भराभर जेवन कोंबलं व संपुर्ण तयारीनिशी निघाला.

परत तोच विचार त्याचा पिच्छा सोडत नव्हता. वर्षीचे बारा महिने. बाराही महिने राहतो एखाद्या बैलासारखे घाण्याला तसेच नांगराला जुंपल्यागत. बैल जसा बाराही महिने, मग पावसाळा असो, , हिवाळा असो की उन्हाळा.... राब राब राबतो. तसे आम्हीही बाराही महिने सडत असतो या कारखान्यात. एवढी व्रतवैकल्ये आमच्या घरात बाया करीत असतात. पण एकही देव प्रसन्न होत नाही. आमच्या कामगारांच्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी एकही देव धावत नाही. कारखान्यात काम करुन आलेला थकवा घालवण्याचा प्रयत्न होत असतांना आमचा कामगार बंधू दारुही पितो. घरीही बायकोची कटकट सहन करावी लागते.

पण पत्नीच ती. ती नाही बोलणार आपल्याला तर कोण बोलणार. केवळ मैत्रीण नाही तर सखीची भुमिका तिच्यात सामावलेली असते. मात्र पुरुषांच्या नेहमीच्या स्वभावाची ती नेहमीच शिकार बनते. तिच्यात बहिण आणि माता सामावलेली असते. सर्वच स्रीया या पुरुषाला आपला मित्र व सखा मानतात. एखादी अपवादही असते. '

तशी त्याला त्याची गोष्ट आठवली. तो दहावीला असतांना त्याच शाळेत त्याची मैत्रीण होती. तिनं तर खऱ्या अर्थानं परीक्षेच्या वेळी पुस्तकं पुरवली. म्हणून तो दहावी पास झाला. त्यासाठी तिनं आपल्या अभ्यासाची चिंता केली नाही. अशा असतात मुली आणि मुलं.... मुलं मात्र स्वार्थी. काल जर स्रीया असत्या तर गेनबा मरण पावला नसता.

पुरुषांच्या बाबतीत आलेला विचार पुरुष मोठा की स्री. पण स्री हिच स्रीची शत्रूही असते हेही त्याच्या जीवानं कबूल केलं. एक एक स्री आपल्या लेकरासाठी झटते तर तीच स्री जीवही घेते लेकराचा. हाच मित्र पुढे शिकत असतांना त्याच वर्गात शिकणाऱ्या आपल्या मैत्रीणीला आठवत होता तो. त्याच्यावर दोन्ही मुली प्रेम करायच्या. पण ती प्रेम का करते म्हणून एकीनं आत्महत्या केली. तर तिनं केलेली आत्महत्या ही एका चिठ्ठीनं सिद्ध झाली. ज्या चिठ्ठीवर त्याचं नाव लिहिलं होतं. म्हणून तो फसला. पहिली आत्महत्येनं मेली. दुसरी सोडून गेली. तर त्यानंतर झालेलं नुकसान म्हणजे त्याला कारावास झाला. कारावासातून मुक्त झाल्यावर आता तो कामगार. एक स्री

पाहिजे तर नशीब बदलवू शकते. घडवू शकते. नाहीतर तिच स्त्री माणसाचं जीवनही नेस्तनाबूत करु शकते.

दामोधर चांगल्या विचाराचा होता. पण केवळ आरोपामुळं तो मागं राहिला होता. प्रेम करणं काही त्याचा गुन्हा नव्हता. पण तो केवळ मैत्रीण आपली सखी म्हणून प्रेम करीत होता. पण त्या दोन्ही मुलींनी केवळ वासनेच्या भावनेतून प्रेम करीत त्यालाा फसवले होते. ऐन संकटाच्या वेळी एक सोडून गेली होती. तर दुसरी स्वर्गात गेली होती मात्र तिही त्याला फसवून.

"साले नोकर समजतेत आम्हाले." रघुनाथ साविनंदला म्हणाला.

रघुनाथच्या मनाचा चरफडात झाला. त्यानं लवकर अंघोळ केली. जेवन केलं व साविनंदासोबत तो निघाला. तशी त्याचं साविंनदासोबत बोलणं सुुरु झालं.

"एक गोष्ट सांगू साविनंदा, एका मास्तरनिची गोष्ट आहे."

“सांग सांग. मी ऐकतो.” साविनंदा म्हणाला. तसा रघुनाथ गोष्ट सांगू लागला.

“साविनंदा, एक मास्तरीन होती. लय शिकली होती. सुंदरबी होती. पण तिले शिक्षणाचा घमंड होता. शिकीन तं माह्य लगन चांगल्या माणसाशीन होईन असं तिले वाटत होतं. पण झालं उलटच. ते शिकली, पण शिकता शिकता तिचं वय वाढलं. कांतीही घसरली. आता मात्र तिले मागाले कोणी येत नोयते. ती पडून होती. बापाले मातर पोरीची लय चिंता होती. त्याले झोपबी लागत नोयती. अशावेळी त्याच गावात एक बाबू राहाले आला.

बाबूच तो. त्याची लय ओळख होती पंचक्रोशीत. त्याची कशीबशी ओळख झाली तिच्या बापाशी. तिचा बाप विचारु लागला,

“बाबूसाहेब, कोणी एखादा पोरगा आहे का आपल्या लक्षात.”

“हो. पण माझा मित्र शेतकरी आहे. कमी शिकला आहे. चालन का?”

“चालन. पण मी मा पोरीले एक शब्द विचारतो.. मंग सांगतो.” बाप म्हणाला.

त्यानं पोरीले विचारलं. पोरीले तसाबी तो प्रस्ताव आवडला नाय. पण असं जर धुडकावलं तं आपला लगनच होणार नाय असं पोरीले वाटलं व पोरगी लग्नाले तयार झाली.

झालं साविनंदा, पोरीचं म्हाताऱ्यानं लगन पार पाडलं. मुलगी सासरी गेली. तिनं मास्तरणीचा कोर्स केल्यानं ती परीक्षा देवू लागली. वावरातबी आपल्या नवऱ्यासोबत जावू लागली. तिले एक पिल्लू बी झालं. पण गावचं कोणी या तीन वर्षात भटकलं नाही. अशातच एक दिवस बाबू आला. विचारलं,

“कशी आहेस?”

“मी बरी आहे. तुम्ही कसे आहात? माझे बाबा कसे आहेत?”

“तुझे बाबा मरण पावले. साथीच्या रोगानं घात केला. म्हणून बातमी बी पाठवता आली नाही.” बाबू म्हणाला.

“बरं बरं! तुम्ही तरी येत चला. लय आठवण येते मले माहेरची. माहेरचं कोणी येत नाही ना.”

“बरं बरं!"बाबू म्हणाला व बाबू त्या दिवशीनंतर तिले भेटाले येत राहिला.

काही दिवस गेले व मास्तरीनले नोकरीचा सांगावा आला. बाई नोकरीवर लागली. तेबी नोकरी लावासाठी तिच्या कास्तकार पतीनं बरीच मेहनत केली होती.

आतं मात्र ते नित्यनेमाने नोकरीवर जात होती. पोराईले शिकवत होती.. सायंकाळी घरी येत होती. मातर या काळात तिच्या थोरामोठ्यांशी मुलाकती होत. विचारत तुझा नवरा कोण आहे. बाईला माझा नवरा शेतकरी आहे हे सांगाची लाज वाटायची. कारण बाकीच्यांचे नवरे हे जास्त शिकलेले असून साहेब होते. एक दोन वेळा बाईनं सुरुवातीले सांगून पाह्यलं. पण लोकांनी तिची टिंगल केली व तुले असाच नवरा भेटला होता का असंही म्हणलं. पण ते बाईले काई आवडलं नाय. अशातच एक दिवस बाबू आला.

एक दिवस बाबू आला खरा. त्या बाबूजोवर या बाईनं पोथीपुराण काढलं. म्हणलं,

“बाबू, मले आतं मा नवरा आवडत नाही. मले कोणत्या कार्यक्रमाले न्याले लाज वाटते. ते त्याईचे कपडे धोतर अन् बंडी..... आज तो घालाचा जमाना तरी आहे का?”

“तू रागावणार नाही तं एक सुचवू.”बाबूनं म्हणलं.

“बोला बाबू, काय सुचवता ते.”

“हवं तर अशा कार्यक्रमांना मले नेत जा. चालन का माझं येणं.”

“लोकं का म्हणतीन.”

“लोकाईले माहितच नाय कराचं. नवरा कोणता हे लोकं कसे ओळखन. सांगून तवा.”

आता मातर ते दररोज भेटू लागले. तो कास्तकार कामावर शेतावर दिवसभर जावू लागला. पोरगा खेळाले जावू लागला. आन् हे मास्तरीन घरी त्या बाबूसोबत रंगरलिया मनवू लागली. कधी कधी शाळेलेबी सुटी मारुन घरी राहू लागली.

एक दिवस या कास्तकाराले आपल्या बायकोची शाळा पाहाची इच्छा झाली. तो तिच्या पत्त्यावर तिच्या शाळेत गेला. तं पाहताच तिनं त्याले ओळखलं व घरी जाची विनंती केली. त्यावेळची गोष्ट सांगतो. तिले विचारलं तिच्या शाळेतल्या मास्तरनिनीनं. तं हे म्हणे मा नोकर होये. पाय नवरा कोण आन् नोकर कोण?

आजच्या जमान्यात अशीच भपकेबाज संस्कृती आली आहे. बायको नवरा जर साधे कपडे घालत असन तं बायको त्याले ओळखत नाय. बाप जर साधे कपडे घालत असन तं पोरगा त्याले ओळखत नाय. ते दोन्ही लोकं त्याले नोकर समजतेत. जो बाप अंगाची लाहीलाही करुन आपल्या पोराले शिकवतो, तो बाप या चोट्ट्या पोरासमोर नोकर होतो अन् ज्या कास्तकार नवऱ्यानं तिचा फाम भरुन तिच्या नोकरीले कोशिश केली. एनढंच नाय तं नोकरी मिळवून देली, एवढंच नाय तं नोकरी लागतपर्यंत पोषलं, त्या बायकोनं का केलं. त्याले नोकर बनवलं अन् हाकललं. पुढं अजून सांगतो.

नोकर शब्द आयकताच कास्तकाराचा मेंदू ठणकला. त्याले राग आला. पश्चातापही वाटला. तो घरी आला. घरी त्यानं कारण विचारलं."

"मग कोणतं कारण सांगितलं तिनं?"

"तिनं म्हणलं का ते पोराले कोणतं ज्ञान देईन. पती करावा तं खेडूत असं शिकवन का? तिच्या मैत्रीणी कोणती इज्जत देईन. पती असा आहे म्हणून इज्जत करतीन का? म्हणून म्हणलं नोकर. तुम्ही राग मानू नोका.

पती समजदार होता. तो समजला. परत तो कधी शाळेत भटकला नाही. मात्र जो हक्काचा पती नोयता. तो रोजच भटकत होता शाळेत. तो रोजच तिले गाडीवर बसवून तिच्या घरापर्यंत आणून द्यायचा. पिरमाच्या गोष्टीबी करायचा. तेव्हा तिनं म्हटलं,

'बाबू तुम्ही माझ्याशीन लगन कावनाय केलं. ' तवा तो म्हणाला, 'करणार होतो. पण जात आडवी आली. '

आतं मात्र रोजच बिनधास्तपणान त्यांचं बोलणं सुरु झालं होतं. एक दिवस त्याईले पोरानंबी पाह्यलं. तवा पोराले मारुन

टाकण्याची धमकी देवून गप्प केलं. आतं मात्र त्याले माहित व्हाचं होतं.

एक दिवस कोणत्यातरी कामानिमित्त तो जवा घरी आला. तवा त्याला आतून दार लावलेला दिसला. त्यानं वरझलक पाह्यलं. तं त्या दरवाज्याच्या फटीतून त्याले काहीबाही दिसलं. त्याची आग मस्तकात गेली. तसा त्यानं आवाज देला.

दरवाजा उघडला. बाबू आत लपून बसला. तसा त्यानं प्रश्न केला, 'कोण होता अंदर? ' 'कोणीच तं नाय' तिनं उत्तर देलं. तस्शीच त्यानं तिच्या गालफटात एक झापड लावून देली नि म्हणणं, 'आतं खरं खरं सांग नाहीतं मारुनच टाकीन जिता. '

आतं मात्र बाईची पंढरी घाबरली. तिले वाटलं का आतं काही जाणार नाय हा. आतं बऱ्या बोलानं सांगावाच लागन. तवा ते म्हणाली, 'बाबू होता. गावावून आला. ' 'मंग त्याच्यासोबत असं लपून चाळे काय? दरवाजा उघडा ठेवून बसत जा. ' 'हो' ते म्हणाली. तसा आपल्यालाच भाष झाला

असन असं समजून त्यानं तिले माफ केलं. पण तंबी देली का पुन्हा बाबू आतं मले या घरात दिसाले नोको.

आतं मात्र बाईची गोची झाली होती. तिचं तं पिरम निर्माण झालं होतं बाबूवर. पण बाबूले सर्रास घरात घुसवता येत नोयतं. रस्त्यावरबी खुलेआम भेटता येत नोयतं. आता का करावं? विचार येत होता.

एक दिवस बाबू तिले भेटला, तशी ते म्हणाली, 'बाबू मले आतं तुझ्याशिवाय राहावत नाय. तू माझ्याशी लगन करशीन का? ' 'हो पण तुझा पोरगा अन् तो तुझा नवरा. '

तिले बाबूशीन लगन कराचा होता. पण तो नवरा अन् तो पोरगा तिच्या आड येत होता. काय करावं? कसं करावं? याचा तिले विचार येत होता. तशीच तिनं युक्ती सांगतली बाबूले, 'आपून याईले मारुन टाकलं तं. ' 'पण कसे मारन. लोकाईले दिसन नाय का? ' तो म्हणाला. पुन्हा तिच्या मनात विचार आला. तशी ते म्हणाली, 'आपून मारुन आन् त्याईले दफनवून टाकून. कोणाले कायपणम माहित होणार नाय. ' 'युक्ती बरी नामी आहे. आपण तो गावले गेला सांगाचं आन् वापसच आला नाय सांगाचं अन् मंग लगन करुन टाकाचं. ' तो म्हणाला.

विचाराचा अवकाश. आज दुपारी पोरगा घरी आला होता. बाबू आतमंधीच होता. दुपारी जेवाची सुटी झाली होती. पोरगा घरी आला होता. जेवनाच्या सुटीत पोरं घरी येत. तसा तोही आला होता. बाहेरुन जसा तो घरी आला. त्यानं दरवाजा उघडला. तर पाहतो का? तं त्याची माय बाबूच्या गळयात गळा टाकून बसली होती. तो आपल्या आईले तशा अवस्थेत पाहून हैराण झाला. तसा तो म्हणाला, 'आई हे का करत आहेस. मी सांजच्याले बाबाले सांगीन. ' आतं मात्र बाईचे कान ठणकारले. आपला पती आज झोडपल्याशिवाय राहात नाय असं तिले वाटलं. आतं तं तिले मार्गच सापडला. तिनं आपल्या पोटच्या गोळ्याले यमसदनी पोहचवण्यासाठी बाबूले म्हणलं, 'बाबू हा मा पोरगा आपल्या बापाले नाव सांगत जाईन. तो मंग मारन मले. तवा या पोराचा बंदोबस्त कराले पाह्यजे' 'का करावं म्हणते' 'आपण याले मारुन टाकावं'

'खरंच' तो म्हणाला.

'हो' ती म्हणाली.

मुलगा आत गेला. त्याले का माहित होतं का त्याची आई मारन म्हून. त्यानं जेवन मागतलं. आईनं त्याले जेवन देलं. मंग

दाराची कडी आतून लावली. त्या कडीले कुलूप लावला. तशी ते आलमारीजवळ आली. आलमारीतून एक धारदार सुरा काढला. तशीच पोराची नजर आईकड गेली. तसा पोरगा म्हणाला, 'आई हे काय? ' 'बाळा मी तुझा जीव घेणार याच क्षणी. ' 'माझा जीव!अन् का बरं! मी कोणता गुन्हा केला? मी तुझं नाव बाबाले सांगणार. ' 'हं हाच तुझा गुन्हा. तू बाबाले सांग. पण जीवंत रायशीन तवा नं. 'आई म्हणाली.

'आई, मी तुझा पोरगा नाय का? या बाबूसाठी माझा जीव. हे पाप आहे आई. माझे बाबा तुले सोडणार नाहीत. '

'तुझ्या बाबाले माहित होईल तवा नं. '

तो अतिशय घाबरलेला. आई आई म्हणत विव्हळत होता. गयावया करीत होता. पण पिरमाचं भूत त्या मास्तरीनच्या डोक्श्यावर होतं. पोरानं तशी ताटाले लात मारली. ते जेवन त्याच्यासाठी जहर बनलं होतं. तसा मुलगा दाराजवळ गेला. तोच बाबूनं त्याले पकडलं. मुलगा ओरडू लागला. पण त्याचा आवाज आजुबाजूले जात नोयता. सर्वजण शेतावर गेले होते. आतं सुरा बाबूच्या हातात विराजमान झालेला. तो सुरा निष्पाप,

निरागस पोराचा जीव घेण्यासाठी सज्ज होता. बाबूनं त्याले ओढत ओढत मधोमध नेला. पोरगा मात्र ओरडत होता,

'आई मी पाया लागतो. '

पण आईले काही त्याची दया नोयती. ते मात्र पिरमात आंधळी झाली होती. जे पिरम आंधळं झालं होतं. दयेमायेचा विचार करणार नोयतं. तसे तिनं आपल्या पोराचे दोन्ही हात पकडले व म्हणाली,

'बाबू टाक पोटात सुरा. आतड्या बाहीर काढ. वेळ करु नोको. '

तो तिच्या पोटचा गोळा. जीवाच्या आकांतानं ओरडत होता. आईले त्याच्याबद्दलही पिरम नोयतं. तिले त्या शेतकरी पोशाखाची घृणा होती. जो पोशाख तिले डिवचत होता. जो पोशाख तो तिच्या शाळेत घालून गेला होता. त्या पोराच्या रडण्याचा तिच्यावर कोणताच परीणाम झाला नोयता. होतबी नोयता. बाबूही आश्चर्यचकित झाला होता. नियती क्रूर झाली होती. तसे तिनं त्याचे हात अजून घट्ट धरले. तसं पायाच्या कैचीत त्याले दाबलं. तशी ते पुन्हा म्हणाली,

'बाबू तुम्हाले आयकाले नाय आलं का? टाकानं सुरा पोटात. उशीर झाला नं. लोकं आले तं आपलं मिशन उघडं नाय पडन का? अन् तो कुत्रा आला तं सारंच वाया. '

ते आपल्या नवऱ्याले कुत्रा म्हणत असे.

बाबू त्या पोराजवळ गेला. त्याच्या हातात सुरा होता. त्याचा हात थरथर कापत होता. तशी ते म्हणाली,

'बाबू घाबरता कायले? हे सगळं तं तुमच्यासाठीच का नाय. टाका पोटात सुरा, नायतं मानगुट कापा. '

'नाय, नाय. माझ्याच्यानं शक्य नाय. तुच मार तुझ्या पोराले. '

'मीच करु. ठीक आहे, मीच करते. आतं पकडा तरी याले. नीट पकडा. '

बाबूनं तिच्या हातात सुरा देला. त्यानं त्याचे हातपाय पकडले. तशी ते म्हणाली,

'माणसासारखे मर्द. अन् सुरा माराले घाबरते. बरं मीच ठार करते. पकडा नीट. '

'बाबूनं तर घट्ट पकडलं होतं. त्याचबरोबर तिनंही एका हातानं त्याची मानगुट पकडली आणि दुसऱ्या हातात सुरा. तो सुरा त्याच्या मानेजवळ नेला आणि ते धारदार सुरा चालवू लागली. तशा रक्ताच्या चिरकांड्या पुर्ण घरभर पसरल्या. तिच्या साडीवर आन् बाबूच्या कपड्यावरबी.

बाबूही फार घाबरला होता. आपण काही म्हणलं तं खुन सवार असलेली हे माता आपलाही असाच अंत करन. असं त्याले वाटलं. म्हणून तो गप्प होता.

पोराची मान अर्धी कापलेली. पोरगा तडफडू लागलेला. त्यानं पाण्यासाठी तोंड फाडलेलं. पण निर्दयी मातेने त्याच्या तोंडात पाणीही टाकलं नाय. तिनं ते प्रेत कोठडीत ठेवलं आपल्या नवऱ्याची वाट पाहात....

सांजच्याला कास्तकारबी घरी आला. तिनं चांगला पावणचार केला. आन् त्या जेवनात विष कालवलं व सोताला भूक नाय म्हणत त्याईले देलं जहर पाजून. दोघंबी बाप बेटे तळपू तळपू मरण पावले. पण ते हसत होती. ते पळून जावू नये म्हणून तिनं दाराले आतून कुलूप बी लावला.

मेल्याची शहानिशा झाल्यावर तिनं बाबूले फोन लावला. बाबूनं तिच्यासोबत मिळून घरातच गड्डा खोदला व दोघालेबी गाडून टाकलं घराच्या आत.

दोघंबी मरण पावले होते. ते मातर सकाळी उठून आपली तयारी करुन नोकरीनिमित्यानं घराले कुलूप लावून चालली गेली. शाळेत सुट्ट्या टाकल्या व बाबूसमवेत ते फिरालेबी चालली गेली.

दुपार झाली होती. शाळेत त्या कास्तकाराचा पोरगा दिसत नोयता. जो दररोज येत असून हुशार होता. तसं त्या मास्तरानं शाळेतल्या पोराले विचारलं. पोरांनी सांगतलं, 'सर गावले गेले असतीन. कुलूप लावून दिसते. ' आता वावरवाला माणूस. शेत सोडून कोणत्या गावाले जाणार म्हणून पोराचं न आयकता मास्तर घरी आला. दरवाज्याले कुलूपच होता. पण दरवाज्याले मात्र फट होतीच. त्या मास्तरनं दरवाजा पाह्यला आन् तेथून जाले निघाला. तोच त्याले काहीतरी मेल्याची वास आली. वास दरवाज्याच्या आतमधूनच येत होती. मास्तरानं दरवाजा तपासला तर काय? आतमध्ये उकरलेली माती दिसली. त्या मास्तरानं दरवाजा तोडला. तर तिथं एक गड्डा दिसला. त्याले

जाणवलं हे गावाले गेले नसून इतं कोणाचा तरी खुन झाला आह, अन् तो मुडदा याच घरात याच जागेवर गाडलेला आहे. त्यानं पोलिसस्टेशनले तक्रार केली. तपासाअंती तेथं मुलगा अन् कास्तकार दिसला. मात्र बायको दिसली नाय. तवा जाहिर झालं का हा खुन मास्तरीनंच केला असावा. पोलिसं मागावर गेले. तिच्या शाळेत विचारलं तर तेथं ते आठ दिवसासाठी सुटीवर गेलेली दिसली. आता तं संशय जास्तच बळावला. तपासात वेग आला अन् काई दिवसातच त्या मास्तरीनले आन् त्या बाब्याले जेलची हवा भेटली. का भेटलं त्या बाईले..... अन् त्या बाब्याले..... चांगली सरकारी नोकरी होती. भरपूर पगार होता. पण इल्लत्या भरल्या होत्या. वाईटाचा परीणाम वाईट. चांगल्याचा चांगला."

"शिक्षक म्हटलं तर भवितव्य घडविणारा एक घटक. विद्यार्थ्यांचे भवितव्य तो चार भिंतीत घडवत असतो. पण हा शिक्षक जर असा असेल, तर त्या विद्यार्थ्यानं कोणाकडं पाहावं. समाजात काही लोकं असेच दांभीक असतात. ते स्तुतीनं भारावून जातात. त्यांच्यामध्ये एक अहंकार येतो. हा अहंकारच त्या माणसाच्या नाशाला कारणीभूत ठरतो."

त्या कारखान्यात लोकांना काम तर मिळालं होतं. पण त्या कारखान्यात लोकांना विविध रोगही तेवढेच जडलेले होते. त्यातून वाहणारं सांडपाणी आणि त्याच्या दुर्गंधीनं परीसरातील लोकांनाही छळलं होतं. वरुन निघणाऱ्या धुळानं आजुबाजूची शेती पिकत नव्हती. बाहेर साचलेलं खराब पाणी, त्यात मच्छर तयार होत. ते डास चावायचे व त्यातूनही आजार व्हायचे. त्या पाण्याच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. पण पैशानं त्या तक्रारी दाबल्या होत्या.

असा हा कारखाना भयाण रातीचं प्रतिक होता. कित्येक गेनबासारखे बळी या कारखान्यानं घेतले होते. पण ती प्रकरणे उघडकीस आली नव्हती. पण हे प्रकरण आपण उघडकीस आणूच असा विचार तो करीत होता. त्याच्या मनात अजूनही ते दृश्य दिसत होतं. जे त्यानं पाहिलं होतं.

रस्त्यावरुन काही ट्रक भरधाव चालत होते. या भरधाव ट्रकच्या आवाजात त्यालाही काही सुचत नव्हतं. अशातच तो कारखाना आला. तो कारखाना नव्हता तर कामगारांचा कर्दनकाळ होता. जसा कारखाना दिसला, तसा सायकलचा वेगही आपोआप वाढला. त्याच्या मनात नवीन उत्साह

संचारला होता. त्यातच तो फुलत होता. तसा तो सायकल चालवत चालवत कारखान्याजवळ पोहोचला. अजुनपर्यंत कामगारमंडळी तिथं पोहोचली नव्हती. तसा तो त्या कारखान्याजवळ असलेल्या चहाटपरीवर थांबला. चहा पिण्याचा मोह त्याला आवरला नाही. तशी त्यानं चहाची ऑर्डर दिली. त्यानं चहा घेतला. तसे काही वेळात हळूहळू कामगार कारखान्याजवळ येवून पोहोचले. कामगारांनी सायकली लावल्या.

चहा टपरी.... त्या चहा टपरीवर दोन लहान मुलं होती. ती बहूतेक बालमजूर असतील. चहाची कपं धुवायची. बदल्यात त्यांना नाश्ता मिळायचा. दामोधरला लहानपणीची गोष्ट आठवली. लहान असतांना असाच दामोधर एका चहाटपरीवर कामाला लागला. या टपरीवर मालकानं दोन वेळा नाश्ता देण्याचं कबूल केलं होतं. पण मालक मोठा कंजूष होता. त्यानं सुरुवातीला चहा व नाश्ता दिला. पण काही दिवसानं तो नखरे दाखवू लागला होता. याच मालकाच्या नखऱ्यानं पुढं त्यानं ती टपरी सोडली होती.

याच टपरीवर एक सतरावी शिकलेला मुलगा काम करायला आला होता. त्याला फक्त टाईमपास करायचा होता. नव्हे तर त्याची खाण्यापिण्याची सोय नसल्यानं तो टपरीवर काम करीत होता. त्याला दामोधर भाऊ म्हणायचा. तो शिक्षण शिकत होता. त्याला खाण्यापिण्यासोबतच आपल्या शिकण्याची सोयही पुर्ण करायची होती. याच टपरीवर मालक शिकला नसल्यानं तो या शिकणाऱ्या तरुणाची खिल्ली उडवत असे. कारण त्याला शिक्षणाचं महत्व वाटत नव्हतं.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. परीक्षा जवळ आली होती. हा तरुण अभ्यास करायचा. पण मधातच ग्राहक यायचे. अभ्यास व्हायचा नाही. कधीकधी बाहेर चहा पोहोचवावा लागायचा. त्या तरुणास लाज वाटायची. हे दामोधरच्या चाणाक्ष नजरेतून सुटलं नाही. मग काय कधीकधी दामोधर चहा घेवून जायचा. त्या तरुणाला ते काम करु देत नसे.

कधीकधी मालकाचे नातेवाईक यायचे. तेही त्याची टिंगल टवाळी करुन जायचे. अशा वातावरणात दामोधर घडला. त्यावेळपासूनच आपण चहाटपरी उघडावी असं दामोधरला वाटत होतं. पण जवळ पैसा नसल्यानं तो गप्प बसला होता.

शिवाय धंदा चालणारच असं त्याला वाटत नव्हतं. म्हणून त्यानं आजवर धंदा टाकायला मागंपुढं पाहिलं होतं.

तो तरुण सतरावीची परीक्षा देत होता. सतरावीची परीक्षा..... गि-हाईकांची तारांबळ..... वेळ अभ्यासाला नसणे. तो पुस्तक सदैव हातात ठेवायचा. काम करता करता अभ्यास करतांना त्याला बरं वाटायचं. त्यातच त्यानं वाचलेल्या गोष्टीही त्याला व्यवस्थित लक्षात असायच्या.

'तुझ्या शिक्षणाचा उपयोग काय? तू तर टपरीवर काम करतोस. तुझ्यापेक्षा ते दहावी शिकणारे बरे!' मालकाच्या नातेवाईकाचे शब्द. अगदी काटे टोचल्यागत वाटायचं. दामोधर ते पाहात आणि अनुभवत असतांना त्यालाच ते काटे टोचल्यासारखे वाटायचे. म्हणूनच तो तरुण त्या टपरीवर जास्त काळ टिकू शकला नाही. त्यानं अल्पावधीतच त्या टपरीला तिलांजली दिली होती.

“काय दामोधर, केव्हा आलास?” कोणीतरी म्हणालं.

“बस आताच.”

“आज पावणेअकरा वाजले तरी बरेच कामगार दिसत नाहीत, आज कारखाना बंद आहे का?”

“आज कारखाना बंदच समज.”

“म्हणजे?”

“संप करायचा ठरवला न रे.”

“संप अन् या कारखान्यात!तू वेडा तर नाही ना.”

“तू काल आला होता का?”"

“नाही.”

“म्हणूनच तुली माहित नाही वाटते.”

“पण कशासाठी संप आहे?”

“गेनबाला ओळखतो का?”

“हो. तो कामगारांचा भला माणूस.”

“हो.”

“त्यानं सांगितलं का संप?”

“नाही.”

“मग?”

“त्याला काल भट्टीत टाकून मारुन टाकलं मालकानं. म्हणून संप.”

“बापरे! एवढी मालकाची हिंमत.”

“हिंमत म्हणजे? आपण एकत्र येत नाही म्हणून त्यानं हिंमत केली. आपल्या फुटीर स्वभावाचा फायदा घेतला मालकानं.”

“हं तेच. तेच समज.”

“मग आज संप करायला कामगार येतील का?”

“येतील..... ते नक्कीच येतील. घरी बसून काहीही होत नाही. मैदानात उतरले पाहिजे.”

“पण अजुनपर्यंत कामगार आले नाहीत.”

एवढ्यात एक संपकरी कारखान्यात आला. म्हणाला, “दामोधर, तू लवकर आलास. पण कामगार अजुनपर्यंत नाही आलेत. अन् हे पाय मी पाट्या बनवल्या, हे फलक पाय. कसे बनलेत?”

“तू तं चित्रीकरण केलं. तू चित्रकार आहेस का? हे बॅनरही छान उजळून दिसत आहेत.”

“मी पेंटर वाटतो तुले.”

“हो, पेंटरच.”

“कुलूप आणलं का?”

“हो कुलूप बी आणलं.”

अकरा वाजत आले होते. हळूहळू एक एक कामगार तिथं उतरला. कामगारांची गर्दी गोळा झाली. तशी पहिली शिप सुटली होती. पण कामगार आत जायला तयार नव्हते. एवढ्यात भावराव म्हणाला,

“रघुनाथ आज संपाचं नेतृत्व तू करायचं.”

“नाय, मले जमणार नाय.”

“म्हणजे तू घाबरतेस वाटतं या भडव्यायले. दे माझ्या हाती फलक. मीच पाह्यतो का कराचं ते.” तो त्वेषानं म्हणाला.

“अरे साविनंदा आहे नं. अन् तो शिकलेलाबी आहे.”

"दे रे बाबा भावराव, मी करतो नेतृत्व." साविनंद म्हणाला.

"साविनंदा, मी घाबरत नाय. मी तुझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. मात्र एक कर तू समोर राहा. मालकानं तुले काईबी करण्याचा प्रयत्न केला, तं मी सामने होईन. दोस्ती जिंदाबाद समज. मी झालो असतो पुढं. पण मी काई तेवढा शिकलो नाय. माझं कोणी आयकणार नाय. फक्त कामगारान आयकलं म्हणजे झालं असं समजू नोको. हा भ्रम तू डोक्यातून काढून टाक. आम्ही सगळे कामगार तुझ्या पाठीशीन आहोत."

"रघुनाथा, रागावला. रागवू नको.""

"नाय रे, , यात राग कसला? पण मोर्चाचं नेतृत्व तुच करावं. कारण तू शिकला आहेस. तुझ्या बोलण्यात त्या सुर्याचं तेज आहे. कालचं माहित आहे न तुले. त्या पोलिसाच्या डोक्यावरुन माझे शब्द गेले. तुझे नाय."

"बरं झाली का सगळी तयारी?"

"हो, सगळी तयारी झाली."

तसे सगळे कामगार एकत्र झाले. तसा साविनंदा म्हणाला,

“चला तर मग, आता आपला उद्देश ठरला. आता आपण मागं हटायचं नाही. प्राण गेला तरी. ज्याप्रमाणे प्रभू रामचंद्र कैकेयीने दिलेल्या वनवासावर दिलेल्या वचनातून मागं हटले नाही. खुद्द वचन मागणाऱ्या कैकेयीने वचन मागं घेतलं तरी. आपणही तसंच करायचं. हा तुमच्यासाठी फार मोठा फायदा आहे. जर आजच तुम्ही निर्धार करुन लढलात, तर उद्या इथं येणारी सगळी तुमची भावी पिढी नव्हे तर तुमचीच मुलं..... सुखी होणार आहेत. तर मग करा निर्धार मनात. तोही पक्का करा आणि विचार करा की आता संघर्ष करतांना ही नोकरी राहिलच असं नाही. आपण धंदे टाकू ही नोकरी गेली तरी. अरे किडे मुंग्याही जगतातंच उकिरड्यावर. आपण तर माणसं आहोत. आपण का जगू शकणार नाही या कारखान्याशिवाय. पण हे लक्षात घ्या. काल गेनबा मेला. आज आपल्यावर पाळी आहे. न्याय मिळालाच पाहिजे. आपल्यालाही अन् त्या गेनबालाही. मग सांगा कोण कोण तयार आहे. सर्व या बाजूला या आणि जे तयार नाहीत. ते विचार करुन जागेवरच थांबा. कारण आपलं हे आंदोलन म्हणजे आपली नोकरी पक्की गेली म्हणून समजा आणि या नोकरीवर तुम्ही आलाच. तर तो मालक तुम्हाला गेनबासारखं एका एकाला पुढं मागं समाप्त

करेलच हे लक्षात घ्या. म्हणून या गोष्टीचा सर्वतोपरी विचार करुन माझ्या बाजूला या. जे तयार नाहीत, त्यांना येण्याची गरज नाही.''

ते त्वेषपुर्ण भाषण त्या कामगारांनी ऐकलं. त्यांचा जोश जागृत झाला व ते तयार झाले. एका क्रांतीसाठी. जी क्रांती त्या कारखान्यात होणार होती. सगळेजण साविनंदाचं ऐकत होते.. ते आपल्यासाठी नाही. पण आपल्या भावी पिढीसाठी क्रांती करायला तयार झाले होते. त्या कारखान्यात पुढे येणारी कामगार मंडळी ती त्यांची लेकरं नसून स्वतःची मुलंच होती. तेच समजून की काय, ते सर्वजण साविनंदाच्या बाजूला उभे राहिले होते.

कारखान्यात फलकाजवळ चौरीदार उभे होते. एक एक करत आतील कामगार बाहेर येत होते. त्यांची चौकशी सुरु होती. साविनंदानं पटकन एक अर्ज लिहिलेला कागद चौकीदाराजवळ दिला. म्हणाला,

''ये अर्जी साहाब को देकर आओ।"

''ठीक है। आता हूँ।"

चौकीदार आत गेला. तो काचेचा कमरा होता. त्या कमऱ्यात मालक एका खुर्चीवर बसला होता. आजुबाजुला चमचेही बसले होते. तास खेळणं सुरु होतं. आतून बाहेरचं सारं दिसत होतं. तसा चौकीदार म्हणाला,

"साहेब, , आत येवू का?"

क्षणभर मालक थांबला. मग म्हणाला,

"ये. कोणतं काम आहे?"

"मालकसाहेब, हा कागद त्या कारखान्यातील कामगारानं दिला आहे."

"का लेहलं आहे?"

"माहित नाही साहेब. आपणंच वाचून पाहा."

"साले, काम न् धाम. किती सुट्ट्या मारतेत कामगार. नुसत्या सुट्ट्याईचे अर्ज पाठवतेत. सुट्ट्याईचा अर्ज आहे का?"

"माहित नाही साहेब." त्यानं अर्ज हातात दिला. तसा तो म्हणाला,

"साहेब, मी जावू."

“जा.”

मालकानं अर्ज वाचला. अर्जात लिहिलेलं होतं.

*आ. मालकसाहेब,*

*आज आम्ही संप करीत आहोत. कारण आपण आमच्यावर आघात केला आहे. आपण निर्लज्ज पणाची कृती केलेली असून आपण गेनबासारख्या विचारवंताला ठार केलं आहे. अशा प्रकारची ही पहिली घटना असून अशा घटना आपल्या कारखान्यात बऱ्याच झाल्या आहेत. पण त्या घटनांकडे आम्ही कानाडोळा केला. पण गेनबासारख्याला ठार करुन आपण कामगारांच्या संतापाला तोंड फोडलं आहे. तरीपण आम्ही त्याही गोष्टीकडे दुर्लक्ष करुन आपल्यापुढे मागण्या मांडत आहोत. आशा आहे की आपण त्या त्वरीत पुर्ण कराव्यात. नाहीतर आम्ही आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत कामावर हजर राहणार नाही. तसेच दुसऱ्या कामगारांनाही कामावर हजर होण्यास अडथडे आणू. तसेच आपण जर अर्ध्या तासात आमच्या समक्ष हजर झाले नाही तर तुमची आमच्या*

मागण्यांना मंजूरी नाही हे समजून आम्ही कारखान्याला कुलूप ठोकू. यात काही नुकसान झालेले असल्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. तेव्हा आपण आमच्या मागण्या ज्या खालील प्रमाणे आहेत. त्या वाचून घ्याव्यात.

*मागण्या*

(१)गेनबाच्या मृत्यूला न्याय मिळायला हवा. त्याच्या परीवाराला पोट भागवण्यासाठी पेन्शन व गेनबाचा मुलगा मोठे झाल्यावर त्याला नोकरी.

(२)पुन्हा असाच कोणताही कामगार आपण मारणार नाही याचं लेखी आश्वासन.

(३)कामगारांच्या कामाचे तास कमी करणे. बारा तासावरुन आठ तास.

(४)वेतन वाढवणे किमान पोट भरेल एवढंतरी.

(५)सुपरवायजरचा दबाव कमी करणे.

(६)सुट्या द्याव्यात. सुट्यांचा पगार कटू नये. महिण्यातून दोन दिल्या तरी चालतील.

*(७)आम्हाला दर दिवाळी व होळीला बोनस म्हणून काही रक्कम मिळण्याची तरतूद करावी.*

*(८)कामगारांच्या सुरक्षेची हमी द्यावी. नव्हे तर संरक्षण म्हणून विमा द्यावा.*

*(९)भविष्य निर्वाह निधी म्हणून आमची रक्कम आजपासून आमच्या नावाने खात्यात जमा व्हावी.*

*(१०)कामगाराच्या आरोग्याचा पैसा म्हणून दवाखान्यासाठी कारखान्यातून विशेष सेवा शुल्क योजनेंतर्गत काही रक्कम मिळावी.*

*मालकसाहेब आपण या मागण्यांवर अर्धा तास चांगला विचार करा. त्यानंतर या. जर या मागण्यांपैकी आपण एकजरी मागणी मान्य केली नाही तर त्यावर नंतर उपाय काढू.*

मालकानं तो अर्ज संपुर्ण वाचला. त्याच्या लक्षात आला कालचा सगळा प्रकार. काममगारांनी संप पुकारल्याचं अंदाज येत होता. पण कामगार आपल्याला घाबरणार जरी नसले तरी आपण त्यांना पाहून घेवू. या गुर्मीत मालक होता. त्याला

पैशाचा माज चढला होता. वाटत होतं की दोनचार दिवसात उपासााचे फाके पडायला लागतील व कामगार झुकतील.

त्यानं बेल वाजवली. तं एका व्यक्तीला निरोप देवून पाठवलं की साहेब मिटींगमध्ये आहेत. निरोप देणारा निरोप घेऊन आला. त्यानं सांगितलं साहेब मिटींगमध्ये आहेत. तेव्हा ही गोष्ट साविनंदाच्या लक्षात आली व त्यानं परत निरोप पाठवला की आता जर मालक आले नाही तर आपण कारखान्याला कुलूप लावू. चौकीदार परत ते सांगायला गेला. चौकीदार परत गेला. त्यानं परत ती गोष्ट मालकाला सांगीतली. मात्र यावेळी मालकानं येत आाहो असा निरोप पाठवला.

कामगारांच्या मनात विचारांचं वादळ निर्माण झालं होतं. एरवी प्रत्येक कामगार आज भडकून उठला होता. सुडानं पेटून उठला होता. हिच सुुडाची भावना वेगळया स्वरुपाची होती. ते मालकाची वाट पाहात होते.

आज सुर्यही चांगलाच तापत होता. त्या उन्हाच्या तडाख्यात अंगाची लाही लाही होत होती. त्या लाहीत कामगाराचं अंग भाजून निघत होतं. पण त्या कामगारात जोश होता. तो सुर्य तापत असला तरी त्या कामगारांना रोखू शकत

नव्हता. तसं साविनंदाला त्याचं बालपण आठवलं. तो जेव्हा कॉलेजात होता. तेव्हा तो स्पर्धेला गेला होता. त्या स्पर्धेत एका तेरा वर्षाच्या मुलीनं कविता सादर केली होती. कवितेचे नाव शिल्पकार होते. ती मुलगी हुशार होती. तिनं छान कविता सादर केली होती. बहुतेक ती कविता आईवर आधारीत होती. कवितेत कधी प्रेम तर कधी रडल्याचे भाव होते. ती मुलगी रडण्याच्या प्रसंगात रडतही होती. त्यामुळे तिचाच पहिला क्रमांक येईल असं वाटत होतं. पण दुसऱ्याच मुलीचा क्रमांक आला होता. परीक्षकानं परीक्षण कसं केलं तेच समजलं नव्हतं. जगात अशीही माणसं असतात की त्यांच्याजवळ एवढासाही गुण नसतो तरी ते मालक बनतात आणि गुणवान माणसं नोकर वा कामगार बनतात.

आज कामगारांच्या त्या संपाचा सुर्याला राग आला होता. तो खुप तापत होता. सर्व कामगार भाजून निघत होते. सर्वांच्या कपाळावरुन घामाच्या धारा बाहेर पडत होत्या. कामगारानं आपली रुमाल डोक्यावर घेतली होती. ते वाट पाहात होते. पण बराच वेळ होवूनही मालक न आल्याने आपण आाता

कारखान्याला ताळेबंद करावं असं साााविनंदासह कामगारांना वाटत होतं.

याच गोष्टीचा कामगारांना भयंकर राग येत होता. सुर्य माथ्यावर आला होता. तसा साविनंदा म्हणाला,

"मित्रांनो, हे मालक म्हणजे ढोंगी माणसांचे पुतळे आहेत. आता कोणीही मागे सरायचं नाही. यांना घाबरायचं नाही."

कामगारांनी साविनंदाचं बोलणं ऐकलं. ते सुडानं पेटून उठले होते. गेनबाला न्याय मिळायला हवा असं त्यांना वाटत होतं. चौकीदारालाही संपावर जावं असं वाटत होतं. मात्र तो जावू शकत नव्हता. आता तुरुंगवास मिळाला तरी चालेल, पण आता मागं हटायचं नाही असं कामगारांना वाटत होतं. कामगारांनी मनाची पुर्ण तयारी केली होती. आपण उपाशी राहिलो तरी चालेल.

कामगारांच्या मागण्या विधायक होत्या. ट्रक ड्रायव्हरही बाराही महिने ट्रक चालवायचा. मात्र तोही कामगार दिनाच्या दिवशी घरी यायचा. संपतही याच संपावर होता. त्यानंही

मनाची तयारी केली होती. परंतू त्याच्या डोळ्यात लज्जेचे तृषार होते.

मालक अजून आला नव्हता. मात्र कामगारांच्या गोष्टी सुरु होत्या. निःस्तब्ध त्या वातावरणातच. संभाषणही सुरु होतं. कालांतराने कामगारानं याचा कानोसा घेतला.

काही वेळ जाताच मालक एका हातात फाईल घेवून आला. कामगारांना हायसं वाटलं. त्यांना वाटलं मालक मागण्यांची परीपुर्तता करायला आला. पण मालक आल्याबरोबर गाडीत बसले. ड्रायव्हरनं गाडी सुरु केली व पळण्याची तयारी करु लागला आणि कामगारांना कळून चुकलं की मालक पळत आहेत. त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणार होतं. तोच कामगारानं विचाराचं राजकारण केलं. आज जर मालकाला जावू दिलं तर असा दिवस पुन्हा उजळणार नाही असं कामगारांना वाटलं. त्यांनी त्याला अडवलं. तसं साविनंदानं म्हटलं,

"मालकाला गाडीतून बाहेर काढा. त्यांना जावू देवू नका. नाहीतर मालक पुढे महिनाभर कारखान्यात येणार नाही आणि एसीच्या हवेत बसला राहिल. आपल्याला मात्र उन्हातच त्याची वाट पाहात तळपत राहावं लागेल. तेव्हा त्याला अडवा.

त्याला आपल्या मागण्या पुर्ण होईपर्यंत जेवू देवू नका. आपण उपास भोगायचा आणि त्यानं जेवायचं काय? त्यापेक्षा तो उपाशी तर आपणही उपाशी. बरोबर की नाही."

कामगार साविनंदाचा शब्द न् शब्द ऐकत होते. त्यांनी मालकाला गाडीच्या बाहेर काढलं.

मालकाला गाडीतून बाहेर काढताच साविनंदा खुश झाला, त्याला मनोमन बरं वाटलं. तसा तो चौकीदाराला म्हणाला,

"खबरदार दार उघडलं तर.... कामगार एकता जिंदाबाद. कामगारांना न्याय मिळायलाच हवा."

साविनंदानं हातात कुलूप घेतलं. काही पत्रकं घेतली व तो पुढं सरसावला. ती संपूर्ण पत्रकं कामगारात वाटायला लावली व दाराला कुलूप लावून मालकाला बंदिस्त करुन टाकलं.

कारखान्याला एकच दार होतं. मुख्य रस्ता होता तो. आता मात्र मालक पुरता घाबरला. त्याला वाटलं, आता कामगार भडकले. पोलिसांना शरण गेल्याशिवाय पर्यायच नाही. त्यानं आतमधूनच पोलिसांना फोन लावला. अशानं तरी ही कामगार

मंडळी घाबरतील असं त्या मालकाला वाटलं. काही वेळ असा निघून गेला. तसे पोलिस आले.

संप काही एका दिवसात ठरवण्याचा प्रकार नव्हता. पहिलं पोलिसस्टेशनला अर्ज देवून परवानगी घ्यावी लागत होती. पण अचानक गेनबाच्या मरणानं कामगारांच्या मृत झालेल्या मनात बदल झाला आणि एका रात्रीतून हा कामगार संपाचा दिवस उजाडला. त्यामुळे आलेले पोलिस प्रकरणाची शहानिशा न करता थेट गेटजवळ उभे झाले व चौकीदाराला गेट उघडायला लावू लागले. पण त्या गेटच्या कुलूपाची किल्ली साविनंदाजवळ आहे असं चौकीदारानं सांगितलं.

"हॅलो, मी एम एस कंपनीचा मालक बोलतो.. आपण इन्स्पेक्टर का?"

"होय, बोला, काय झालं?"

“अजी माझ्या कारखान्यातल्या लोकांनी संप पुकारला.”

“मग काय झालं?”

“अजी ते मले माराले पाहात आहेत.”

“का बरं?”

“खुप भगदाड झाली आहे. तुम्ही लवकर या. कामगार ऐकत नाही आहेत.”

मालक घाबरला होता. त्यानं फोन लावला होता शंभर नंबरवर. त्याला वाटत होतं की हे कामगार सोडणार नाही मला. ते उपासानं तरी मारतील.

थोड्याच वेळात पोलिस आले. पण ते पोलिस कामगारांनाच दमदाटी करायला लागले होते. कारण या मालकानं फोनवरुन त्यांना सेट करुन टाकलं होतं. रस्त्याने गाड्या बाजूला करीत सायरन वाजवत त्या पोलिसांची गाडी चालत होती. कुठे आग तर नाही ना लागली. कुठं काही हादसा ना झाला असं वाटत होतं.

एम एस कंपनीचं नाव होतं. तो कारखाना पन्नास वर्षापासून तटस्थ तालूक्याच्या ठिकाणी ओसाड अशा जागी स्थित होता. स्थापनेपासून कधीही त्या कारखान्यानं आजवर संप पाहिला नव्हता. संपाची हवाही कुठं पसरली नव्हती आज पहिल्यांदाच ती मंडळी संप अनुभवत होती. जसे पोलिस संपक-यांजवळ येवून धडकले, तसा साविनंदा म्हणाला,

"कामगार युनियन जिंदाबाद."

इन्स्पेक्टर म्हणाला,

"शांत राहा. सगळं व्यवस्थित होईल. मला सहकार्य करा. बंधुनो, मीही तुमच्यासारखाच कामगार. फरक एवढाच की तुम्ही कारखान्यात काम करता अन् मी सरकारची नोकरी. मला कामगारांची जाणीव आहे. पण मलाही आतमध्ये जावून चौकशी केल्याशिवाय कोणताही निर्णय घेता येणार नाही. हे बघा कामगार मित्रांनो, मला तुम्ही आपला मित्र समजा. मी तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करील. फक्त मला आत जावू द्या. तुम्ही मात्र निर्णयाच्या आड येवू नका. ज्याचे चुकले असेल, त्याला कानून शिक्षा देईल."

इनस्पेटरचं गोड गोड बोलणं. तो कामगारांना दयाळू वाटला. पण तो दयाळू नव्हता.

त्या कामगारांनी त्या पोलिसाला आतमध्ये जावू दिलं. तसा तो पोलिसवाला शिपायांना म्हणाला,

"तुम्ही इथंच थांबा, मी आतमध्ये जावून येतो. तुम्ही मी येईपर्यंत परीस्थिती सांभाळून घ्या."

इनस्पेक्टरचं आत जाणं साविनंदला संशयास्पद वाटत होतं. पण तरीही संधी द्यावी अशा विचारानं तो गप्प होता. तसा इन्स्पेक्टर आत जाताच त्यानं केबीनमधील मालकाला पाहिलं. तो मालक डोक्यावर हात ठेवून विचारात पडला होता. तो चिंतेत आहे हे त्याच्या वर्तनावरुन दिसत होतं.

"नमस्कार साहेब."

आवाज ऐकताच मालक ताड्कन उभा राहिला. त्यानं त्यांना बसायला खुर्ची दिली. तसा तो म्हणाला,

"नमस्कार."

"बोला, कशी काय आठवण झाली?"

"अहो या कारखान्यात कामगारांनी अचानक संप उभारलाय. तवा मले भेव आहे का हे कारखाना जाळून टाकतीन. तवा आपल्याले विनंती आहे का हा संप मोडावा. वाटल्यास आपण म्हणाल त्या अटी मान्य आहेत."

"ठीक आहे. आता खुलं खुलंच बोलतो."

"बोला."

त्यानं इकडं तिकडं पाहिलं. काही कैमेरे लागले आहेत का तेही तपासले. तशी शहानिशा करुन तो म्हणाला,

"पैसे लागतील कामाचे?"

"ठीक आहे. आकडा बोला."

तसा तो म्हणाला,

"कमीतकमी दहा हजार रुपये."

"दिले. फक्त तुम्ही बंदोबस्त लावा."

"द्या आधी हातावर. मग सगळं व्यवस्थित होत नाही का तर पाहा."

त्यानं अालमारी उघडली. त्यातून दहा हजार रुपयाची गड्डी काढली आणि ती इन्स्पेक्टरच्या हातात देत म्हणाला,

“पाहा बरं, काम झालंच पाह्यजे.”

“काम शंभर टक्के फत्ते होईल. तुम्ही चिंता करु नका. निश्चींत बसा केबीनमध्ये.”

इनस्पेक्टर बाहेर आला. तो गेट जवळ आला. तसा तो कामगारांना म्हणाला,

“हे बघा मित्रांनो, संप करण्यात काहीच अर्थ नाही. हे बघा, लवकरात लवकर कामावर रुजू व्हा. नाहीतर लाठीचार्ज केला जाईल आणि तुम्हाला पकडूनही नेलं जाईल. तुमच्यावर कलमा लावण्यात येईल. कारण तुम्ही काही संप करीत असल्याची पोलिस स्टेशनला नोंद केलेली नाही. जर माझं ऐकाल तर फायद्यात राहाल.”

“साहेब, तुम्हाले मालूम नाय मालकानं का केलं ते. मालकानं काल गेनबाले जाळून मारलं कारखान्यात मालूम आहे का तुम्हाले. खुन केला खुन.”

"ते काम तुमचं नाही तपासायचं, ते काम आमचं आहे. तुम्ही त्याचवेळी तक्रार का टाकली नाही. अन् हे त्याच्या पत्नीनं करायला हवं होतं. ती कुठाय?"

"साहेब, ते तं बिचारी शोकाच्या महासागरात डुबली आहे. कशी तक्रार करन. कालचीच घटना आहे नं. आपल्याले वाटत असन तं आतं नोंद करा गुन्हा."

"तसं होतं का? उचलली जीभ लावली टाळूला. आपण पोलिसस्टेशनला या. तिथं नोंद करा. मग कारवाई करु आणि कोण साक्षीदार आहेत. साहेबानं मारलं म्हणून."

सर्वांनी हात वर केले. तसा इनस्पेक्टर म्हणाला,

"हे बघा, पहिलं तुम्ही तक्रार करा. मग पाहू काय करायचं ते. आतं आपल्या घराला जा आणि दिवसभर विचार करा अन् या उद्या कामावर शांततेनं."

"अन् तुमचं नाय आयकलं तं." रघुनाथ म्हणाला.

"ऐकावंच लागेल. नाहीतर लाठीचार्ज करु."

“मग तसं जर आहे तर आम्हालाही तुमचा बंदोबस्त करावाच लागेल. नाहीतर साहेब, तुम्ही मधात पडू नका.” साविनंदा म्हणाला.

“तू कोण रे?” इनस्पेक्टरनं विचारलं.

“मी यांचा नेता. बोला काय म्हणायचं?”

तसा इनस्पेक्टर शिपायांना म्हणाला,

“मारा रे. पहिलं यालाच मारा. झोडपून टाका. जेव्हा तंगडे तुटतील, तेव्हाच अक्कल येईल याला. अन् याला अक्कल आल्याशिवाय बाकीच्यांना येत नाही. तेव्हाच यालाच आधी तोडा.”

“इन्स्पेक्टर$$" एकेरी शब्द..... साविनंदाचा आवाज वाढला होता. त्याच्या बोलण्यातून आवेश स्पष्ट दिसत होता. तसा तो बोलत होता.

“तुम्ही मधात पडू नका. शेवटचं सांगतोय. जर का तुम्ही मधात पडले तं तुमचेही हाल त्या कारखान्यातील मालकांसारखेच करु. इथं आमचा सहकारी गेनबा मेला नव्हे

तर मारला मालकानं आणि तुम्ही त्याला शिक्षा देण्याऐवजी आमच्यावरच लाठीचार्ज करा म्हणता.”

तसा तो आपल्या कामगार मित्रांना म्हणाला,

“हे बघा, आता पोलिस मारो की कैद होवो की आपला प्राण जावो. आपण आता हटायचं नाही. समजा यांनी लाठीचार्ज केलाच तर या काठ्या तोडून टाका. त्या मालकासह या पोलिसांनाही धडा शिकवा. बाकीचं मग पाहून घेवू. महत्वाचं सांगतो, तुम्हाला जे करायचं ते करा. पण मागं हटू नका. आपण आपला हक्क मागत आहोत. काही चूक करीत नाही. शिवाय हा आपला निजी प्रश्न आहे. हे पोलिस दखल देणारे कोण?”

साविनंदाच्या बोलण्याचा इन्स्पेक्टरला राग आला. रागाच्या भरात तो म्हणाला,

“ठीक आहे तर मग. तुम्ही असे ऐकणार नाहीत तर. करा रे लाठीचार्ज.”

लाठीचार्ज करायला सुरुवात केली. ते पोलिस यमदूतासारखे त्या कारखान्यातील कामगाराला मारत होते. जे निरपराध होते. त्या कामगाराची कोणत्याही प्रकारची दया

त्यांना येत नव्हती. यात पोलिसांचा दोष नव्हता ना कामगारांचाही. दोष होता त्या दहा हजार रुपयाचा..... जे मालकानं त्या इनस्पेक्टरला दिले होते.

तिथं जणू युद्धालाच सुरुवात झाली आहे असं वाटत होतं. पोलिस लाठ्या मारत होते. तर कामगार लाठ्या हिसकून पोलिसांना मारत होते. शेकडो कामगार आज घायाळ झाले होते. तसेच पोलिसही. पण हटत मात्र कोणीही नव्हते. तसं इनस्पेक्टरनं वरीष्ठ अधिकारी वर्गाला फोन केला. दवाखान्यातही फोन केला. तशी सरकारी यंत्रणा ताबडतोब घटना स्थळी हजर झाली. त्यांनी भराभर जखमी कामगार तसेच पोलिसांना उचलले. भेदभाव न करता, न वेळ दवडता. साविनंद जखमी झाल्याने त्याला उचलायला पोलिस गेले. पण साविनंदा म्हणाला,

"खबरदार मला हात लावाल तर. मला इथंच मरु द्या. नाहीतर माझ्या मागण्या मान्य करा. आधी आम्हाला आमचा हक्क प्रदान करा. त्यानंतरच रुग्णालयात न्या."

साविनंदा जास्तच जखमी झाला होता. पण वाघासारखं काळीज होतं त्याचं. बलदंड बाहू होते. माल कारखान्यात

भरतांना पोते खाली करावे लागायचे. ते वजनदार असायचे. त्यानं त्याचं शरीर पिळदार बनलं होतं.

क्षणभर पोलिस त्या साविनंदाकडे पाहातच राहिले. त्याच्या मनातील भावनांचा वेध त्यांनी घेतला. त्याचं कौतुक करावसं वाटत होतं. कारण जखमी होवूनही उपचाराची तमा न बाळगता तो वाघासारखा डरकाळी देत होता. आपल्या हक्काच्या गोष्टी त्याने सोडल्या नव्हत्या.

पोलिस हुकमाचे ताबेदार होते. त्यांनी जबरदस्तीनं साविनंदाला उचललं. गाडीत टाकलं आणि उपचारार्थ घेवून गेले.

गाडी सायरन देत देत वळणे घेत चालत होती. अशातच इस्पितळ आलं. भराभर कामगारांना उतरविण्यात आलं त्यांना ओपीडीतून आत रग्नालयात नेलं.

उपचार सुरू झाला होता. रघुनाथ मात्र अद्यापही जखमी नव्हता. त्याच्यासोबत बरेचसे कामगार जखमी नव्हते. मात्र त्या

इनस्पेक्टरचा राग मात्र त्यांना भयंकर आला होता. या घटनेत कामगार घाबरतील असं वाटलं होतं. पण वेगळं चित्र निर्माण झालं होतं. कामगार घाबरले नव्हते तर ते त्वेषानं अजून लढाईसाठी पुढं आलेले होते.

आता साहजिकच नेतृत्व व कामगारांचा उत्साह टिकवून ठेवण्याची धुरा रघुनाथावर आली. रघुनाथ कामगारांना सावरत होता. धिराच्या गोष्टी सांगत होता. त्या मालकाबद्दल व पोलिसांबद्दल चिथावत होता. दामोधरलाही इस्पितळात नेलं होतं. तोही गंभीर जखमी झाला होता.

रघुनाथ साविनंदचा जवळचा मित्र. आज इमानगारीची परीक्षा देत होता. मैत्रीसाठीच आज जीवही धोक्यात घालायला तो सज्ज झाला होता. मात्र पोलिस नरमले होते. कारण त्यांना वाटत होतं की कामगार पळून जातील. पण कामगार काही पळाले नव्हते. त्यामुळं याचा जाब आपल्याला आपले अधिकारी निश्चीत विचारतीलच असं त्यांना वाटत होतं.

'कामगारांचा विजय असो' कामगार मंडळी घोषणा देत होते. संप अधिकच चिरडत चालला होता.

नुकतीच सायंकाळ झाली होती. कामगारांच्या परतण्याची वेळ झाली होती. रघुनाथला विचार येत होता. काय करावे सुचत नव्हते. शेवटी त्यानं निर्णय घेतला. म्हणाला,

"कामगारमित्रांनो काहीजण घरी जा. काहीजण इथं थांबा. घरी चांगला आराम करा. आतं बेमुदत साखळी आंदोलन कराची गरज आहे. तवा आपण आळीपाळीनं साखळी आंदोलन करु. आम्ही काहीजण इथंच झोपतो."

रघुनाथचे बोलणे जसे संपले. तसं सर्व कामगारांनी म्हटलं,

"रघुनाथा आमच्यातील काहीजण घरी जायचं. मस्त आरामात झोपायचं अन् तुम्ही या ठिकाणी राहायचं रातभर. हे गोष्ट मनाले पटण्यासारखी नाय. तवा एक दिवस उपास घडलं तं का होईन बरं. आम्ही इथंच राहणार."

"नाय नाय, तुम्हाले समजत नाय. आपलं आंदोलन किती दिवस चालते हे आपल्याले तरी माहित हाय का? नाय नं. जवापर्यंत आपल्याले न्याय मिळत नाय. तवापर्यंत चालन नं आंदोलन. तवा का करुन आपण? तेवढे दिवस कसे टिकून आपण. त्यामुळं मीनं ठरवलं. जोपर्यंत आपले हक्क पुरे होत

नाय. तोपर्यंत आपण इथंच राहाचं आळीपाळीनं. समजलं का?"

"समजलं."

कामगारांनी होकार दिला. तसे काहीजण घरी गेले. त्यांनी ठरवलं होतं मनात की आता मागं हटायचं नाही. आळीपाळीनं आंदोलन करायचं. गेनबाला न्याय मिळवून द्यायचा. दामोधर, , साविनंदाच्या जखमा भरुन निघायलाच पाहिजे. आपण कसंही जगावं. काहीही करावं. पण संप मागं होवू नये. आजपासून संपासाठी जगायचं. तसा त्याच्यातील एकजण म्हणाला,

"काका, आम्ही घरी जातो व तुमचे डबेही पाठवून देतो. आन् उद्या सकाळी लवकर येतो. ताजंतवानं होवून. दिवटी केल्यासारखं. काही तं कष्ट भोगावाच लागन. त्याशिवाय न्याय कसा मिळन."

कामगार घरी जायला निघाले. आंदोलनाची नशा आज त्यांच्या रक्तात कुटकुट भरलेली होती. ती जाणवत होती. आता ते मागं हटणार नाही हे त्यांच्या चेहऱ्यावरुन अस्पष्टसं जाणवत

होतं. ते सुडानं पेटून उठले होते. आपल्या मागण्या पुर्ण करुन घेण्यासाठी ते हक्काची लढाई लढत होते नव्हे तर त्यासाठीच ते आळीपाळीनं संप यशस्वी करायच्या तयारीत होते.

काही कामगार त्या ठिकाणावरुन घरी गेले. त्यांनी आपल्याच घरी एका एका कामगारांचे डबे तयार केलकेले व तसे ते डबे घेवून निघाले.. तेव्हा त्यांना ते कार्य करण्यास धन्यता वाटत होती.

दिवसभरात उन्हातान्हात उभे राहणारे कामगार डबे येताच त्या डब्यावर ताव मारु लागले. मात्र ही रात्रच आपल्यासाठी वैरी डाव रचते की काय? असं वाटत होतं.

रघुनाथला झोप येत नव्हती. साविनंदा आणि बाकीचे जखमी कामगार कसे असतील याची चिंता सतावत होती. मात्र ते कामगार दिवसभराच्या थकव्यानं गाढ झोपी गेले होते.

रघुनाथ उठून बसला होता. थोड्याच वेळात तो उभाा झाला. त्यांनं सगळीकडं पाहिलं. कामगार गाढ झोपेत असल्याचं जाणवलं. चंद्र पुरता डोक्यावर आला होता. आकाश निरभ्र असल्यानं आकाशात मधूर चांदण्या पसरलेल्या

दिसल्या. सगळीकडं उजाडल्यासारखं वाटत होतं. कारखान्यातील लाईटाचा अंधूक प्रकाश परीसरात होता. तसं आठवलं की याच कारखान्यानं मागील वीस वर्षापासून बराच न्याय केलेला असून आपल्याला काही अंशी पोटाला आधारही दिलेला आहे. पण काहीसा अन्याय देखील.

रुग्णालयात साविनंदसह बाकीची कामगार मंडळी भरती झाली होती. इंजेक्शन व सलाईननं सर्वांना बरं वाटत होतं. रघुनाथला जशी साविनंदाची आठवण येत होती. तशीच आठवण साविनंदला रघुनाथचीही येत होती. निरपराध कामगार जखमी झाले. त्यांची नोकरीही जाणार अन् बिचाऱ्याचं नुकसान होणार इत्यादी गोष्टी त्याला आठवत होत्या. एक मन सांगत होतं की जे काही झालं ते बरं झालं, होईल तेही बरं होईल. पण दुसरं मन सांगत होतं की हे आपण जे काही केलं ते बरं केलं नाही. कारण कित्येक कामगारांच्या घरच्या वाती पेटणार नव्हत्या. तर कित्येक कामगारांच्या घरच्या चुली. जे त्या कारखान्यावर अवलंबून होते. त्यांना तर पोट भरणंही मुश्किल

होतं. मनाच्या या भोवऱ्यात साविनंदा एकटाच गुरफटत चालला होता. तो तेवढा जखमी नव्हता. जेवढे बाकीचे कामगार जखमी झाले होते. काहींच्या डोक्याला जबर मार लागून दुखापत झाली होती. तर काहींच्या डोळ्यालाही मार होता. तसा तो कामगारांचे हाल त्याही अवस्थेत पाहण्यासाठी उठला.

एकएकाच्या पलंगावर जावून तो विचारपूस करु लागला. आपण जे काही केलं ते बरोबर नाही असं कामगारांना सांगू लागला. पण उलट कामगारंच त्यावर धीर देत साविनंदाचा उत्साह वाढवू लागले. त्यामुळं कितीही आज शरीराला पोलिसांनी मारुन दुखापत केली असली तरी ती दुखापत आज हलकी वाटू लागली.

'तू जे केलंस ते अगदी छान' एक म्हातारा कामगार म्हणाला. साविनंदा भावूक झाला. त्याला रडू आल. कारण म्हातारा माणूस परीस्थितीनं लाचार होवून मुलगा पोषत नसल्यानं या कारखान्यात काम करीत होता. त्याचं व म्हातारीचं पोट भागवण्यासाठी. आज तोही म्हातारा संपात सहभागी झाला होता. त्याला म्हातारीची चिंता नसेल काय? साविनंदाच्या

मनात आलं. त्यामुळे की काय तो भावूक झाला होता. एरवी आजची पोरं आईच्या उदरातून जन्म घेतात. बापाच्या छत्रछायेखाली वागतात आणि मोठे झाल्यावर पंख फुटल्यागत आपल्या मायबापाला सोडून भुर्र होतात. त्यांना आपल्या मायबापाचीही चिंता राहात नाही. ते कसे असतील? कसे नाही हेही त्यांना वाटत नसेल....

सावितंदा विचार करु लागला. तसा एक वृद्ध कामगार सावितंदाजवळ येवून म्हणाला,

“सावितंदा, तू निराश होवू नोको. अरे तू आमचे डोळे उघडले. नायतं आतापर्यंत आम्ही झोपलोच होतो. त्या मालकाचा जुलमी अन्याय सहन करत होतो. त्या मालकाच्या डोळ्याले डोळा मिळवाची आमची ताकद नोयती. ब्र काढाचीबी नोयती. एखाद्यानं ब्र काढलाच तं मालक त्याले भट्टीतच ढकलून देत होता. असे कितीतरी मारले माणसं त्यानं. तरीही आजपर्यंत कोणी बोंबलला नाय. तो गेनबा बरा. बिचारा मेला. पण त्यानं क्रांती तं घडवून आणली. आन् तू बी बरा का त्यानं लावलेली काडी, त्या काडीले चिंगारी बनवून म्हशाल केलास. पण बेटा आतं एक ईनती आहे का हे म्हशाल आतं

विझू देजो नोको. हो हे म्हशाल विझवणं अन् जाळत ठेवणं समदं तुह्या हातात आहे. तू महान आत्मा आहेस बेटा, अरे दगडालेबी पाझर फुटते तुह्या वाणीनं, तो मालक कोण लागला? तसं पाह्यलं तं तूच या कामगारांईले त्याचे हक्क मिळवून देवू शकतोस. अन् कोणीतरी पुळं यालेच पाह्यजे होतं. तू पुळं आलास. लय उपकार केलं बेटा तू कामगारावर. मले तं वाटते का प्रत्यक्ष परमेशानंच तुले धरतीवर हे महान कार्य करासाठी पाठवला असन. हे परमेशाचं काम समजून कर बेटा.''

साविनंद काय समजायचं ते समजला. पण त्याला या म्हाताऱ्याचं बोलणं डिवचून गेलं. आपण आपल्यालाही नाही पण या कामगारासाठी लढायचे असं त्याला वाटलं. नव्या दमानं तो कामगारासाठी लढण्यास तयार झाला.

नुकतीच रात्र झाली होती. साविनंदाला बरं वाटायला लागलं होतं. सुटी दोन चार दिवसानंतर होणार होती. विचार करता करता साविनंदाला केव्हा झोप लागली ते कळलंच नाही.

कारखाना उभा पेटवला होता. चारही बाजूस आगीचे धुमारे सुरु होते. त्या कारखान्याकडं आपल्या विस्फारीत नजरेनं

पाहात तो मालक रडत होता. त्याचा तो कारखाना आज कामगारांनी पेटवून दिला होता.

अग्नीशमन गाड्यांची तर रांगच लागली होती. ती आग काही सांभाळत नव्हती. आग कशी आटोक्यात आणावी याची चिंता अग्नीशमनवाल्यांनाही लागली होती. साविनंदा मात्र कडेला बसून ते दृश्य पाहात होता. त्याला मालकाला धडा शिकविल्याचं समाधान वाटत होतं.

आज मात्र मालक साविनंदाजवळ आला होता. त्याला हातपाय जोडत होता. मालक म्हणत होता,

“साविनंदा, मले माफ करा. मले तुमची शक्ती कळली. तुम्ही मले माफ करा. पर अशी धुळधानी करु नोका. माझी करोडोची इस्टेट अशी आगीत जाळू नोका. तुम्ही कामगाराले अडवा. मी समद्या मागण्या पुर्ण कराले तयार आहे.”

साविनंदाला आनंद झाला होता. पण त्याची जेव्हा झोप उघडली. तेव्हा मात्र तो आनंद पाण्यात मिसळून गेला होता. तो उठला, त्यानं इकडंतिकडं पाहिलं तर पलंगावरचे सर्व रुग्ण

झोपून गेले होते. तसा साविनंदही झोपून गेला. जागे राहण्यात राही अर्थ नाही याचा ध्यास घेवून.

रघुनाथ.... रघुनाथच्या डोळयात झोप होती. पण त्याला झोपावेसे वाटत नव्हते. कदाचित आपल्याला झोपलेले पाहून मालक पळून जाईल असं त्याला वाटत होतं. असाच जागली करत दुसरा दिवस उजाडला. आज मात्र सुर्य अजून तेजाने उगवला होता. नवी क्रांती कामगारात आणण्यासाठी. आज याच सुर्यानं कामगारात उत्साह भरला होता. कारण तो जरी आज तापत असला तरी त्याचं ऊन्हं तेवढं जाणवत नव्हतं.

कामगार सकाळीच डबे घेवून कारखान्यात पोहोचले होते. तसं रात्रभर जागली केल्यानं रघुनाथला झोप येत होती. तसं आज त्यानं नेतृत्व भावरावच्या हातात दिलं आणि म्हटलं,

'घाबरायचं नाय. झुकायचं नाय. ' तसा तो घराच्या रस्त्यानं निघाला.

'डॉक्टर साहेब सुट्टी द्या नं. ' साविनंदानं डॉक्टरसाहेबाला म्हटलं.

“मला माझ्या मृत्यूचं भय नाही. पण डॉक्टर साहेब माझ्याविणा ते कामगार अधुरे आहेत. ते आस लावून आहेत माझ्याकडे. मी जर गेलो नाही तर ही कामगार एकता पूर्णतः तुटेल.”

“पण तुम्ही पूर्णतः स्वस्थ नाही हे लक्षात घ्या.”

“माझ्या स्वस्थतेची काळजी मलाच करु द्या. वाटल्यास औषधी द्या भरपूर. मी त्या धरणेस्थळीच आपला उपचार करेल.”

“अहो पण तुमच्या सुटीचा दिवस अद्याप उजळला नाही नं. तुमच्या मनातील आंतरीक तळमळ मला कळते. पण.....”

“पण काय डॉक्टर साहेब. मला सुटी द्या एवढीच विनंती आहे.”

“बरं ठीक आहे. तुम्हाला जसं करायचं तसं करा. पण तुम्हाला तसं लिहून द्यावं लागेल की तुम्ही स्वतःच्या जबाबदारीवर जात आहे.”

“ठीक आहे डॉक्टर साहेब. मी लिहून द्यायला तयार आहे.”

“ठीक आहे तर. आज मी सुटी देणार. पण जास्त दगदग करु नका. प्रकृतीला जपा.”

“ठीक आहे तर.”

डॉक्टर साहेब निघून गेले. थोड्याच वेळात आले. त्यांनी साविनंदकडून जबाबदारी अर्ज लिहून घेतला व सुटीची फाईल बनवायला सुरुवात केली.

सुटीची फाईल बनली. तसा साविनंद त्या दवाखान्यातून मोकळा होवून कामगारांची लढाई लढायला सज्ज झाला.

शहराचा तो रस्ता. गाडी सुसाट वेगानं चालत होती. गाडी घराकडं न घेता कारखान्यात न्या असं साविनंदानं म्हटलं. जसा कारखाना आला. तसा साविनंद जड पावलानं गाडीतून बाहेर पडला. तसं त्याला हायसं वाटलं.

मुख्य रस्त्यापासून कारखाना थोडा दूरच. कच्चा रस्ता. साविनंद इथंच उतरला. कारण तिथं पायी किंवा स्वतःच्या सायकलशिवाय जाता येत नव्हते. गाडी काही साविनंदची नव्हती की त्याला कारखान्यात सोडून देईल. साविनंद याच

वाटेनं चालू लागला. ज्या वाटेवरुन दोन दिवसापूर्वीच जखमाभरली कामगारांची शरीरं इस्पितळात गेली होती. मात्र दररोजची कामगारांची वर्दळ आज दिसत नव्हती. कारखाना एका बैरागी पुतळ्यासारखी स्तब्ध उभी होती.

सावinंदला आनंद झाला. जेव्हा आपल्याला न्याय मिळावा. यासाठी तिष्ठत असलेले कामगार जेव्हा साविनंदनं पाहिले. त्या कामगारांनी सावली मिळायला हवी व आराम करता यावा यासाठी छोटासा मंडप कारखान्याबाहेर तयार केला होता. त्या मंडपात एक फलक होता. त्या फलकावर लिहिलं होतं. साखळी धरणे आंदोलन. कारखान्यातील गेटला कुलूपच होता. तोही कुलूप कामगारांचाच होता. बाजूला पोलिस उभे होते. कामगारांच्या हाती काही वर्तमानपत्र होते. जे वर्तमानपत्र काहीजण वाचत बसले होते. त्या वर्तमानपत्रात या कारखान्यातील हंगाम्याची बातमी छापून आली होती. दोनतीन दिवस पत्रकार व मिडीयावाल्यांनी येवून कामगारांच्या मुलाखती घेतल्या होत्या व ते वृत्त छापले होते. साविनंदानं ते सारं पाहिलं त्याला हायसं वाटलं. तशी कोणाची तरी नजर साविनंदावर गेली व त्यानं सांगितलं,

“साविनंदा काका आलाय.”

सर्वांना आनंद झाला. त्याचबरोबर रघुनाथच्या आनंदाला पारावार उरला नाही. साविनंदशिवाय त्याला अधूरे वाटत होते. तशा त्यांनी घोषणा दिल्या. 'कामगार युनियन जिंदाबाद मालकशाही मुर्दाबाद'

तसा साविनंदला जोश आला. तो मंडपात आला. बसला. त्याला एका कामगारानं पाणी दिलं. तसा त्यानं पाणी घेतलं व कामगारांना म्हणाला,

“मित्रांनो मला आनंद झाला की आपण हा लढा मी दवाखान्यात गेल्यावरही सुरुच ठेवला. तुम्ही सगळेच महान आहात नव्हे तर तुम्हीच स्वतःला साविनंदा, गेनबा अन् दामोधर समजून लढा. तुम्ही सगळेच नेते आहात. कामगार नेते. जेव्हापर्यंत आपल्याला न्याय मिळणार नाही. तेव्हापर्यंत आपण लढत राहायचं. हे तरीही नाही ऐकले तर यांना आपल्याला संपवूनही टाकावं लागेल गेनबासारखं. पण सध्यातरी कायद्या विरोधात जावू नका. सनदशीर मार्गानं लढा. विजय आपलाच आहे.”

सावनिंद बोलत होता. त्याच्या शब्दात धार होती. त्याचा शब्द न शब्द महत्वाचा होता. तसे कामगार म्हणाले,

“सावनिंदा तू खरा कामगारांचा खरा नेता. कारण बाकी असते तर आपल्या जखमेवरचे घाव पाहून घरी बसले असते. पण तू नाही बसला. तू सर्वतोपरी उपचार सोडून आमच्याकड आलास. मगाशीच आम्ही पाहिलं की तुला धड चालताही येत नव्हतं. आम्हाला तुझ्या वेदना माहित आहेत. आम्ही तुम्हाला असं एकटं सोडणार नाही. लढत राहू सामुहीकपणे. कदाचित उद्याचा सुर्य आपल्यासाठी यशस्वीता घेवून येईल.”

“तर मग ठीक आहे. आपला विजय निश्चीत आहे. आता हा मालक या कारखान्यात केव्हापर्यंत राहाते तेच पाहू.”

साविनंदानं म्हटलं. कारण साविंनंदाला माहित झालं होतं मालक कारखान्यातच आहे.

पोलिसांचा कारखान्यासमोर जंगी पहारा. ते आदेशाचे गुलाम होते. ते कामगारांच्या वेदना समजू शकत नव्हते. ते स्वतःच मोठे अधिकारी असल्यासारखे वाटत होते.

साविनंदानं सर्व कामगारांना सांगितलं,

'आपण हे असं केव्हापर्यंत सहन करायचं. त्यापेक्षा आज हा कारखानाच पेटवून टाकायचा. पण त्यात आपल्याला अटक होवू शकते. पण केव्हापर्यंत ठेवतील अटकेत. पण तुम्ही तयार आहात का? पण आपण एक दिवस वाट पाहू. कारण मला थोडी विश्रांतीची गरज आहे."

कामगारांनी दुजोरा दिला. तसा एक दिवस गेला. आज साविनंदाला कालच्यापेक्षा बरं वाटत होतं. तसा तो उठला व कामगारांना म्हणाला,

"चला आता. आपलं ध्येय ठरलेलं आहे. आज आपण कारखाना जाळायचाच."

सर्वांनी दुजोरा दिला. तसे कामगार साविनंदपाठोपाठ चालायला लागले. त्यांच्यासोबत पोलिसही.

कामगारांनी गेटचं कुलूप उघडलं ते आत शिरले. पोलिस त्यांना अडवीत होते. पण कोणीही अडला नाही. त्या पोलिसांनाच धक्के देत देत ते पुढे जात होते. तसे ते त्या मालकाच्या केबीनपर्यंत आले. कुणीतरी काचेच्या आत निरखून पाहिलं. मालक बसलेलाच होता.

सविनंद केबीनसमोर घोषणा देत उभा होता. त्याचबरोबर ते कामगारही घोषणा देत होते. तसा सविनंद कामगारांना म्हणाला,

“आपण आत आलो आहोत. तीनचार दिवसापासून या पोलिसांनी झोपच काढलेली दिसते. तेव्हा आता तुम्हाला जसं करायचं तसं करा. तुम्ही स्वतंत्र्य आहात. माझ्या आदेशाची वाट पाहू नका.”

तसा रघुनाथ मालकाजवळ जावून म्हणाला,

“मालक साहेब आतं तुम्हाले वाचवाले कोणी येणार नाय. तुम्हाले आतं शेवटचं सांगतो का आमच्या मागण्या मान्य करा. नाहीतं याचे परीणाम वाईट होतीन म्हणून समजा. आतं तं तुमच्या मदतीले कोणीच धावून येणार नाय. तुम्ही विनाकारण पोलिसाले बोलावलं. हा आपला निजी मामला होता. पण तुम्ही आयकल्या नाही. "

रघुनाथनं मालकाची तशी कॉलर पकडली. तशी इतर कामगारानं पोलिसांची. हाणामारी सुरु झाली. पोलिसांच्या लाठ्या आज काही चालत नव्हत्या. तसा एका पोलिसानं

बंधूकीचा बार झडवला व सगळे भानावर आले. पण ते भानावर येईपर्यंत ती बंधूकही कामगारानं हातात घेतली होती. वायरलेसही ताब्यात घेतला होता. हे सगळं गुप्त स्वरुपाची योजना करुन साविनंदनं घडवून आणलं होतं.

आता मात्र मालकाची बोबडी वळली होती. कामगार आता आपल्याला सोडत नाही हे आता मालकाला वाटून गेलं होतं. आज पहिल्यांदाच पोलिसांवर कामगार हावी झाले होते. तसा साविनंदला विचार आला. जर आपण मालकाला ठार केलं तर दुसरा मालक येणार. तोही मग बदल्याच्या भावनेतून अत्याचार करणार. तेही बरोबर नाही होणार. असा विचार करुन तो म्हणाला,

"मित्रांनो, कायद्याचे बाहेर जावू नका. कारण आपण आज जर मालकाला मारलं तर उद्या दुसरा मालक तयार होईल. तोही आपल्याशी बदल्याच्या भावनेने वागेल."

"मग साविनंदा, गेनबाच्या मृत्यूचं काय?"

"आता मेलेला जीव का येणार आहे परत. म्हणून काय जीवाच्या बदली जीव घ्यायचा का? गेनबा मेला. स्वर्गात गेला.

तो अमर झाला. आपण कधीही म्हणू नये. मानूही नये. तो आपल्यातच आहे असं समजावं.''

''मग त्याच्या मुलेबाळे व पत्नीचे काय?''

''त्यांची सोय आपण करु. पण माफ करा यांना.''

''साविनंदा, हे पटलं नाय. असं जर कराचं होतं तं दोनतीन दिवस आपण काय झकमाराले संप केला. आतं आमची रोजीरोटीबी गेली. ते कोण देईन. या मालकाईनं गेनबासारखे कित्येक लोकाईचे बळी घ्याचे अन् आपण त्याईले माफच करत राहाचं. मले सांग सांविनंदा हे गोष्ट मले पटली नाय. साविनंदा अशानं तं या मालकाईची हिंमत वाढन अन् काहीच नाय आपलं तेढं होत म्हणून हे कामगार पुन्हा या कारखान्यात येणाऱ्या लोकांवर अत्याचार करतीन. गेनबासारखे बळी घेतीन.''

''नाही घेणार.''

''का नाय घेणार. माहित आहे आपण या मालकाचेबी हाल त्या गेनबासारखेच करु.''

''साविनंद काका आपण कारखाना जाळायचाच.''

“अरे पण तो जाळला तं आपली रोजीरोटीही गायब होईन.”

“पण यानं गेनबाच्या मृत्यूले न्याय मिळन का?”

“त्यासाठी या मालकाचा जीव घ्यायचा का?”

“हो, असा जर जीव घेतला तं सर्व चांगलंच होईन.”

“म्हणून काय आपल्या स्वार्थासाठी त्या मालकाचा बळी घ्यायचा काय?”

“साविनंद काका, माझ्या म्हणण्याचा उद्देश तसा नाय.”

“मग काय कायदा मोडायचा म्हणता तुम्ही. स्वयंपूर्ण स्वयंभू लोकशाहीचे तुकडे करायचे!"

ते धीराचे शब्द होते. पण ते शब्द कामगाराला पटत नव्हते.

“साविनंदकाका, हे लोकशाही म्हणता, ते ठीक आहे. तुम्ही लय शिकला. पण मले सांगा, याले लोकशाही तरी म्हणता येईन का? हे हुकूमशाहीच आहे. तवा या हुकूमशाही राज्याच जगायचं असन तं हुकूमशहाच बना लागन का नाय.”

“मग या कामगार संघटनेची धुरा तुम्हीच स्विकारा अन् कामगारांना न्याय मिळवून द्या.”

सगळे चिडीचूप होते. बाहेर कामगारांना पांगवण्यासाठी सशस्त्र पोलिस दल तैनात झालं होतं.

पोलिसांना कामगारांनी मारल्यानं व बंधूक हिसकल्यानं पोलिस संतप्त झाले होते. तेवढ्यात अश्रूधुराचा वापर केला गेला व साविनंदाच्या म्हटल्याप्रमाणे त्या कामगारांनी मालकाला सोडलं व कारखानाही जाळण्याचा प्रस्ताव मागे घेतला. त्यांना नामी संधी चालून आली होती तरीही.... त्यांना माहित होतं की आता आपल्याला या कारखान्यात पुन्हा नोकरी नाही तरीही.... त्यांना माहित होतं की आपल्याला न्याय मिळणार नाही तरीही.... अन् त्यांना माहित होतं की गेनबाच्याही मृत्यूला न्याय मिळणार नाही तरीही..... ते माघार घ्यायला तयार झाले होते. तसा तो मोठा इनस्पेक्टर म्हणाला,

“मित्रांनो, आता जा तुम्ही. मी सगळ्या तुमच्या मागण्या मान्य करायला लावतो. माझ्यावर विश्वास ठेवा.”

साविनंद व पोलिस इनस्पेक्टरच्या बोलण्यावर विश्वास ठेवून कामगारांनी माघार घेतली. एक आशा बाळगून तर त्यांची दुसरी आशा मात्र मनात मावळली होती.

पोलिसानं आश्वासीत केल्याप्रमाणे कामगारांनी एका आवेदनावर त्या पोलिस इनस्पेक्टरची स्वाक्षरी घेतली. त्यांनी सही करताच आनंदाच्या छटा कामगारांच्या चेहऱ्यावर उमटल्या. ते आनंदात निघणार एवढ्यात मालक म्हणाला,

"उद्याले सर्वजण कामावर हजर व्हा."

कामगारांनी सुटकेचा श्वास सोडला. त्यांना हायसं वाटलं. विजय मिळविला युद्धप्रसंगी असं वाटत होतं. जे ते नवल करु लागले होते. मालक एकदम तयार झालाच कसा? कामगारांच्या बायकाही विचारु लागल्या होत्या. कदाचित यात कुटील डाव तर नाही असं प्रत्येकाला वाटत होतं.

साविनंद खुश होता. त्याला वाटत होतं की मालकानं गेनबाच्या मृत्यूला घाबरुन या मागण्या मान्य केल्या. पण तसं काहीही नव्हतं.

सायंकाळ झाली होती. साविनंद फिरायला गेला होता. तशी सायंकाळी फिरायची त्याची सवयच होती. आज मात्र निश्चिंत मनानं फिरत होता. हिरव्यागार गवतावर फिरतांना मन मात्र प्रफुल्लीत होत होतं. तशीच त्या गवताची थंडाई मस्तकाला

जावून भिडली होती. जुन्या गोष्टीची आठवण करता करता किती रात्र झाली हे त्याचे स्वतःच त्याला समजले नाही. तसे बागेतील सर्वजण घरी गेले होते. तसा साविनंदही आपल्या घरी आला. साविनंदला जशी घरची आठवण आली, तशी त्या रुग्णालयात भरती झालेल्या कामगारांचीही आठवण झाली. त्यांना भेटून हा आनंद सांगायचा होता. पण हर्षोल्लासात तो ती आठवण विसरुन गेला होता. काहीही होवो, मात्र उद्या सकाळी वेळात वेळ काढून आपण रुग्णालयात जावून हा आनंद सांगू असं त्याच्या मनाला वाटत होतं.

"कोठं गेले होते एवढ्या रात्रीपर्यंत." साविनंदची पत्नी त्याला म्हणाली.

"कुठं नाही गं. बागेत फिरायला गेलो होतो."

"आता जास्त फिरणं बरोबर नाय. तुम्ही कामगार नेते बनला आहात. तवा एखादे दिवशी तो मालक गुंडाकरवी तुम्हाले मारुन टाकन."

"कसा मारणार तो?"

"बदला."

“कशाचा?”

“नुकसान केल्याचा. नुकसान केल्याचा बदला.”

“कोणतं नुकसान?”

“मालकाच्या खिशाले तुमच्यामुळं चुना लागला. कामगारांचा पगार वाढला नं. पण जो पैसा मालकशाहीच्या पोटात जात होता, तो कामगाराईले मिळन. मंग चुना नाय लागला तं का?”

“हं तुझंही म्हणणं खरंच.” तो म्हणाला.

ती अष्टमीची रात्र होती. बाहेर चांगण्यांचा लुकलुकतेपणा मनाला मोहून टाकत होता. ढगंही अगदी डौलात नाचत आहेत की काय असे वाटत होते. ढगाच्या चालण्यानं चंद्रच जणू चालत आहे की काय असे वाटत होते. तशी क्षणात त्याला ती महाविद्यालयीन गोष्ट आठवली.

साविनंद जेव्हा लहान होता. तेव्हा कोणीतरी प्राध्यापक त्याच्या कॉलेजात भाषण द्यायला आला होता. याच दरम्यान त्याचं एका मुलीवर प्रेम निर्माण झालं होतं. त्याचं तिच्यावर प्रेम होतं खरं. पण तिचं त्याचेवर खरंच प्रेम आहे का हे मात्र त्याला माहित नव्हतं. तसा त्या प्राध्यापकानं प्रश्न केला की तारे केव्हा दिसतात?

सर्वजण विचारात पडले होते बऱ्याच मुलांनी वेगवेगळी उत्तरं दिली. पण तिच्या मनात वेगळंच उत्तर होतं. ती म्हणाली,

"प्रेमभंग झाल्यावर."

कदाचित तिला वाटत होतं की साविनंदानं तिच्याशी बोलावं. पण आज एकवर्षही झाला तरी साविनंद तिच्याशी बोलला नव्हता. तो घाबरत होता की ती काही म्हणेल का? कधी वाटत होतं की त्यानं जर तसं केलं आणि हो त्या प्राध्यापकाला माहित झालंच तर प्राध्यापक त्याला कॉलेजातून काढून टाकतील. पण तिच्या त्या उत्तरानं आज त्याच्या मनात प्रकाश पडला होता. तिनं त्याच्याकडं एक कटाक्ष टाकला. त्याच्या भावभावना टिपण्याचा प्रयत्न केला. ते प्राध्यापक, ते

विद्यार्थी, ते मित्र आपल्याला काही म्हणतील असं तिला वाटलं होतं.

महाविद्यालयीन ते शेवटचं वर्ष होतं. तरीही त्या दोघांचंही एकतर्फी प्रेम. प्रेम तिच्याही मनात होतं. प्रेम त्याच्याही मनात होतं. पण प्रेम जाहिर करणं महत्वाचं होतं ना. पण ते जाहिर केलं नाही ही खंत अजूनही त्याला आठवत होती. आज ती कुठे असेल? कशी असेल याचा त्याला थांगपत्ता नव्हता. म्हातारपण आलं होतं तरी.....

तो दिवास्वप्न पाहात होता. एवढ्यात एक ढग आला. त्यानं त्या दिवास्वप्नावर फुंकर घालून पाहिली. त्या चंद्राला आपल्या कुशीत संपवून टाकलं. तसं मन बधीर झालं. ती चंद्राची अवस्था पाहून. तसा त्याला त्याच्या पत्नीचा आवाज आला,

"अहो काय करता?"

"चंद्र पाहत आहे."

"कधी पाहिला नाही का चंद्र?"

"पाहायला कधी उसंत तरी मिळाली का जीवनात."

“आज का बरं पाहताय.”

“आज डोक्यावरचं टेंन्शन उतरल्यासारखं वाटतंय.”

“पण काय, झोपायचे नाही का?”

“झोपतो ना. किती वाजलेत?”

“बारा वाजले बारा.”

“बारा वाजले. नेहमीचेच वाजले तर.... ठीक आहे. झोपतो.... उद्या लवकर उठलीस तर उठवशील.”

“कशाला?”

“अगं उद्याला त्या दवाखान्यातील भरती कामगारांना पाहायला जायचं आहे आणि दुपारी कामावर.”

“ठीक आहे.”ती म्हणाली.

नकळत पावले अंथरुणाकडं वळली. तो अंथरुणावर आडवा झाला. क्षणार्धात तो झोपायच्या आहारी गेला.

ते कामगार साविनंदाला शिव्या हासडत होते. एकमेकांना मारतही होते. त्याच्याचमुळं आपल्याला कारखान्यातून काढून

टाकलं असा युक्तीवाद करीत होते. मात्र आज कंपनी मालक खुश होता. मोर्चा करायचा म्हटल्यावर मोर्च्यात यायला कोणीही तयार नव्हतं. एवढ्यात कोणीतरी एकानं एक भारदस्त दगड उचलला आणि साविनंदकडं भिरकावला. त्यातच तो गंभीर जखमी झाला. त्याला भरती करण्यात आले.

रुग्णालयातील घटिका ओसरत होती. तो अखेरचे दिवस मोजत होता. अखेर तो मरण पावला.

"नाही$$" तो मोठ्यानं म्हणाला. तसा दचकूनही उठला.

"काय झालं?" त्याची पत्नी म्हणाली.

"अगं मी विचित्र स्वप्न पाहिलं."

"कोणतं?"

"जावू दे. आपली स्वप्न कुणाला सांगायची नसतात."

"सांगा तर खरं. डोक्यावरील ताण कमी होईन."

"नाही जावू दे. विचित्र स्वप्न होतं. घाबरशील तू."

"नाय घाबरत. सांगा."

तसा तो आपल्या घरी पडलेलं स्वप्न सांगू लागला. तसं स्वप्न सांगून झाल्यावर तो म्हणाला,

"का गं. असं स्वप्न सत्य होईल का? मला तर या स्वप्नावरुन वाटते, मालकानं आश्वासन दिलं खरं, पण काहीतरी गडबड नक्कीच आहे. काल माझे कामगार मित्र ही तसे म्हणत होते. सावध करीत होते. पण मला इशारा समजलाच नाही."

"अं स्वप्न होय ते. तुम्हीच म्हण का असल्या स्वप्नात काही अर्थ नसतो म्हणून. मग तुम्ही एवढे शिकून या स्वप्नावर विश्वास ठेवता. झोपा आता. ती त्याला धीर देत म्हणाली.

तसा तो परत झोपला. पण आता त्याला झोप येत नव्हती. तो सारखी कुश बदलवीत होता.

सकाळ झाली होती. पक्ष्याची किलबिल कानी पडली. तसा तो उठला. आज प्रातःविधीही लवकरच आटोपवला. पत्नी अजूनही झोपली होती. तिला उठवणे तो गरजेचे समजला नाही. तशी पुर्ण तयारी झाल्यावर त्यानं पत्नीला उठवलं आणि सांगितलं की तो रुग्णालयात जात आहे.

पत्नीला सांगताच त्यानं सायकल काढली व तो दवाखान्याच्या दिशेनं निघाला.

रुग्णालयात सायकल बाजूला ठेवून तो तिथे निघाला, जिथे ते कामगार भरती होते. तसा तो मित्रांजवळंही जावून पोहोचला. त्याला समोर दामोधर भेटला. त्यास तो म्हणाला,

"दामोधर कशी आहे तब्येत?"

"बरी आहे एकदम ठणठणीत."

"अन् बाकीचे?"

"बाकीचेबी ठणठणीत आहेत. लवकरच आम्हाले सुटी होईन. पण एक सांग, कारखान्यात काय सुरु आहे?"

"आपला विजय झाला. फक्त तो साजरा करायचा बाकी आहे. तुम्ही या सुट्टी झाल्यावर. मग साजरा करु आपण सगळा विजय."

"म्हणजे मागण्या पुर्ण झाल्या तर."

"हो अन् सगळ्या मागण्या पुर्ण झाल्या."

"अरे व्वा. हे तं कमालच झाली तर."

“आज कामालाही बोलावलं मालकानं.”

“हो, जा. आज बरं वाटतंय. बोनस आन् पगारवाढ बी होतं न मागणीत.”

“हो. तेही होतं.”

“आज दोन तीन दिवसानंतर पहिलाच दिवस.”

“हो ना. आता निघतो.”

“बरं आम्हाले सांगशील का का घडते तं.”

“होय. आता निघू.”

“बरं.”

बराच वेळ गोष्टी केल्यानंतर तो निघाला. तसा तो काही वेळानं घरी पोहोचला. दहा वाजले होते.

त्यानं भराभरा घास पोटात कोंबले. मधुवंतीनं डबा तयार केला व डबा घेवून तो कारखान्याकडं निघाला.

रघुनाथचं घर आलं होतं. तसा त्यानं आवाज दिला.

“रघुनाथा$ रघुनाथा$$"

रघुनाथ आवाजानं बाहेर आला. त्यानंही तयारी केली होती. तसे ते दोघेही जण कारखान्याकडं निघाले.

तसा कारखाना आला. पण फारशी वर्दळ दिसत नव्हती. तसे ते जवळ जावूनही कारखाना सुरु असल्याचा आवाज येत नव्हता. तसे ते दरवाज्याच्या जवळ पोहोचले तर त्या कारखान्यात गेटला कुलूप लागला होता. कामगारांची गर्दी होती. चौकीदार मात्र अजूनही होते.

“रघुनाथा, काय झालं?”

“विचारतो.”

रघुनाथनं विचारताच चौरीदार म्हणाला,

“आता घरला जावा. साहेबानं कारखाना बंद करायचा निर्णय घेतला.”

रघुनाथ साविनंदला चौकीदारानं म्हटलेली गोष्ट सांगू लागला. तसा साविनंद पुढे गेला. चौकीदारास म्हणाला,

“अन् ते सह्याचं पत्र.”

“ते मले माहित नाय. पर मालकानं कारखान्याचा गेट उघडायचा नाही हे सांगतलं आन् आज पासून कारखाना बंद राहिन हेबी सांगतलं.”

झाले सगळे कामगार चूर चूर झाले होते. तसा साविनंदा चौकीदारास म्हणाला,

“आम्ही कोर्टात जावं असं मालक म्हणते का?”

“ते मले माहित नाय. तुम्हाले जे कराचं ते करा. मले जसं सांगतलं तेच सांगतो. बाकी जे काय कराचं ते तुमची इच्छा.”

“तर मग ठीक आहे. तुझ्या मालकाला सांगून द्यायचं की कामगार पुढचे आठ दिवस वाट बघणार आणि मग कोर्टात जाणार आणि व्याजासह रक्कम वसूल करणार.”

तसा साविनंद लोकांकडं वळला व म्हणाला,

“मित्रांनो, हा आपल्यासोबत धोका झालाय. आता आपल्याला न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याशिवाय पर्याय नाही. कालच मालकानं आवेदनावर सह्या केल्या होत्या म्हणत होता 'सगळ्या मागण्या मान्य आहेत' तुमचंच बरोबर होतं. आपण या मालकाला मारुनच टाकायचं होतं आणि

कारखानाही जाळून टाकायचा होता. पण तरीही तुम्ही घाबरु नका. या कारखान्यानं आपलं काही बिघडणार नाही आपण दुसरे धंदे खोलू. कामावर जावू. मजदूरीची कामं करु. इथंही बसून राहात नव्हतो. कोणी काही बसवून ठेवत नाही. तसंच बाहेरंही बसून राहणार नाही. एकप्रकारे या मालकानं चांगलंच केलं कारण घरी जायला बाराच वाजत होते आणि सकाळी यायला लगबगीने यावं लागायचं. कसा वेळ व्हायचा ते कळायचं नाही. आता एक करा. कुणी चहाटपरी टाका, कुणी पानठेला टाका, कुणी प्रेसचं दुकान टाका, कुणी चप्पलचा धंदा टाका. हे झालं माझं मत. आता मात्र तुम्ही तुमचं मत सांगा. पण एक लक्षात घ्या. आपल्याला कोर्टात गेल्याशिवाय पर्याय नाही.''

''साविनंद काका, आम्ही सगळे तुमच्या मताशी सहमत आहोत. आम्ही काहीही करु, कसेही पोट भरु. पण या कारखान्यावर अवलंबून राहणार नाही. मात्र एक की या मालकाला धडा शिकवावंच लागेल. ज्यानं आपल्यासोबत धोका केलाय. तुम्ही पुढे व्हा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.''

“मग ठीक आहे. आजपासून पोटाची खळगी भरण्यासाठी तयारी करा. खटला टाकण्यासाठी व चालविण्यासाठी वर्गणी गोळा करा. काही मोजके लोक माझ्यासोबत जिल्ह्यात चाला. आपण खटला दाखल करु.”

साविनंदानं घरी जा म्हटलं खरं. पण घरी कोणीच गेलं नाही. सगळे जिल्ह्याच्या न्यायालयात गेले. कारण सगळयांच्या पोटाचा प्रश्न होता.

न्यायालय ते. न्यायालयात साविनंद सोबत शिकलेला एक वकील होता. त्याला वाटत होतं की या खटल्यात आपल्यासोबत शिकलेलाच गृहस्थ मदत करेल. दुसरा जर केला आणि तो ओळखीचा नसला तर मालक त्याला पैसे देवून ती केस दाबून टाकेल म्हणून त्यानं ती केस मित्राला देण्याचं ठरवलं. एवढ्यात त्याला त्याचा वकील मित्र दिसला. तसा त्यानं आवाज दिला,

“कैलास ए कैलास.”

वकीलानं मागं वळून पाहिलं. तसा त्याच्या माग साविनंद उभा दिसला. त्यानं त्याला विचारलं की तो इकडं कसा? त्यावर तो म्हणाला,

"या कामगारांची केस घेवून आलोय. मला खटला टाकायचाय मालकावर."

"आपण निवांत बसू. मग बोलू."

तसे ते चहाटपरीवर गेले. तिथं साविनंदानं आपली पाश्वभूमी समजावून सांगितली. तसा वकील म्हणाला,

"बरं साविनंदा, तू जर या कामगारांसाठी लढा द्यायला तयार आहे तर मीही ही केस निःशुल्क लढून तुम्हाला न्याय मिळवून देईल. त्यासाठी जीवाचे रानही करील. फक्त कागदपत्रासाठी तेवढे पैसे द्यावे लागतील."

वकीलाचा शब्द. तशी त्यानं साविनंदाच्या म्हणण्यानुसार खटल्याची फाईल तयार केली व म्हणाली,

"आता, तुम्हाला यायची गरज नाही. मी माझ्या पद्धतीनं ही केस लढवतो आणि जिंकण्याचा प्रयत्न करतो."

सावनंद आणि त्याच्या कामगार मित्रांनी वकीलावर विश्वास ठेवला. तसे निश्चींत मनानं ते घरी परतले. आता जणू स्वावलंबी जीवन जगायचं असा जणू निर्धार करुन ते पुढील नव्या जीवनाची सुरुवात करण्यासाठी अग्रेसर झाले. थोड्याच दिवसात त्यांनी त्या तालुक्यातील मिळेल त्या जागेवर दुकानं थाटण्यास सुरुवात केली. स्वावलंबी बनण्यासाठी.

कारखाना बंद होवून एक माह उलटला होता. कोकीळेची कुहूकूहू ऐकायला येत होती. वसंत ऋतूचं आगमन झालं होतं. याच वसंताबरोबर कामगाराच्या नव्या जीवनाला सुरुवातही झाली. आज ते कामगार सुखी होते. त्या कारखान्यातील मिळकतीपेक्षा आज धंद्यापासून मिळणारी मिळकत त्यांना जास्त वाटत होती. तसाच हा धंदा केव्हाही बंद आणि केव्हाही सुरु करता येत होता. त्यांचं दुकान चांगलं चालत होतं. मात्र एक चिंता होती ती म्हणजे हे दुकान पुढं चालेल की नाही. यामुळंच आताही ती कारखान्यातील नोकरी महत्वाची वाटत होती.

"हो म्हणून काय तुझ्या निर्णय लावल्यावर कारखाना खुलन का? तो मालक कोर्टात सांगन. मले परवडत नाय कारखाना

चालवणं. म्हणून मी बंद केला. अरे मालमत्ता त्याची. तो केव्हाबी चालू करु शकते, बंद बी.''

''बरं जावू द्या. नाही लढायचं तर नका लढू. पण उलझवू नका प्रकरण. मी तर पाचशे रुपये भरायलाही तयार होतो. पण म्हटलं विचारुन पाहावं कामगार काय म्हणतात ते. पण तुमची काही इच्छा दिसत नाही. फायदा काय माझा एकट्याचा होणार आहे? आता वाटते की गेनबा फुकटच मेला. गेनबाचं मरण व्यर्थ गेलं. पण तरीही सांगतो, मी गेनबाचं मरण व्यर्थ जावू देणार नाही. एकटा लढेल ही केस. गेनबाला न्याय मिळवून देईल एकटा. तुम्हीच पाहा तुमचं. उद्या तुमची जर मुलं अशाच प्रकारच्या दुसऱ्या कारखान्यात लागली अन् असेच अत्याचार झाले, तर तुम्हाला विचार येईल. मला नाही. मला काय एकच मुलगा. तोही चांगला शिकत आहे. अन् मी विचार केला की त्याला कारखान्यात आणणार नाही. येवू देणारही नाही. विचार केला होता की सगळ्या कारखान्यासाठी एकच नियम असावा? त्यासाठीच आपण लढणार होतो खटला. पण नाही. आता फक्त गेनबाच्याच मृत्यूला न्याय मिळवून देण्यासाठी लढेल. कामगारासाठी लढणे नाही.''

तसा एकजण म्हणाला,

“साविनंद काका, मांगा. जेवढे पैसे मागायचे तेवढे मागा. मी देतो.”

“नाही बाबा. तुही राहू दे आपले पैसे आपल्याचजवळ. उद्या तू देखील म्हणशील, 'काका माझ्या पैशाचं काय झालं' तर मी काय उत्तर देईल.”

सविनंद खजिल झाला होता. त्याला त्या कामगारांनी दुःखी केलं होतं. जे मोठमोठ्या डिंगा मारत होते, ते मात्र शेळीसारखे भेकड बनले होते. त्यांचं काही ध्येय नव्हतं. सर्व ध्येय त्यांनी मारुन टाकलं होतं.

कामगारासाठी लढण्यास तयार असलेला साविनंद..... काही कामगारांनी देवूही केले त्यानंतर पैसे. पण खजिल झालेल्या साविनंदानं ते पैसै घेतले नाहीत. पुन्हा तो त्या वकील मित्राला भेटला व स्वतःच्या खिशातील पैसे देवून नोटीस पाठवायला लावला. पण आज मात्र त्याला खरा माणूस अन् माणुसकी ओळखायला आली होती. ती माणुसकी ओळखायला वेळ लागला नव्हता.

वकील मित्रानं कामगारासमक्ष म्हटलं होतं की मी तुमची केस फुकट लढतो. पण कागदपत्राला तेवढे पैसे द्यावे लागतील. पण त्यानं भरपूर पैसे हळूहळू उकळले होते. हा नोटीस पाठवायचा आहे. पोलिस पाठवायचा आहे. अशी वेगवेगळी कारणं सांगून तो पैसे लुटत होता. नव्हे तर मित्र असूनही पक्का वैरी असल्याचा भाष होत होता. शिवाय साविनंदाला कधीकधी तारखेवरही कामधंदे सोडून हजर व्हावेत लागायचे. त्यात वेळ आणि पैसाही जायचा.

साविनंद मनोमन दुःखी व्हायचा. पण त्याच्यासमोर तो गेनबा यायचा. त्याची ती वाणी यायची. जो कामगारांसाठी लढता लढता मरण पावला. तो काही साविनंदचा नातेवाईक नव्हता. पण त्याला त्याचेबाबत आत्मीयता वाटत होती. याच आत्मीयतेपोटी तो लढत होता. त्याला खंत वाटत असली तरीही..... तसा तो एक दिवस रघुनाथकडे गेला. त्याला पाचशे रुपयाची खंत सांगितली. तसा तो म्हणाला,

"मित्रा, मी तरी यात काय बोलू. मी पह्यलच सांगतलं होतं का कामगार साथ देणार नाय. तवा तुझा हा लढावूपणा सोडून दे. तू नाय आयकला."

“अरे पण मला आता वाईट वाटतं. कारण त्या गोष्टी मला आता समजल्या ना.”

“तुझं बराबर आहे. पण आता मी तरी का करु शकतो!सांग का करु मी? हं एक सांगू. सल्लाच समज.”

“सांग. तुझा सल्लाही मोलाचाच अशावेळी.”

“सोडून दे नं हे केस. हं तेच सांगतो. सोडून दे हे केस.”

“आता अशावेळी. मधातच सोडून देवू?”

“हं सोडाच लागन. तू हे केस कोणासाठी लढतेस. जे तुझे नाय. त्याईले कदर तरी आहे का? समजते का? साविनंद कसा लढत असन. थोडा विचार तरी करतेत का ते. सांग बरं. कितीक कामगारानं तुझा विचार केला? किती कामगार तुझ्या बाजूले आहेत यावेळी. सांग बरं.”

“अं, जावू दे यार तू त्या गोष्टी. मले सालं टेन्शन येते ते आठवलं तर. जावू दे त्या गोष्टी. पाहू नंतर काय करायचं ते. बरं तू कसा आहेस?”

“मी बरा आहे. एक दार बंद झालं म्हणून देव काही दुसरं दार बंद करत नाय.”

त्यांचं संभाषण सुरु होतं. तसा बराच वेळ ते संभाषण झालं. बऱ्याच दिवसानं ते भेटले होते. पुर्वी ते दररोज भेटायचे. सोबत सोबत कामाला जायचे. पण आता मात्र भेट होत नव्हती. तसा तो निघाला.

साविनंद आज पूर्णतः म्हातारा झाला होता. त्याचा तो म्हातारपणा जड वाटत होता. तरीही तो केसवर जातच होता. प्रश्न सुटत नव्हता. पण साविनंदला वाटत होतं की हा प्रश्न केव्हातरी सुटेलच. त्यासाठीच तो जात होता.

त्या खटल्यात एक षडयंत्र होतं. वकील मित्र जरी असला तरी तो काही बरोबर नव्हता. तो मालकाला मिळालेला असून मालकाच्या बोलण्यानुसार खटला रेंगाळत होता. जणू कामगारांना त्रास व्हावा व खटल्याचा निकाल लागू नये व कामगारांचं वय होवून ते हतबल व्हावे. असं मालकाला वाटत होतं.

सावनंदला मात्र वेगळंच वाटत होतं. त्याला असं वाटत होतं की एक दिवस मालक येवून आपल्याला माफी मागेल. आपले पाय पकडेल. तसेच आपल्याला हा खटला मागे घेण्याविषयी विनंती करेल. पण तसं काही होत नव्हतं. होण्याची चिन्हंही दिसत नव्हती. पण साविनंदला मात्र तो भ्रम होता.

साविनंदाचं म्हातारपण. तो आता न्यायालयात जरी जात असला तरी वकीलाला पैसे देण्याइतकी ताकद त्याच्यात नव्हती. कामगारबंधू तर अजिबात पैसे देत नसत नव्हे तर त्याची भेटही घेत नव्हते. शिवाय त्यांना आपली कोर्टात केस चालू आहे हेही माहित नव्हतं.

बहुतेक कामगारांची मुलं कर्तबगार झाली होती. काहींची लग्न उरकली होती. काहींच्या सुना चांगल्या निघाल्या होत्या. तर काहींची सुना मात्र बरोबर निघाल्या नव्हत्या. त्या जाब विचारत होत्या.

बहुतेक कामगारांची मुलं ही व्यसनी निघाली होती. मात्र साविनंदाचा एकुलता एक मुलगा. तोही चांगल्या पदावर गेला होता. सुनही चांगली मिळाली होती. याचं फलस्वरुप तो त्या कामगाराच्या खटल्याला श्रेय देत होता.

सावनंदाचं घरात लक्ष नव्हतं. मुलगा डॉक्टर बनला असला तरी तो खुश नव्हता. कामगारांचा आणि खटल्याचाच विचार त्याच्या मनात असायचा.

खटला बोर्डावर आला होता. आता त्या खटल्यात कंपनी मालक आणि दोनचार कामगारांना हजर राहावं लागायचं. ते राहातही होते. पण पैसे मात्र कोणीच देत नव्हता.

कधीकधी 'समज करा समज' कंपनी मालकाचा वकील कामगारांना म्हणत असे. पण कामगारांच्या न्यायाचं काय? शिवाय एवढे दिवस खटला भांडल्याचं काय? त्याचा मुआवजा कोण देणार? कामगारांना प्रश्न पडत असे. पण ते सर्व साविनंदाकडे बोट दाखवत.

दामोधरनं चहाटपरी लावली होती. ती चहाटपरी चांगली चालत असे. त्याला फुरसत मिळत नव्हती. तसा तो कोर्टातही हजर होत नव्हता. पण एक गोष्ट नक्की की त्याला त्या खटल्याबाबत उत्साह होता.

रघुनाथ सुद्धा आता थकला होता. कधीकधी तो खटल्यात पैशाचीही मदत करायचा. कधी सांत्वना द्यायचा. पण

वार्धक्यानं तो एक दिवस मरण पावला. साविनंदाचा पुरता आधार गेला. आता मात्र तो एकाकी झाला होता.

साविनंद कोर्टाच्या पायऱ्या चढत होता. त्याचा मुलगाही त्या खटल्याचा आड येत नव्हता. कधीकधी त्याच्या मुलाला वाटायचं की वडीलांना अडवावं. पण मनात असुनही तो तसं करु शकत नव्हता. कारण त्याला वडीलाची कामगाराप्रती आस्था व तळमळ दिसत होती.

सुरुवातीला दोन दोन महिने तारीख मिळायची. पण आता तर आठ आठ दिवसानं तारीख मिळत होती. त्या तारखेन साविनंद त्रस्त होत होता. पण आज उपाय नव्हता.

साविनंदचे समवयस्क मित्रही आज थकले होते. तेही म्हातारे झाले होते. हळूहळू ते त्याला सोडून जावू लागले होते अर्थात मरु लागले होते. कोणी उलट सल्ले द्यायचे की ही केस त्यानं सोडून द्यावी. तर कोणी 'लगे रहो' म्हणत असत.

आज साविनंद अंथरुणावर आडवा पडला होता. सकाळपासून आज त्याचं कोणत्याच गोष्टीकड लक्ष नव्हतं. सारखा त्याला त्याचा भुतकाळ आठवत होता. त्यानं अर्धी

लिहिलेली पुस्तकही त्याला आठवत होती. पण त्याला ती पुस्तक पुर्ण करता येत नव्हती. कारण खटल्याचा निकाल अजून यायचा बाकी होता.

गेनबाचे कुटूंब कसेबसे सावरले होते. पण आजही त्यांची बरोबर घडी बसली नव्हती. मात्र गेनबाची पत्नी साविनंदाचा मोठा मान करीत होती. त्यानं टाकलेली केस तिला सुखवून जात होती. तिही निर्णयाच्या प्रतिक्षेत होती.

बाकीचे कामगार साविनंदामुळं आज श्रीमंत बनले होते. जर साविनंदानं त्यांचा उत्साह वाढवला नसता तर. त्याच त्या गर्तेत फसून आजही त्यांना आपलं म्हातारपण गरीबीत कापावं लागलं असतं.

अचानक त्याला रघुनाथचा मृत्यू आठवला व जाणवलं की तो पोरका झालाय. कारण कामगारविश्वातील तोच एक जवळचा मित्र होता. तो सल्ले तर द्यायचा. शिवाय मदतही करायचा.

न्यायालयात केस बोर्डावर आल्यानं आता प्रत्येक आठ आठ दिवसानं वेगवेगळया माणसाच्या साक्षी होत. जे त्या

केसशी जुळलेले होते. तारखांवर तारखा पडत होत्या. साविनंद म्हातारा झाला असला तरी रग अजूनही शिल्लक होती. त्याला आजही वाटत होतं की आपण याच कारखान्यातील नाही तर सगळ्या कामगारांचा प्रश्न मिटवू. त्याने प्रयत्न करणं सोडलं नव्हतं. तो आपल्या बाजूच्या निकालाचे स्वप्न वेळोवेळी पाहात असे.

आज कामगार दिवस होता. कामगारांचा निकाल न्यायाधीश महोदयांनी कामगार दिवशीच द्यावा असं निर्धारीत केलं होतं. त्यामुळं हा निकाल कामगार दिवसाची वाट पाहात पाहात मागील सहा महिण्यापासून रेंगाळत होता.

सर्व साक्षी पुरावे तपासले गेले होते. आज निकालाचा दिवस उजाडला. साविनंद आज लवकर झोपेतून उठला. ज्या गोष्टीची तो एवढ्या दिवसापासून वाट पाहात होता, तो दिवस आज आला होता. त्याच्या तपश्चर्येची आज दिशा ठरणार होती. त्याला आज त्याचा संबंध भुतकाळ आठवत होता. कशी त्यानं नोकरी केली. कसा खटला दाखल केला. कामगारांनी खटल्याची कशी गोची केली. सारं आठवत होतं. खटला आपल्याच बाजुनं लागेल असंही वाटत होतं. कारण साक्षीपुरावे

त्याच्याच बाजूने पडले होते. हे त्यानं प्रत्यक्ष ऐकले होते. पाहिलेही होते.

त्यानं लवकर अंघोळ केली. भराभर तयारी केली. भराभर जेवनही केलं आणि तो लवकरच आज न्यायालयात पोहोचला. आज तो निकाल ऐकायला त्याचा मुलगाही जातीने हजर होता.

साविनंद जेवत होता. पोळीचा एक एक घास पोटात कोंबत होता. तशी सुन म्हणाली,

"बाबूजी एक विचारु का?"

"विचार काय विचारते ते."

"आपण एवढ्या दिवसापासून खटला लढताय. या खटल्यात एवढं आहे तरी काय?"

"अगं तुला नाही समजणार."

"सांगा तर खरं. मला समजलं तरी पाहिजे ना की तुम्ही एवढं का बरं जिकीरीनं लढता आहात. कमीतकमी मला माझ्या मुलांना शिकविण्यासाठी चांगलं वळण लावण्यासाठी तरी."

तसा तो सांगू लागला.

“हे बघ, ही कामगार आणि भांवलदाराची लढाई आहे. एका बाजूला भांडवलशाही आहे तर दुसऱ्या बाजूला कामगार. सगळ्या जगातील भांडवलशाहीचं खच्चीकरण करण्यासाठी हा खटला आहे.”

“बरं, बाबूजी मला काही ते समजलं नाही.”

“मी म्हटलं ना तुला काही समजणार नाही. बरं एक सांगू मी जी पुस्तक लिहिली. ती वाचायची. त्यात सगळं लिहिलेलं आहे.”

तशी ती काय समजायचं ते समजली. परत ती काही बोललीच नाही.

साविनंद रस्त्यानं चालला होता. तसा तो दिवास्वप्न पाहू लागला. 'न्यायालयात निकाल लागला आहे. कामगारांचा जय झाला आहे. निकालात न्यायालयाने म्हटलं आहे की कारखाना

मालकानं कामगारावर अत्याचार केला. कामगारांना वेतन तर कमी दिलेच. पणक कामगारांकडून जास्तीत जास्त काम करवून घेतले. तेव्हा हा अपराध क्षमाशील नाही. शिवाय कामगारांना या मालकानं जखमीही केलं. त्याचबरोबर एका माणसाला ठारही केलं. हे बयानातून व पुराव्यातून सिद्ध झालंय. आज गेनबा जरी जगात नसला तरी गेनबाच्या मृत्यूला मालकच कारणीभूत आहे. म्हणून त्याला मी प्रत्यक्ष सर्व बयाण व साक्ष पुरावे पाहून जन्मठेपेची शिक्षा सुनावत आहे. मात्र यानंतर येणाऱ्या मालकानं त्याच सक्षम कामगारांना किंवा त्यांच्या मुलांना कामावर रुजू करुन घ्यावं. त्यांच्या कामाचे तास नियम ठरवून निर्धारीत करावे अथवा कमी करावे. शिवाय त्यांचे वेतनही वाढवावे. वाढीव कामाचा वाढीव भत्ता मिळावा. कारखान्यातील सुटीसाठी नियम निर्धारीत करावे वेतन कपात करु नये. मात्र कामगारांनीही जास्त सुट्या मारु नये. कामगारांचा विमा फंड व भविष्य निर्वाह निधी रक्कम कारखान्यातूनच कपात व्हावी. हा फंड कामगारांना निवृत्तीच्या वेळी द्यावा. तसेच निवृत्तीवय निश्चीत करुन वेतनाच्या एक चौथाई रक्कम कामगारांना पेन्शन म्हणून द्यावी. कोणत्याही कारखाना मालकानं कामगारावर अत्याचार करु नये. केल्यास दाद

मागण्याचा अधिकार कामगारांना असेल. हाच माझा शेवचटा निर्णय आहे. हा निर्णय मी कोणत्याही दडपणात येवून देत नसून निपक्षी व कोणाच्याहीर म्हणण्यानुसार देत नाही तर निस्वार्थपणे देत आहे. '

न्यायालय आलं होतं. तसा तो भानावर आला. त्याला आपण दिवास्वप्न पाहात असल्याचा भास झाला. तो नास्तीक असूनही आज त्यानं देवाला मनोमन हात जोडले व प्रार्थना केली की तो निकाल त्याच्या बाजूनं लागू दे.

तो सायकल स्टँडवर लावतच होता. तोच दामोधरनं आवाज दिला,

“साविनंद काका. थांबा..... आपण मिळून जावू.”

त्यानं सायकल स्टँडवर लावली. त्याचबरोबर दामोधरनंही. त्याचबरोबर ते सोबत सोबत चालायला लागले. तसं कोणीतरी सांगितलं 'अकरा वाजलेत. '

अकरा वाजल्याचे ऐकताच साविनंदानं चालण्याचा वेग वाढवला. त्याचबरोबर दामोधरनंही. न्यायालय आलं. तशी फुकाऱ्याची वेळ झाली.

“साविनंद हजर हो.”

“कुलकर्णी वकील साहेब हजर हो.”

“मिराजदार कंपनी मालक हजर हो.”

कंपनी मालक. त्याला विचार पडला होता. 'आता आपल्याला शिक्षा होणार. आपण असं करायला पाहिजे नव्हतं. आपल्याला तुरुंगात जावं लागणार. खडी फोडावी लागणार. ' हे स्पष्ट त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं. तसा त्याचा चेहराही पडला होता.

कंपनी मालकासह व वकीलासह सर्वजण न्यायालयात हजर होते. तशी सुनवाई सुरु झाली. न्यायाधीश म्हणाले,

“कोणाला काही अजून सांगायचे बाकी आहे का?”

“न्यायाधीश मातरमा, तुम्ही निकाल ऐकवा. आमच्या तपासण्या पुर्ण झाल्या आहेत. उत्तर तपासण्याही पुर्ण झाल्या आहेत. तेव्हा आपल्याला जे ऐकवायचं असेल ते ऐकवा.”

न्यायाधीशर महोदयांनी सगळीकडं एक कटाक्ष टाकला. कारखाना मालकाकडंही एक कटाक्ष टाकला. तसे ते आपल्या

निकालाकडं वळले. साविनंदच्या चेहऱ्यावर मात्र तेज झळकत होतं. त्याला तर निकालापुर्वीच आपला विजय होणार असं जाणवत होतं. एवढ्यात न्यायाधीश महोदयांनी म्हटलं,

“मी दोन्ही मंडळींचं बोलणं ऐकलं. कामगारांचंही बरोबर आहे. त्यांना खरंच त्रास झाला हे ऐकलं या खटल्यादरम्यान. पण प्रत्यक्षात ठोस साक्षीपुरावे मिळालेले नाहीत. एरवी या खटल्यात काहीच तथ्य नाही असं मला वाटते. तेव्हा यात कंपनी मालकाचा काही दोष नसून ही वेतनवाढीसाठी कंपनी मालकाला फसविण्याची साजिश होती. हे यातून सिद्ध झालंय. तेव्हा कामगारांना मालकाचे काहीही घेणेदेणे नसून कामगारांना कारखान्यातूनस काढून टाकण्याचा सर्वतोपरी अधिकार कंपनी मालकाला आहे. तशीच नवी भर्ती करण्याचाही अधिकार असून कंपनी मालकाची न्यायालय निर्दोष मुक्तता करीत आहे. हाच माझा शेवटचा निर्णय होय.”

न्यायाधीश महोदयांनी निकाल वाचून दाखवला व सही केली. सर्व कामगार निराश झाले. साविनंद तर जास्त निराश झाला. कारण त्याचे तर पैशापाठोपाठ श्रमही गेले होते. सर्व साक्षीपुरावे कामगारांच्या बाजूनं तपासले जावूनही निकाल

असा कसा? याचं आश्चर्य सर्वांना वाटत होतं. प्रत्यक्ष गेनबाचा खुन मालकानं करुनही मालक निर्दोष सुटलाच कसा? हे ज्याला त्याला कळत होतं. पण आज उपाय नव्हता. कारण या कंपनी मालकानं एवढा निकाल पलटवायला लाखो रुपये मोजले होते. प्रतिपक्ष वकील व जणू न्यायाधीश महोदय या सर्वांनाच सेट केले होते. तो कामगार दिवस होता. पण तो कामगार दिवस आज या कामगारांसाठी काळा दिवस ठरला होता. गेनबाच्याही बलिदानाला काहीच अर्थ उरला नव्हता.

आपले स्वप्न पुर्ण होईल नव्हे तर संबंध कामगारांचा त्रास बंद होईल म्हणून ऐपत नसतांनाही साविनंदानं खटला लढला होता. पण प्रत्यक्षात त्याच्या खऱ्या मित्रानं त्याला धोका दिला होता.

निकाल सर्वांनी ऐकला. तसे ते विचार करत करत बाहेर पडले. न्यायाधीशानं कोणत्याच प्रकारचा विचार न करता निकाल दिला नाही. याचा जो तो कामगार खोलवर विचार करीत होता. तर याच निकालाची जखम दामोधर आणि साविनंदच्या मनात खोलवर गेली होती. आता जगून काही उपयोग नाही असं त्या दोघांनाही वाटत होतं. दामोधरला तर

जास्त वाईट वाटत होतं. कारण तोच त्या गेनबाच्या मृत्यूच्या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार होता. त्यानं बयाणातही तशीच साक्ष दिली होती. पण न्यायालयात न्यायाधीश महोदयांनी तीही फोल ठरवली होती.

काही वेळानं सर्व कामगार हळहळत आपापल्या घरी गेले. पण त्या अकल्पित निकालाची बाजू दामोधरच्या मनात मोठी भेग करुन गेली. जी लहानशी जखम मागील पंधरा वर्षापुर्वी झाली होती. त्या जखमेची आज भेग झाली होती.

आज रात्रीला विचार करता करता साविनंदला त्याच निकालानं हृदयविकाराचा झटका आला आणि तो गतप्राण झाला. त्याचा मृतदेह दुसऱ्या दिवशी स्मशानात गेला. या मरणाची बातमी सर्व कामगारांना मिळाली. तेही मरणाला हजर होते. त्याचबरोबर दामोधरही. चिता पेटवली गेली. ती पेटताच सर्वजण आपापल्या घरी गेले. मात्र दामोधर स्तब्ध राहून एकटक चितेकड पाहात होता. अचानक त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तसा तो स्वगत म्हणाला,

"हे साविनंद काका, मी या जळत्या लाकडाची शपथ घेतो. मी तुमची इच्छा पुर्ण केल्याशिवाय आज अन्न प्राशन करणार नाही."

ती प्रतिज्ञा होती दामोधरनं घेतलेली. जणू चाणक्यानं दरबारात शेंडीला गाठ मारुन घेतलेली प्रतिज्ञा.... तसेच कधीही विवाह करणार नाही म्हणून भिष्मानं घेतलेली प्रतिज्ञा.... तो तिथून घरी गेला. त्यानं एक धारदार सुरा घेतला. तसा तो त्वेषानं चालू लागला. त्या कारखान्याच्या वाटेनं. जो कारखाना आजही चालू होता. त्या नवीन कामगारांच्या भरवशावर. तसा तो कारखाना आला.

मालक नुकताच गाडीतून बाहेर निघाला. संधी नामी चालून आली होती. मालक गाडीच्या बाहेरच उभा होता. त्याला काय माहित होतं की कोणी आपलाही खुन करेल. तो तर आनंदात होता. कालच्या निकालानं. जणू सर्वकाही मिळाल्याचा आनंद मिरवत. पण त्याचा काळ आला होता आज दामोधरच्या रुपात.

दामोधरनं त्याला पाहिलं व वाघ जसा शेळया मेंढ्यावर झडप घालतो, तशी झडप घालून त्याच्या पोटात सुरा खुपसला. कोणाला धावायलाही वेळ दिला नाही. तसा तो म्हणाला,

“मालक, मी न्याय करायला आलो आहे. जो न्याय न्यायालयानं केलेला नाही. मी आज खरा न्याय करणार आहे.” असे म्हणत तो वारंवार सुरा त्याच्या पोटात खुपसू लागला. कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी. तसेच गेनबाच्या मृत्यूला न्याय मिळवून देण्यासाठी.

कंपनी मालक जाग्यावरच मरुन पडला होता. त्याला उपचारालाही वेळ मिळाला नाही. मात्र त्याच्या हत्येनंतर दामोधरला पकडण्यात आले. त्याला न्यायालयासमक्ष उभं करण्यात आलं. तसं न्यायालयानं न्याय देण्यापुर्वी विचारलं,

“तुम्हाला आपल्या संरक्षणार्थ काही बोलायचं आहे.”

“नाही. या अंध्या जगात मला काहीच बोलायचे नाही. मी खरा न्याय केलेला आहे. मी गेनबाच्या मृत्यूचा प्रत्यक्ष साक्षीदार असूनही त्या कंपनी मालकाची न्यायालयानं निर्दोष मुक्ती केल्यानं मला हे पाऊल उचलावं लागलं. तेव्हा मला काहीही याबाबत काहीही सांगायचं नसून न्यायालयानं आपला निकाल द्यावा.”

खटला..... तोही खुनाचा. जास्त दिवस चालला नाही. कारण दामोधरनं गुन्हा कबूल केला होता.

न्यायाधीश म्हणाले,

''मी दोन्ही बाजूकडील मंडळींचं बोलणं ऐकलं. दामोधरचंही बरोबर आहे. तसा हा खुन सुडाच्या भावनेने झालेला आहे. पण तो बदला जरी असला तरी त्यानं केलेली कृती सराहनीय आहे. खुन हा खुनच होतो. अशानं कोणीही कोणाचा बदल्यासाठी खुन करेल. तेव्हा मी न्यायाधीश म्हणून या निर्णयापर्यंत आलो असून मी आरोपीला दहा वर्षांची सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावत असून यांचा खुन सुडभावनेतून जरी असला तरी त्यात चांगूलपणा असल्यानं त्यांची शिक्षा तीन वर्ष कमी करण्यात येत आहे. हाच माझा शेवटचा निर्णय होय.

दामोधरची रवानगी तुरुंगात झाली होती. आज दामोधर खडी फोडत होता तुरुंगात. पण त्याही परीस्थितीत त्याच्या चेहऱ्यावर आनंदच होता. त्यानं गेनबाच्या खुनाचा बदला घेतला होता. कामगारांचा प्रश्न सोडवला होता. कारण आता कोणताही भांडवलदार कोणत्याही कामगारावर अत्याचार करतांना या खुनाचा नक्कीच विचार करणार होता.

कामगारांचे विश्व बदलले होते. नवीन कामगार त्या कारखान्यात आले होते. नवीन मालकही आला होता. आता कामगारांची संघटना होती. ते कामगार संघटनेच्या माध्यमातून आपले ध्येय साध्य करीत होते. पण कामगारांचा प्रश्न आजही अनुत्तरीतच होता. आजही अनुत्तरीतच होता.

आज साविनंदची सुन ती पुस्तक वाचत होती. मुलालाही सांगत होती. तसेच पुढील भाग पुर्णही करीत होती. तिला सर्व काही वाचलेलं आठवत होतं व रडूही येत होतं. तसेच लिहितानाही अश्रूभरल्या नेत्रांने लिहित होती आपल्या सासऱ्याची कर्मकहाणी. ज्या कहाणीत भांडवलशाही विरुद्ध कामगारशाही जिंकली की हरली तेच समजत नव्हते.

# पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.